
साप्ताहिक
माणूस

५ मे ८४
दोन रुपये

# मुक्काम हैदराबाद





...तिच्या स्पर्शाने जीवन उजळते

## केरळमधील आघाड्यांचे राजकारण

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : एकूणपन्नासावा

५ मे १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



: पत्ता :

साप्ताहिक माणूस


१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९



मुखपृष्ठ

संजय पवार

# मुंबापुरी

## रामलीलेनंतर

उपमुख्यमंत्रीपदाची महावस्त्रे आदिकांनी काढून ठेवली त्याला जवळजवळ आठवडा लोटलाय. तेव्हा वाटलं होतं की, आता कॉंग्रेस (आय) पक्षात सगळं स्थिरस्थावर होईल; पण आता ऊठसूट जो तो प्रत्येकाच्या कासोट्याला हात लावतोय. राजकीय पिचकारीबाजीला नवाच ऊत आलायसं दिसतंय.

तिकडे बाबासाहेब भोसले रोजच्या रोज आमदारांना डिनर–पार्ट्या देतायेत. इकडे शालिनीताई वेगळ्याच मोर्चेबंदीत मश्गुल आहेत. त्र्यं. गो. देशमुख, बाबूराव भापसे ही फुकटचा चिवचिवाट करणारी मंडळी कुंपणावर बसून आहेत. भाऊराव पाटील हे कोणाच्याहीसाठी सह्या गोळा करायला अगत्याने सुपाऱ्या घेताहेत. जनाब अंतुले विधानभवनावर असेच एकदा येऊन जातात अन् विधानभवनात फुलबाज्यं लागतात !

आदिकांचं विसर्जन झालं तेव्हा वाटलं की नाटकाचा शेवट झाला; पण महाराष्ट्रातला सत्ता–स्पर्धेचा तमाशा इतक्या लवकर अन सहजी आटोपणार नाही. आताच तर कुठे खेळाला सुरुवात झाली आहे. खटकेबाज संवादाचा तिसरा अंक अद्याप सुरू व्हायचा आहे.

आदिक गेल्यावर दादांना मोकळं मुलुखमैदान मिळेल असं खुद्द दादांच्याच गोटातले काहीजण बोलत होते; पण दिल्लीश्वरांनी यावर बोळा फिरवला आहे.

बाईंना स्वतःच्या हिकमतीवर राजकारण खेळू शकणारी तालेवार सरदारमंडळी नको आहेत. त्यांना हवेत ते नवशिक्ये रंगरूट ज्यांना सतत दिल्लीच्याच कृपेवर जगावे लागते. भोसले, अंजय्या वगैरे.

दादांना म्हणूनच चौदा मंत्र्यांना किंवा त्यापैकी काहींना काढून टाकण्याची परवानगी नाकारण्यात आली. खरं तर या चौदा मंत्र्यांनी आदिकांच्या बाजूने पत्रक काढून मुख्यमंत्र्यांविरुद्ध जवळजवळ बंडच पुकारलं होतं; पण बंडाळी माजवणाऱ्यांची गर्दन छाटून टाकणारे कर्तबगार सेनानी असतात. वसंतदादा तसे नव्हेत. म्हणूनच, दादा डुलत डुलत दिल्लीला गेले आणि डुलत डुलत परत आले. पत्रकारांना दादा म्हणे म्हणाले की, 'थंडा करके खाना' अशी दिल्लीची आदत आहे. ते ठीक आहे हो दादा; पण दिल्ली तुम्हाला आता 'कोल्ड स्टोअरेज'मध्ये ठेवणार नाही ना ? 'जनरल्स डोंट डाय, दे फेड अवे', अशी इंग्रजीत म्हण आहे.

आपल्या 'रामलीले' विषयी आदिकांनी कितीही कानावर हात ठेवले असले तरी त्यांच्याच पक्षातल्या आणि श्रीमती गांधींना निकट असलेल्या महंमद यूनुस यांनी आदिकांच्या हॅनोव्हर इथल्या रंगील्या चाळ्यांचा सुरस अन् चमत्कारिक वृत्तांत वृत्तपत्रांना पुरवला आहे. (काय माणस आहेत हो ! याच यूनुससाहेबांच्या चिरंजिवांना म्हणे अमेरिकेत फसवाफसवीच्या आरोपावरून वीस वर्षांची कैद झाली आहे ! )

आदिकांनी आपल्या पत्रकार–परिषदेत आपल्या विरोधकांना आपल्याविरुद्ध असलेले सगळे आरोप पुन्हा एकदा करण्याचं जाहीर आव्हान दिलं आहे; पण आता खूप उशीर झालाय हो ! तुमच्या एक, सफदरजंगरोडवर असलेल्या सुप्रीम कोर्टाने तुमच्याविरुद्ध केव्हाच निकाल देऊन टाकलाय, आदिक !

आपण पुन्हा कदापी दारूला स्पर्श करणार नाही अशीही जाहीर शपथ आदिकांनी घेऊन टाकली आहे. अर्थात, ही शपथ घेतेवेळी संध्याकाळचे सात वाजले होते, तेव्हा हे सगळं कितपत 'सीरियस' घ्यायचे हा सवाल आहे.

दारूवर उर्दूत बख्खळ शेर आहेत; पण हा शेर आदिकांना 'फिट्ट' बसतो.

'पी लिया करते हैं

जीने की तमन्नामें कभी
डगमगाना भी जरूरी हैं
सँभलने के लिये '

स्वत:ला सावरण्यासाठी का होईना; पण पिणं जरुरी आहे. एक-दोनदा माणूस बहकतो, नंतर स्वत:ला सावरून घेतो. असा या शेरचा अर्थ. आता आदिक स्वत:ला कधी सावरून घेतात ते पाहायचं.

## कुंदा कदम

मुंबापुरीची ' बिनधास्त बाई ' महापालिकेच्या उपआयुक्ता कुंदा कदम एक मेपासून निवृत्त होत आहेत. आपल्या कर्तृत्वामुळे ज्या अधिकाऱ्यांची नावे ह्या शहराशी निगडित होऊन राहतील अशी केवळ चार माणसे—महापालिकेचे प्रशासक द. म. सुखथनकर कलेक्टर अरुण भाटिया, पोलीस-आयुक्त ज्युलिओ रिबेरीओ आणि कुंदा कदम ! ' लोकमान्य टिळकांचे नाव ठाऊक नाही असा मनुष्य उभ्या महाराष्ट्रात (आता आदिकांनी तो आडवा केला आहे) शोधून सापडणार नाही ' याच चालीवर कदमबाईंचे नाव ठाऊक नाही असा झोपडपट्टी—दादा उभ्या मुंबईत शोधून सापडणार नाही असे त्यांचे वर्णन करता येईल.

बाई १९४९ मध्ये महापालिकेत कारकून म्हणून लागल्या आणि आता उपआयुक्ता म्हणून निवृत्त होत आहेत. त्यांनी जितक्या धडाडीने मुंबापुरीतील अनधिकृत बांधकामे तोडली तितके धैर्य महापालिकेतील फारच कमी अधिकाऱ्यांनी दाखविले असेल. मीठी नदी आणि खान इंडस्ट्रियल इस्टेट येथील अनधिकृत गाळे तोडताना तर नगरविकास-खात्याचे राज्यमंत्री चंद्रकांत त्रिपाठी यांनीही हस्तक्षेप केला. वांद्रयाचा कत्तलखाना तोडून तो देवनारला हलविण्याचे कामही बाईंचेच.

हे सारे काम करताना त्यांना धमक्या काही कमी नाही मिळाल्या; पण बाई अतिशय खमकी ! त्यांची धारावीला वॉर्ड ऑफिसर म्हणून नेमणूक झाली तेव्हा ह्या झोपडपट्टीत कोणत्याही सरकारी वा पालिका-अधिकाऱ्याला शिरायची हिम्मत होत नसे ! बाई पहिल्याच दिवशी फेरीला निघाल्या. माकडवाला म्हणून एक दादा होता. त्याने बाईंना घाबरवण्यासाठी त्यांच्यासमोर जिवंत मांजर दोन पाय धरून फाडले; पण ह्याच झोपडपट्टीत गुडघाभर पाण्यात उभे राहून बाईंनी काम केले. आज येथे तीन वेल्फेअर सेंटर्स उभी आहेत. त्यांनी या लोकांना शाळा बांधायलाही मदत केली आणि आता हाच माकडवाला वांद्रयाच्या ऑफिसमध्ये येऊन सांगतो, ' बाई, मुनशीपालटी छोडने बाद हमारे उधर काम करना !'

बाईंना आम्ही विचारले, ' तुमच्या आठवणीत राहण्यासारखे प्रसंग कोणते ?' तर त्या म्हणाल्या दुर्गा भागवतांनी स्वत: पत्र लिहून त्यांचे कौतुक केले तो प्रसंग. पुढे आणखीन म्हणाल्या, ' मी कुर्ल्याला जायची. तेव्हा स्टेशनजवळची एक म्हातारी बाई मला नेहमी सकाळी भाकरी खाऊ घालायची. म्हणायची, ' कुंदा, तुझी पाडापाड नंतर कर. आधी खाऊन घे !'

आता बाई जातील आणि मुंबापुरीतील झोपडपट्टी—दादा बिनधास्त होतील !

—विष्णू जयदेव

## राजधानी दिल्ली

# जोक्स आणि विनोदबुद्धी

दिल्लीची हवा दिल्लीच्या राजकारणासारखीच चंचल. हवेत केव्हा कसा बदल होईल सांगता येणार नाही. २१ एप्रिल रोजी एक व्याख्यान ऐकायला जाण्यासाठी घराबाहेर पाऊल टाकले. तेवढ्यात चारी दिशांनी आकाश लाल धुळीने व्यापून गेलेले दिसले. थोड्याच वेळात ' आंधी ' (धुळीचे वादळ) येण्याचे स्पष्ट चिन्ह दिसत होते. अचानक जोरदार वारे सुरू झाले आणि ताशी सत्तर किलोमीटर वेगाच्या आंधीने दिल्लीला झोडपून काढले; परंतु थोड्याच वेळात सर्व काही निवळून हवा एकदम स्वच्छही होऊ शकेल, अशी अपेक्षा होतीच आणि झालेही तसेच. १५–२० मिनिटातच आंधीचा खेळ संपला आणि आम्ही वाय्. एम्. सी. ए. चे यूथ होस्टेल गाठले. ऑथर्स गिल्डतर्फे तेथे विख्यात व्यंगचित्रकार अबू अब्राहम यांचे ' इंडियन्स अँड सेन्स ऑफ ह्यूमर ' ( भारतीय लोक आणि विनोदबुद्धी ) या विषयावर व्याख्यान होते. श्री. राज चटर्जी अध्यक्ष होते.

दिल्ली चाप्टर—ऑथर्स गिल्डच्या कार्यकारी मंडळाचे सभासद आर. के. मूर्ती यांनी वक्त्यांची ओळख करून दिली. सुमारे ५० श्रोत्यांनी कॉन्फरन्सहॉल पूर्ण भरला होता. अबू अब्राहम २० – २५ मिनिटे बोलले. त्यांच्या व्याख्यानाचा थोडक्यात आशय असा—

' अमेरिकन लोकांमध्ये ' जोक्स ' पुष्कळ असतात; पण त्यांच्या ठिकाणी ' सेन्स ऑफ ह्यूमर ' ( विनोदाची अभिरुची ) नसतो. सुसंस्कृत ब्रिटिश लोकांच्या संभाषणात सदैव एक विनोदाचा ' फ्लेवर ' असतो, तसा तो *अमेरिकन लोकांच्या बोलण्यात आढळत नाही.* आपण एका भाषेतील वाङ्मय दुसऱ्या भाषेत भाषांतरित करू शकतो; परंतु विनोद भाषांतरित करता येत नाही. विनोद हा सहज स्वाभाविक रीतीने निर्माण झाला पाहिजे. तो कृत्रिमपणे जोपासता येत नाही. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी केलेल्या प्रचारसभांमध्येही विनोदाला फार महत्त्व असते; परंतु स्टीव्हन्सनने वाजवीपेक्षा जास्त जोक्स केल्यामुळे त्याला त्या निवडणुकीत अपयश आले. विसंगती हे उपरोधाचे मर्म असते. केनेडींनी आपली विनोदबुद्धी विकसित केली होती. पूर्वी इंग्लंडच्या लोकसभेत संभाषणात विनोद मोठ्या प्रमाणात असे; परंतु अलीकडे त्याचे प्रमाण बरेच कमी झालेले दिसते. '

अबू अब्राहम यांच्या व्याख्यानात नवीन मुद्दे फारसे नव्हते. मात्र त्यांच्या व्याख्यानाला जगाच्या विविध भागात केलेल्या भ्रमणाच्या अनुभवाची बैठक होती. भारतीय लोकांच्या विनोदबुद्धीबद्दल ते म्हणाले की, ती त्यांच्यात फार कमी आढळते.

त्यानंतर श्रोत्यांनी काही प्रश्न विचारले. ' विनोदाचे प्रमाण आज कमी का होत चालले आहे? व्यंगचित्रांमध्ये प्राण्यांच्या चित्रांचा उपयोग का केला जातो ?' गुजरातमध्ये काही वर्तमानपत्रांतून राजकीय विषयावर व्यंगात्मक कविता लिहिल्या जात, तशा अलीकडे का दिसत नाहीत?' 'दारिद्रयामध्ये विनोदाला काही स्थान आहे का ?'

'विनोद आणि उपरोध यातील फरक कोणता?' 'एखादी व्यक्ती ही जन्मतःच विनोदप्रवृत्तीची असते की विनोद हा प्रयत्नसाध्य आहे?' ,आणीबाणीच्या उदास वातावरणाकडे तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहाता?' 'टी. व्ही. वर दाखविण्यात येणारा 'लुसी शो' आणि काहीसा गंभीर विषयावरील विनोद असणारा 'यस मिनिस्टर' हे दोन परदेशी कार्यक्रम आपल्याला सतत हसवीत ठेवतात, याचे तंत्र काय?'

अबू अब्राहम यांनी उत्तरादाखल सांगितले—

'व्यंगचित्रात माणसांच्या चेहेऱ्यांची वैशिष्टये दाखविण्यासाठी प्राण्यांच्या चेहेऱ्यातील साधर्म्याचा पूर्वीपासूनच उपयोग केला जातो. कुत्रा, घोडा आणि डुक्कर यांची तोंडे अनुक्रमे शंखाकृती, अंडाकृती आणि गोल चेहेऱ्यांच्या व्यंगचित्रात वापरली जातात. अमेरिकेत 'बर्ड पीपल' 'इन्सेक्ट पीपल' आणि 'फिश् पीपल' अशीही वर्गवारी केली जाते.' 'भरल्या पोटी केलेले विनोद आणि रिकाम्या पोटी केलेले विनोद असे प्रकार विनोदात दिसू शकतात.' 'सटायर हा टीकात्मक विनोदाचा प्रकार आहे. Satire is like sex. There is always a difference between ambition and achievement, but still there is pleasure.' लुसी शो किंवा यस मिनिस्टरसारखे कार्यक्रम हे व्यावसायिक स्वरूपाचे असतात. त्यामागे सूक्ष्म निरीक्षण, बारकावे व नेमकेपणा असतो. त्याचे संपादन आणि तांत्रिक परिपूर्णता यावर बरीच मेहनत घेण्यात आलेली असते. अनेक लोकांनी त्यांवर कसून परिश्रम केलेले असतात. त्यातदेखील लुसी सतत निरागस हास्याचा खळखळाट चालू ठेवते, तर यस मिनिस्टरला एक विशिष्ट बौद्धिक उंची असते. यस मिनिस्टर हा मार्गारेट थॅचरचा अतिशय आवडता कार्यक्रम आहे. याच धर्तीवरील 'यस प्राइम मिनिस्टर' मध्ये प्राइम मिनिस्टरची भूमिका स्वतःच करण्याची त्यांनी आपणहून इच्छा दर्शविली. चार्ली चॅप्लिन हा अशा तऱ्हेच्या कार्यक्रमातील 'अनुडिस्प्यूटेड किंग' म्हणावा लागेल. आणीबाणीच्या काळात ह्यूमर हा उलट सर्वांत सुलभ आणि सर्वांत सुरक्षित आउटलेट होता. विनोदाच्या माध्यमातून मनुष्य वास्तवाच्या अधिक जवळ जाऊ शकतो,' 'जोक' मध्ये नुसता हास्याचा स्फोट असतो, तर 'ह्यूमर' मध्ये अभिरुचीची विशिष्ट उंची राखलेली असते. 'भारतासारख्या देशात पोषाख, चेहरे, आचार-विचार इत्यादींची इतकी विविधता आहे; परंतु व्यंगचित्रांमध्ये या विविधतेचा पुरेसा उपयोग करून घेतला जात नाही. त्या दृष्टीने आणखी अभ्यास होण्याची जरुरी आहे.'

व्याख्यान गप्पांच्या स्वरूपातच झाले. अबू अब्राहम यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत, विनोदाचे नर्म चिमटे घेत श्रोत्यांना प्रसन्नपणे हसवीत ठेवले.

वाय. एम. सी. ए. मधील ही संध्याकाळ विनोदचर्चेत चांगली गेली; पण मनात मात्र सारखे येत होते की, मराठीतला चिं. वि. जोश्यांचा कारुण्यात भिजलेला विनोद, पु. लं. चा सर्वंकष विनोद, वसंत सरवटयांची प्रगल्भ व्यंगचित्रे वगैरेंची माहिती जमलेल्या श्रोत्यांना त्या निमित्ताने द्यायला हवी; पण प्रश्नोत्तररूपी चर्चेत त्याला वाव नव्हता आणि स्वतंत्रपणे त्यावर बोलण्याइतका अवकाशही नव्हता, ही रुखरुख मात्र मनात राहिली.

## एका कथेचा प्रवास

चीनमधील प्राध्यापक यांग क्झियान्वी आणि त्यांच्या विदुषी पत्नी हे दोघे आंतरराष्ट्रीय भाषांतर परिषदेसाठी गेल्या महिन्यात दिल्लीला आले होते. दिल्ली विद्यापीठातील 'आधुनिक भारतीय भाषा' विभाग आणि 'कंपॅरेटिव्ह् इंडियन लिटरेचर असोसिएशन' यांच्यातर्फे दिल्ली विद्यापीठात प्रा. यांग क्झियान्वी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. तौलनिक साहित्याभ्यासाच्या क्षेत्रात रस घेणाऱ्या प्राध्यापक-मंडळींसमोर दिलेल्या या व्याख्यानाचा विषय होता हॅन्स अँडरसनची एक परिकथा.

सर्वांना परिचित असलेल्या 'बादशहाचे नवे कपडे' या कथेविषयी प्रा. क्झियान्वी बोलले. नव्या कपडयांची अतिरेकी हौस असलेल्या लोभी राजाला दोन लबाड विणकरांनी कसे फसवले आणि अत्यंत तलम कपडयांचे नाटक करून त्याची गावभर विवस्त्र मिरवणूक कशी काढली, याचे गंमतीदार वर्णन हॅन्स अँडरसनने या कथेत केलेले आहे. एका निरागस मुलीच्या स्पष्टोक्तीने शेवटी राजाचा मूर्खपणा चव्हाटयावर आला असा या कथेचा शेवट आहे.

प्रा. क्झियान्वी यांच्या भाषणाचा मुख्य मुद्दा असा होता की, ही गाजलेली परीकथा मुळात हॅन्स अँडरसनची नसून ती एका भारतीय कथेचे भाषांतर आहे.

५ व्या शतकात भारतामधून चीनमध्ये बौद्ध धर्माचे प्रचारक गेलेले होते. त्या वेळी त्यांनी तिथे केलेला उपदेश हा महायानपंथाच्या त्या काळातील वाङ्मयात लिहिलेला आहे. अपोहवादाचे (शून्यवादाचे) तत्त्वज्ञान स्पष्ट करण्यासाठी त्यामध्ये गुरुशिष्यांच्या संवादात ही कथा आलेली आहे. गुरु शिष्याला सांगतो की, 'जसे त्या भारतीय कथेत घडते तसे...' इथे दृष्टान्तरूपाने हीच कथा किंचित वेगळया स्वरूपात आलेली आहे. इथला राजा नव्या कपडयांचा लोभी नसून तलम कपडयांचा लोभी आहे. विणकाराने दाखविलेले कोणतेच कापड पुरेसे तलम नसल्यामुळे त्याला पसंत पडले नाही. तेव्हा वैतागून त्या म्हाताऱ्या विणकाराने दोरीवरून कापड काढल्याचा नुसताच आविर्भाव करीत मूर्ख राजाला फसवले आणि तो लोभी राजा शेवटी लहान मुलाच्या स्पष्टोक्तीनंतर सर्वांच्या चेष्टेचा विषय बनला. संसाराविषयी आसक्ती बाळगणारा माणूस त्यात सुख सापडल्याच्या भ्रमात गुंग होतो; परंतु प्रत्यक्षात तेथे काहीच नसते आणि केवळ निष्पाप व निर्लेप मनालाच हे काहीच नसणे जाणवू शकते, असा त्या दृष्टांतातील अर्थ. हॅन्स अँडरसनपर्यंत ही कथा कशी पोचली यावर प्रा. क्झियान्वी यांचे संशोधन चालू आहे.

व्याख्यानानंतरच्या चर्चेत या दृष्टान्तकथेचा मुख्य रोख शून्यत्वाच्या तत्त्वज्ञानावर आहे की, निष्पाप मनाला येणाऱ्या त्याच्या प्रतीतीवर आहे यावर वाद झाला. 'आजच्या चिनी लेखकांना ह्या गोष्टीतील निष्पाप मुलाची भूमिका घेऊन 'राजा विवस्त्र आहे' असे स्पष्ट सांगता येईल का?' हा एका प्राध्यापकाने विचारलेला खोचक प्रश्न वक्त्यांना क्षणभर निरुत्तर करणारा होता. त्यांच्या पत्नीने चर्चेत हस्तक्षेप करून 'चीनमध्ये कोणतीही व्यक्ती सरकारी धोरण ठरवीत नाही. पक्षात संपूर्ण साधक-बाधक चर्चा होऊन धोरण ठरविण्यात येते. त्या चर्चेच्या वेळी पक्षाच्या सदस्यांना टीका करण्याचे स्वातंत्र्य असते. एकदा सरकारी धोरण निश्चित ठरल्यावर मग त्यावर प्रत्यक्ष टीका करता येत नाही, हे खरे आहे, असे सांगितले.

—ललिता मिरजकर

# सेवेतून आंदोलन बनलेली ‘ सेवा ’

दिल्लीतील आवान–ए–गालीब सभागृह स्त्रियांनी आणि मुलांनी गच्च भरलेले. सभागृहाची आसनक्षमता जवळजवळ सातशेची. बसायला जागा नसल्यामुळे काही पुरुष मधल्या पायऱ्यांवरच बसलेले. रोजच्या कामाच्या रामरगाड्यातून काही तासांकरता का होईना सुटका मिळालेल्या ह्या भगिनी ठेवणीतले नवे कपडे घालून एखाद्या लग्न-समारंभाला जावं अशा नटून-थटून आलेल्या. काही बुरख्यात तर काही बुरख्याविना. हिंदू आणि मुसलमान असा सरमिसळ जमाव.

ह्या सर्व भगिनी ‘ सेवा ’ कार्य करणाऱ्या आहेत. ‘ सेवा ’ म्हटलं की, जेवढे म्हणून प्रचलित अर्थ समोर येतात, त्यांच्यापेक्षा ह्यांची ‘ सेवा ’ वेगळी आहे. सेवाशुश्रूषा, नोकरी–चाकरी, ईश्वरभक्ती यापेक्षा या भगिनींची ‘ सेवा ’ वेगळाच आयाम असलेली आहे. ह्या देशातील अर्धी जनता दारिद्र्य-रेषेखाली आहे, अशा दरिद्री जनतेची अर्धी दुनिया म्हणजे या भगिनी. गुजराण करण्यासाठी जुन्या दिल्लीच्या अंधाऱ्या गल्लीबोळात धडपडणाऱ्या. काहींचा अंधार समाजातला, काहींचा बुरख्यातला, एकूण सर्वच भगिनी असंघटित, अजाण, त्यांना स्वतःच्या सामर्थ्याची जाण करून देणारी ही ‘ सेवा ’ इंग्रजीतील ‘ Self Employed Women's Association ’ या चार शब्दांपैकी पहिले अक्षर घेऊन बनलेली SEWA-‘ सेवा ’.

‘ सेवा ’ मुळेच जुन्या दिल्लीच्या गल्ली-बोळातील ह्या भगिनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्या आहेत. जुन्या दिल्लीतील कुचा पंडित, लालकुआ, लाल दरवाजा, बलीमारान, दरीबाकलान, ६४ खंबा, दर्यागंज ह्या भागातील झरदोशीचे (कलाबतूचे) काम करणाऱ्या ह्या भगिनींना ‘ सेवा ’ने संघटित केले. त्यांना नुसतं स्वावलंबनच शिकवलं नाही तर एक आत्मविश्वास दिला. हे कार्य अवघ्या चार वर्षात इतकं विस्तारलं की, समाजसेवेचा एक सर्वस्वी नवा आयाम पुढे आला. ‘ सेवा ’ हा शब्द ‘ जे का रंजले गांजले ’ त्या सर्वांना त्यांची जातपात, पंथ-धर्म ह्यांचा विचार न करता आपले म्हणण्या इतका व्यापक झाला.

अशा या ‘ सेवा ’चा चवथा वर्धमान–दिवस ‘ गांधीस्मृति ’ या राजघाटाजवळच्या छोटयाशा वास्तूतून निघून आवाम–ए–गालिबसारख्या आधुनिक आणि प्रशस्त सभागृहात साजरा होत होता. सेवाच्या सर्व सदस्य महिला नगरपरिवहनाच्या बसने आपआपल्या ठिकाणाहून भर उन्हात आल्या. दिल्लीतील ‘ सेवा ’ आता एक आंदोलन झाले आहे. निदर्शनविरहित पण निर्धाराचे ‘ सेवा ’च्या इथवरच्या प्रवासाचं तितक्याच शांतपणे आणि निर्धारानेही नेतृत्व केलं आहे कमरुन्निसा कुलश्रेष्ठ यांनी, त्या ‘ सेवा ’च्या जनरल सेक्रेटरी आहेत. प्रत्येक कार्यक्रमातील त्यांची कल्पकता वाखाणण्यासारखी आहे.

कार्यक्रमाला सुरुवात होते ती ‘ ओम् तत्सत श्री नारायण चिदानंद प्रभू तू ’ ह्या प्रार्थनेने. संस्थेच्या काही कार्यकर्त्या व कमरुन्निसा ही प्रार्थना म्हणतात. नंतर संस्थेच्या काही मुस्लिम सदस्य व कमरुन्निसा कुराणातील ‘ तिलावंत ’ म्हणतात.

व्यासपीठावर प्रमुख पाहुण्या महानगनर परिषदेच्या पार्षद श्रीमती ताजदार बाबर, अनेक सामाजिक संस्था चालवीत असलेल्या व ‘ सेवा ’च्या आश्रयदात्या मेखला झा, कमरुन्निसा कुलश्रेष्ठ व श्रममंत्रालयातील एक संचालक रवी मोहन बसलेले. समोर एका लहान टेबलावर चार मेणबत्त्या ठेवलेल्या, त्याच्या समोरच जमिनीवर गुलाब-पाकळ्यांनी ‘ सेवा ’ लिहिलेले.

‘ सेवा ’ची एक कार्यकर्ती कार्यक्रमाची रूपरेखा सांगायला सुरुवात करते. जवळच एक वयस्क भगिनी गुलाबाचा हार घेऊन उभी असते. असं वाटतं प्रमुख पाहुण्यांना मालार्पण करायला ती उभी आहे. इतक्यात पांढऱ्याशुभ्र साडीतल्या कमरुन्निसा संस्थेची माहिती द्यायला माईकशी येतात. ती बाई चटकन त्यांच्या गळ्यात गुलाबाची माळ घालते. हे काय अशा अर्थाने त्या बघत असताना ती बाई प्रेमाने हसत निघून जाते. ‘ सेवा ’च्या सदस्यांचे कमरुन्निसावर असलेल्या प्रेमाचं ते प्रतीक होतं. असंच प्रेम आणखीही दिसून आलं ते एका भगिनीच्या गाण्यात. कधीही स्टेजवर यायची, इतक्या मोठ्या जमावासमोर बोलायची वेळ न आलेली ही भगिनी देवीचे गीत गाते आणि गाण्यात सांगते ‘ कमरुन्निसा के भवन मे मजदूर पुकारे । आज मेरी सेवा उंची उठ रही है ।’ आणखी काही भगिनी न लाजता, न घाबरता नज्म, गझल व भजन म्हणतात.

‘ सेवा ’तील या स्त्रिया मोनोग्राम तयार करणे, जरीचे–मुकुट बनविणे, कलाकुसरी करणे अशा प्रकारचे पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले व्यवसाय घरबसल्या करीत असत.




या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि. ग. कानिटकर



**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**

बामची पंधराची कला

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०.

या कामाबद्दल फारच अल्प मोबदला त्यांना मिळायचा. दहा रुपयांच्या कामात कच्चा माल व मधल्या माणसाचे पैसे जाऊन फक्त दोन रुपये हे काम करीत असणाऱ्या बाईला मिळायचे. हाच प्रकार कपडे शिवण्याबाबतचा. पंजाबी सुटाचे फक्त तीन रुपये मिळायचे. फार शोषण व्हायचे ह्या बायकांचे. त्यांनी ह्या अन्यायाबद्दल कधी विरोध केला, तर आज मिळतंय ते कामही मिळायचं नाही अशी भीती त्यांना वाटायची.

## चढते-वाढते यश

'सेवा'ने ह्या स्त्रियांना संघटित केले. मालाचं उत्पादन वाढावं असा प्रयत्न करून ह्या स्त्रियांना देणारा मधला माणूस काढून टाकून, त्यांच्या मालाला व्यापाऱ्यांकडून सरळ मागणी मिळावी असा प्रयत्न केला. ह्याचा फायदा किती तरी भगिनींना मिळाला. दिल्लीत गेल्या महिन्यात तीन दिवसांसाठी भरलेल्या 'क्राफ्टबझार' मध्ये ह्या भगिनी आपला माल विकायला बसल्या होत्या. आता तर प्रत्येक महिन्यात असा 'बझार' लागणार आहे. ह्या भगिनी त्यात आपले स्टॉल लावणार आहेत. 'सेवा' ला ह्यातून काही मिळत नसले तरी स्त्रियांचा आत्मविश्वास वाढलाय, हे संस्थेचेच यश आहे. १९८० मध्ये 'सेवा' ची स्थापना झाली. तेव्हा संस्थेच्या फक्त सोळा सदस्य व पाच कार्यकर्त्या होत्या. आज सदस्यसंख्या हजाराच्या जवळ गेलीय व पंचवीसहून कार्यकर्त्या आहेत.

दिल्लीच्या बाजारात कोणतीही वस्तू लिफाफ्यात घालून मिळते. अगदी भाजीसुद्धा. असे लिफाफे करणे हाही येथे एक व्यवसाय आहे. 'सेवा'ने लिफाफे बनविणाऱ्या बायकांना, व्यापाऱ्यांशी झगडून, दर वाढवून दिले आहेत. १९८१ मध्ये हजार लिफाफ्यांना पावणेदोन रुपये मिळायचे. कागद व्यापारी द्यायचा. आज १९८४ त हा दर वाढवून तीन रुपये करण्यात आला. पांढऱ्या कागदाच्या लिफाफ्याचा दर ५ रु. झाला.

कॅनाटप्लेस व जनपथच्या फूटपाथवर हाताने कापडावर रंगविलेली चित्रे, पडदे, वॉलपीसेस विकायला घेऊन बसणाऱ्या बायकांना फार त्रास व्हायचा. नगरपालिका त्यांना नेहमी हुसकायची. त्यांना आपला माल विकायला कुठे जागाच नाही. जिथे बसतील तेथून त्यांची हकालपट्टी व्हायची. 'सेवा'चे ह्या गोष्टींकडे लक्ष गेले. फूटपाथवर बसून माल विकण्यासाठी त्यांना लायसन्स मिळवून देण्यात 'सेवा'ला यश मिळाले.

स्वतःच्या गुजराणीसाठी कमाई करू लागलेल्या स्त्रियांना वेळप्रसंगी उपयोगास येण्यासाठी पैशाची बचत करता यावी म्हणून सेवाने बचतयोजना सुरू केलीय. बँकेत खाती काढून द्यायची व हवे असेल त्यांना कर्ज मिळवून द्यायचे हे काम 'सेवा'च्या कार्यकर्त्या करतात. १९८१ मध्ये ८०० रु. ची बचत झाली होती. आज ती रक्कम ५० हजार रुपये आहे. आज ५०० जणी बचत-योजनेच्या सदस्य आहेत. जवळजवळ चाळीस सदस्यांना आठ हजार रुपये कर्ज देण्यात आलंय. असाच दुसरा उपक्रम म्हणजे 'गट-विमा योजना' ह्याचा फायदा २६२ महिला-सदस्यांना सध्या मिळत आहे. ह्या सदस्यांनी १४०० रु. भरले आहेत. ह्या सदस्यांपैकी दोन भगिनींचा अचानक मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या परिवाराला प्रत्येकी एक हजार रुपये मिळाले. बचतयोजनेचे महत्त्व महिलांना कळू लागले आहे. पूर्वी फक्त दोन रु. बचत करणाऱ्या आता जमलं तर शंभर रुपयेही शिलकीत टाकतात. ह्या दोन्ही योजनांना चांगला प्रतिसाद मिळतोय. कारण ह्या भगिनी म्हणतात 'कफन हो तो सेवा का ही हो.'

नुकतीच एक नवी योजना 'सेवा' ने हाती घेतलीय. कचऱ्यातून रद्दीकागद वेचणारी मुले दिल्लीतील निजामउद्दिन भागातच ५०० आहेत. 'सेवा'ने ह्या मुलांना शिक्षण देणे, त्यांना वैद्यकीय मदत करणे, पोषक देणे, स्वच्छता राखायला शिकवणे अशा प्रकारचं काम सुरू केलंय. सध्या फक्त ५० मुलं आहेत. ह्या मुलांना एकत्र करण्याचं कामच फार जिकिरीचं आहे. दिवसातून दोन-तीन फेऱ्या करून वेचलेला माल ठेकेदाराला दिल्यावर दुपारचाच वेळ असतो. ह्या वेळात त्यांना गोळा करून आणणे फार कठीण. तरीही हे काम नेटाने चालू आहे. ह्या मुलांना 'सेवा'ने रबरी हातमोजे दिले आहेत. ज्यांना रद्दी वेचायला दूर जावे लागते अशा २-३ मुलांना सायकली मिळवून दिल्या आहेत. एखादा मुलगा दोन दिवस रद्दी वेचायला गेला नाही की त्यांचा ठेकेदार तक्रार करण्यासाठी लगेच 'सेवा'कडे येतो. ह्या मुलांना धंदेशिक्षण द्यायचा 'सेवा'चा मानस आहे.

अशी कामे करणाऱ्या ह्या 'सेवा' च्या वर्धापनदिनी कमरुन्निसा आमच्या कार्यकर्त्यांनाच सर्व कामाचे श्रेय देताना म्हणतात, 'यह लोग इन्सान तो है पर फरिश्ते से ज्यादा है' मनिलाला झालेल्या परिषदेत 'सेवा'च्या दोन सदस्यांनी भाग घेतल्याचे त्यांनी सांगितले.

वर्षभर काम केल्यानंतर सदस्यांना प्रोत्साहन मिळावं म्हणून बक्षिसे ठेवण्यात आली होती. मुख्य कार्यकारी पार्षद श्री. जगप्रवेशचंद्र यांच्या हस्ते बक्षीससमारंभ झाला.

नियमितपणे जास्तीत जास्त बचत करणाऱ्यांना आणि आवश्यकता असली तरच त्या बचतीतून कमीत कमी पैसे उचलणाऱ्या १५-२० बायकांना बक्षिसं मिळाली. त्यात अंगुरीदेवी, नूरजहां नजमा, अलकाराणी, मुन्नीबाई ह्या पहिल्या क्रमांकावर होत्या.

दुसरं बक्षीस नेतृत्वासाठी देण्यात आलं. लिफाफे बनविणाऱ्या भगिनींना आपल्या भागात दुसऱ्या लोकांकडून बराच त्रास होतो. दर वाढवून मिळत नाही. हे सर्व करवून घेत त्या भगिनींना संघटित करून दाखवणाऱ्या शांती व समीरन ह्यांना हे बक्षीस देण्यात आले

'दस्तकारी बझारा'त आपलं दुकान व्यवस्थित मांडून, विकलेल्या मालाचा व्यवस्थित हिशोब ठेवणाऱ्या भगिनीलाही एक बक्षीस देण्यात आले.

कचऱ्यातून रद्दी वेचणाऱ्या मुलांना एकत्र आणणाऱ्या हुस्नाबी नावाच्या कार्यकर्तीलाही बक्षीस दिले. नंतर झालेल्या लकी-डीपमध्ये बऱ्याच जणींच्या भाग्याचा निर्णय झाला.

आजपर्यंत अनेक शासनाधिकाऱ्यांनी सेवाला मदतीचे आश्वासन दिले आहे. आताही मुख्य कार्यकारी पार्षद ह्यांनी मदत करायचे कबूल केले. श्रीमती ताज्जदार बाबद ह्यांनी पॉलिथिन थैल्या बनविण्याची योजना 'सेवा' पुढे ठेवली आहे व त्यासाठी 'चौसष्ट खंभा' येथे जागा देण्याचं कबूल केलंय. हे शासनाधिकारी आता 'सेवा' ची दखल घेऊ लागले आहेत. हे 'सेवा' ला मान्यताप्राप्त झाल्याचे लक्षण आहे. एका सर्वस्वी वेगळ्या आयामाने 'सेवा' ने अवघ्या चार वर्षांत केलेली ही समाजसेवा शहरोशहरी अनुकरण करण्यासारखी आहे.

—सौ. प्रज्ञा तपस्वी

## मुक्काम हैदराबाद (२)

# एन. टी. आर. ने दिलेल्या आश्वासनांचे काय झाले?

सुभाष काळे

मोगल साम्राज्याच्या उतरत्या काळात चिन कुलीज खान ऊर्फ निजाम उलमुल्क आसफजहा हा दक्षिणेचा सुभेदार म्हणून हैद्राबादला आला व मोगल राजवटीच्या ऱ्हासाचा फायदा घेऊन त्याने इ. स. १७२४ पर्यन्त हैद्राबादला स्वतंत्र राज्याचे स्वरूप आणले. उल्कमुल्क हा पहिला निजाम. त्यानंतरच्या १२४ वर्षांत सहा निजाम झाले. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला व १३ सप्टेंबर १९४८ ला सायंकाळी भारतीय फौजा हैद्राबाद संस्थानात घुसल्या! १४-१५ च्या घुमश्चक्रीनंतर १६ सप्टेंबरला सायंकाळी मीर उस्मान अलीखान या धूर्त, धर्मांध व महत्त्वाकांक्षी सहाव्या निजामाने शरणागती पत्करली आणि १७ सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद राज्याचे हिरवे निशाण अधिकृतपणे खाली उतरले!

पोलीसअॅक्शनबरोबर निजामी राजवट अस्ताला गेली. त्यांची जागा स्टेट कॉंग्रेसने घेतली. त्यानंतर लगेच झालेल्या भाषिक प्रांतरचनेत उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, परभणी, नांदेड हे मराठवाड्याचे पाच जिल्हे महाराष्ट्रात गेले व उरलेला भाग 'आंध्र प्रदेश' नावाने अस्तित्वात आला. पुनर्रचित आंध्रप्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून कॉंग्रेसच्या बी. रामकृष्ण राव यांनी शपथ घेतली. बी. रामकृष्ण राव ते विजय भास्कर रेड्डीपर्यंत पूर्ण तेहतीस वर्षे १९८३ पर्यंत कॉंग्रेस पक्ष सत्तेवर होता. या तेहतीस वर्षांच्या काळात देशाच्या राजकारणात अनेक उलाढाली झाल्या. अनेक प्रयोग झाले. १९६७ ला पंजाब, बिहार, हरियाना, प. बंगाल, म. प्रदेश, उ. प्रदेश, राजस्तान, केरळ या प्रांतांतील कॉंग्रेसचे निर्विवाद बहुमत संपले. या सर्व ठिकाणी संयुक्त आघाड्यांचे प्रयोग केले गेले. केरळ, प. बंगाल, पॉंडेचरो, त्रिपुरात मार्क्सवादी सत्तेवर आले. पंजाबात अकालीदल व जनसंघासह सहा-सात पक्षांचे संयुक्त मंत्रिमंडळ तर उ. प्रदेश, बिहार, म. प्रदेशमध्ये संयुक्त विधायक दलांनी कारभार हातात घेतला. गुजरातेत नवनिर्माणने तर काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सने सत्ताधारी म्हणून राजकारणात पुन: प्रवेश केला. पाठोपाठ १९७७ला केंद्रातलीही कॉंग्रेसची सत्ता संपली. स्वातंत्र्योत्तर पस्तीस वर्षांच्या काळात केंद्र व राज्यात ही उलथापालथ घडत असताना केवळ दोन राज्ये अभंग होती. पहिला कर्नाटक व दुसरा आंध्र प्रदेश!

२३ मार्च १९७७ ला निवडणूक निकालाचे पहिले वार्तापत्र घोषित झाले ते ब्रह्मानंद रेड्डींच्या विजयाचे. उत्तरेत कॉंग्रेसचे रथीमहारथी कोसळत असताना आंध्रप्रदेशात कॉंग्रेस एकेक जागा पदरात पाडून घेत होती. पंजाब, हरियाना, उ. प्रदेश, बिहार, राजस्तान, गुजरात, मध्यप्रदेश, हिमाचलप्रदेश या राज्यांत कॉंग्रेसला लोकसभेची एकही जागा मिळाली नाही. महाराष्ट्रात निम्म्याच्या जवळपास जागा मिळाल्या. अभेद्य किल्ला राहिला तो कर्नाटक व आंध्राचा. जनता पक्षाने लोकसभेतील अपूर्व विजयानंतर नऊ प्रांतांत विधानसभा-निवडणुका घेतल्या व त्या सर्व ठिकाणी जनता पक्षाची सरकारे अस्तित्वात आली. जनतालाट जबरदस्त होती यात शंकाच नाही! कधी नव्हे तो महाराष्ट्रात देखील कॉंग्रेसला प्रचंड हादरा बसला! पुलोदची निर्मिती झाली. त्यानंतर कर्नाटक व आंध्रात जनता पक्षाला यश मिळेल असे वाटले; पण जनता पक्षाला दारुण पराभव पत्करावा लागला. कर्नाटकात इंदिरा कॉंग्रेसचे देवराज अर्स व आंध्रात त्याच पक्षाचे डॉ. एम्. के. चेन्ना रेड्डी सत्तेवर आले. उत्तरेतून आलेली जनतालाट दक्षिणेतल्या या दोन प्रांतांनी यशस्वीपणे थोपवली. पराभूत इंदिरा गांधींनी या दोन राज्यांच्या बळावर राजकारणात उभारी घेतली. कर्नाटकातल्या चिकमंगळूरमधून त्या परत लोकसभेत गेल्या. भारतात कुठेही आधार नसताना इंदिराजींनी केवळ या दोन राज्यांच्या बळावर १९८० च्या लोकसभा निवडणूक-मैदानात त्या उतरल्या व परत पंतप्रधान बनल्या! १९७७ मधील दारुण पराभवाचा वचपा त्यांनी १९८० च्या अपूर्व विजयाने घेतला व जनता पक्षाची पुरती ससेहोलपट केली!

१९८० मध्ये सत्ता हाती घेतल्यानंतर १९८३ मध्ये इंदिराजींनी कर्नाटक व आंध्रात निवडणुका घेतल्या. अडचणीच्या काळात जी राज्ये आपल्या पाठीशी होती ती चांगल्या काळात बरोबर का राहणार नाहीत? इंदिराजींचा सवाल बिनतोड होता; पण तेहतीस वर्षे सातत्याने चालू असलेले भ्रष्ट, दुबळे, लाचार, बेमुर्वतखोर नेतृत्व झिडकारायचा निर्णय आंध्रवासियांनी घेतला होता. तेलगु जनतेने कॉंग्रेस व इंदिराजींना लाथाडले. 'तेलगुदेसम्' ची राजवट व एन. टी. रामाराव हा नवा नेता मान्य केला. भारतीय राजकारणातला हा एक अपूर्व चमत्कार होता. स्थापनेनंतर अवघ्या नऊ महिन्यात सत्तापदावर चढणारा हा एकमेव पक्ष होता! १९७७ मध्ये जनता पक्षाने, स्थापनेनंतर एका महिन्यात सत्तेवर येण्याचा चमत्कार करून दाखविला होता हे खरे असले तरी जनता पक्षातले घटक पक्ष जुने होते. सत्तेच्या राजकारणात अनेक वर्षांपासून वावरत होते, याकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्या दृष्टीने 'तेलगुदेसम्' हा पक्ष व त्यातली मंडळी नव्याने मतदारांपुढे आली होती हे

लक्षात घ्यायला हवे.

'तेलगुदेसमचा' विजय अभूतपूर्व होता. त्याची दखल देशातील वृत्तपत्रांनी तर घेतलीच घेतली; पण इंग्लंड–अमेरिकेतील वृत्तपत्रांनीही घेतली. वॉशिंग्टन पोस्टने इंदिराजींची प्रतिमा दक्षिणेत डागाळल्याचे, तर ख्रिश्चन सायन्स मॉनिटरने राजीव गांधींच्या होऊ घातलेल्या पुढारपणाला हा धोका असल्याचे म्हटले. अशाच प्रकारची प्रतिक्रिया गार्डियनने व्यक्त केली तर न्यूयॉर्क टाइम्सने मध्यावधी निवडणुकांची अपरिहार्यता व्यक्त केली. परदेशी वृत्तपत्रांत हा गाजावाजा होत असताना भारतात 'भारताचा दक्षिणेकडील पहिला भावी पंतप्रधान' म्हणून रामारावांची सार्वजनिक ठिकाणी चर्चाही सुरू झाली होती.

'तेलगुदेसम' ज्या प्रतिमेमुळे सत्तेवर आला किंवा 'तेलगुदेसम्' च्या यशात ज्याचा सिंहाचा वाटा आहे अशी व्यक्ती म्हणजे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव! आंध्रातल्या लोकांनी 'तेलगुदेसम्' ला जे डोक्यावर घेतले ते एन. टी. रामाराव यांच्यामुळेच. हे रामाराव कुठले? कोण? राजकारणाचे तोंडही कधी न पाहिलेला माणूस एवढे यश कसे मिळवू शकला? हे प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे. त्या दृष्टीने रामाराव यांची थोडक्यात पूर्वपीठिका जाणून घेऊ या. त्यामुळे 'तेलगुदेसम्' च्या राजवटीचे धागेदोरे समजून घेणे सोयीचे ठरेल.

एन. टी. रामाराव यांचे पूर्ण नाव नंदामुदी तारक रामाराव आहे; परंतु ते एन. टी. आर. या नावानेच अधिक लोकप्रिय आहेत. एन. टी. रामारावांचा जन्म २८ मे १९२३ रोजी कृष्णा जिल्ह्यातील गुजेवाडा येथे झाला. पुढील महिन्याच्या २८ तारखेला त्यांना ६१ वर्षे पूर्ण होतात. एन. टी. आर. ना मुले व मुली मिळून एकंदर अकरा अपत्ये आहेत.

मध्यमवर्गीय शेतकरीकुटुंबात जन्मलेल्या रामारावांचे शालेय व पदवीपर्यंतचे शिक्षण गुंटूर व विजयवाडा येथे झाले. कॉलेजमध्ये असताना ते नाटकांत कामे करीत असत, तेवढाच काय तो त्यांचा अभिनयाशी संबंध. पदवी प्राप्तीनंतर मित्रांनी त्यांची व सुप्रसिद्ध दाक्षिणात्य दिग्दर्शक श्री. एल. व्ही. प्रसाद यांची भेट घडवून आणली. तसे एल. व्ही. प्रसाद एका नव्या चेहऱ्याच्या शोधात होतेच. त्यांनी लगेच एन. टी. रामाराव यांची २१ मे १९४७ रोजी 'द्रोही' या सिनेमाच्या सेटवर स्क्रीन टेस्ट घेऊन टाकली त्यात ते योग्यही ठरले; पण कौटुंबिक जबाबदारी असल्याकारणाने एन. टी. आर. ने नोकरीला प्राधान्य दिले. नोकरीसाठी त्यांनी लोकसेवाआयोगाची परीक्षा दिली व त्यात ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पाठोपाठ गुंटूर जिल्हाधिकारी कार्यालयात रिझर्व्हड, सबरजिस्ट्रार म्हणून त्यांनी चार्ज घेतला; पण नोकरीत त्यांनी खितपत पडावे असे नियतीला वाटत नव्हते. अवघ्या २१ दिवसात त्यागपत्र देऊन त्यांनी चित्रपटक्षेत्रात पदार्पण केले. त्यांचा पहिला चित्रपट 'मना देसम्' (माझा देश). त्यानंतर 'माया-रंभा' 'संसारम्' यासारख्या चित्रपटांतून लहानमोठी कामे ते मिळवीत गेले. गेली ३५ वर्षे एन. टी. रामाराव चित्रपटक्षेत्रात आहेत. आतापर्यंत त्यांनी एकंदर ३०० चित्रपटांतून ५०० भूमिका केलेल्या आहेत. यात सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक या सर्व प्रकारच्या भूमिका असल्या तरी त्यांची आंध्रातल्या जनमानसात जी भूमिका ठसली आहे ती श्रीरामचंद्राची, श्रीकृष्णाची, लक्षावधी तेलगू माणसे त्यांना याच रूपात पाहतात. आदर्श मानतात. इतकेच नव्हे, प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण म्हणून त्यांच्या पायांवर डोके ठेवतात. तेलगुदेसमच्या, त्याचप्रमाणे स्वतः एन. टी. रामारावच्या यशात या भूमिकांचा फार मोठा वाटा आहे. एन. टी. आर. म्हणजे थोडक्यात आपल्याकडचे 'शाहू मोडक.' शाहू मोडकचा श्रीराम किंवा श्रीकृष्ण आजही जुन्या मंडळींच्या नजरेसमोरून हललेला नाही. धर्म, चारित्र्य, आदर्श असा तो संयुक्त परिणाम आहे.

## १२०० फॅन क्लब्स

एन. टी. आर. ची व त्यांच्या चाहत्यांची आवडती भूमिकाही तीच आहे. असे असले तरी त्यांनी इतरही भूमिका केलेल्या आहेत. अगदी स्त्रीभूमिकादेखील. 'श्रीमद् विराटपर्वम्' या त्यांच्या गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या चित्रपटात त्यांनी कीचक, अर्जुन, बृहन्नडा, दुर्योधन आणि कृष्ण अशा पाच भूमिका केलेल्या आहेत. 'श्रीमद विराटपर्वत'चे निर्माता, दिग्दर्शक स्वतः एन. टी. रामारावच आहेत. त्यांनी आपल्या चित्रपटकारकीर्दीच्या प्रारंभाला 'नया आदमी' 'पाताळ भैरवी' 'चंद्री राणी' यासारख्या हिंदी चित्रपटांतूनही अनेक भूमिका केलेल्या आहेत. साहजिकच त्यांचे चाहतेही अमाप आहेत. आंध्रप्रदेशात त्यांच्या चाहत्यांच्या १२०० संघटना (फॅन क्लब्स) आहेत. आपल्याकडील सोलापुरातदेखील पाच-पंचवीस 'फॅन क्लब्स' आहेत.

अशा या अमाप पैसा व कीर्ती लाभलेल्या कर्तबगार चित्रपटकलावंताने २९ मार्च १९८२ ला राजकारणात प्रवेश केला व अवघ्या नऊ महिन्यात अपूर्व यश मिळवून ९ जानेवारी १९८३ ला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

एन. टी. आर. अमाप पैसा व कीर्ती लाभलेले कलावंत असले तरी मांसभक्षण, मद्यपान, धूम्रपान यांपासून पूर्णपणे अलिप्त आहेत. भल्या पहाटेच उठून योगासने, स्नान, पूजा–अर्चा करतात. वृत्तीने ते अतिशय धार्मिक आहेत. सर्वसाधारण मध्यम उंची व गरगरीत शरीरयष्टी असलेल्या एन. टी. आर. ची राहाणी मात्र साधीच आहे. धोतर, झब्बा, खांद्यावर पंचाची घडी टाकलेली, नजरेत भरण्याजोगे कपाळावरील भस्म व मोठा कुंकवाचा टिळा, गळयात रुद्राक्षांची माळ, डाव्या कानात कुडीसारखी मोठी सोन्याची भिकबाळी. रामारावांचा एकंदर 'रामअवतार' पाहून मला पंढरपूरच्या बडवेमंडळींची आठवण झाली. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यापूर्वी त्यांनी प्रथम तिरुपतीला जाऊन मुंडन करून घेतले होते. ते तेलगुइतकेच इंग्रजी, हिंदी सफाईदारपणे बोलतात. बोलताना त्यांच्या भाषेत चित्रपटातील डायलॉगप्रमाणे चढउतार होत असले तरी एकंदरीत त्यांच्या भाषेत मार्दव आहे.

प्रभु रामचंद्र किंवा श्रीकृष्णाच्या भूमिका एन. टी. आर. करतात म्हणण्यापेक्षा त्या जगतात म्हणणे योग्य ठरेल. कारण त्यांच्या भूमिकांना भक्तिभावाची बैठक आहे. भूमिका वठवताना ते त्या तंद्रीतच राहतात. एक प्रकारचे पावित्र्यमय, भक्तीभावपूर्ण वातावरण त्यांनी आपल्या अभिनयाभोवती

निर्माण केले आहे. ते वातावरण मुंबईच्या स्टुडिओत नसेल, म्हणून या एका कारणाने मुंबईच्या निर्मात्याने देऊ केलेली श्रीकृष्णाची भूमिका एन. टी. आर. ने नाकारली. अभिनय करतानाचा रामकृष्णाच्या अलौकिकत्वाचा प्रभाव आपल्या जीवनावर कायम ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने चालविलेला आहे. या प्रभावावरून मला रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक श्री.गोळवलकरगुरुजी यांनी सांगितलेली प्रभुरामचंद्राची गोष्ट आठवली. त्यांनी ती १९६८ मध्ये पुण्याच्या संघशिक्षावर्गातही सांगितली होती. ती अशी—

.. एक दिवस निराश होऊन बसलेला रावण बघून त्याच्या धाकटया भावाला —बिभीषणाला आश्चर्य वाटते. साहजिकच त्याने त्याबद्दल रावणाला विचारले. त्या वेळी रावण म्हणाला— 'अरे, काय सांगायचे बिभीषणा ? मी सीता वनातून पळवून आणली खरी; पण ती काही वश होत नाही. तेव्हा काय करावे ? हा प्रश्न पडला आहे.'

—त्यावर बिभीषण म्हणाला, 'अरे, त्यात काय मोठे अवघड ? तू रामाचे रूप धारण कर आणि तिला भेटायला जा. बघ ती वश होते की नाही ते.'

बिभीषणाच्या सल्ल्यानंतर रावणाने उत्तर दिले, 'बिभीषणा, तू म्हणतोस त्याप्रमाणे मी प्रयत्न केला; पण होते काय, तर मी ज्या वेळी प्रभु रामचंद्राचे रूप घेऊन सीतेपुढे जातो तेव्हा माझ्या मनात एकपत्नीत्वाची भावना निर्माण होते व लगेचच मी तेथून परततो.'

या गोष्टीतल्याप्रमाणे एन. टी. आर. यांच्यावर प्रभु रामचंद्राचा व श्रीकृष्णाचा अभिनय करताना त्यांच्या गुणांचा प्रभाव पडलेला आहे. आयुष्याची ३५ वर्षे चित्रपटक्षेत्रात काढलेला हा सोज्ज्वळ कलाकार आयुष्याच्या उत्तरार्धात राजकारणाच्या आखाड्यात उतरलेला आहे. तेलगुदेसमचा प्रतिनिधी या नात्याने सत्तेवर आरूढ झाला आहे.

एन. टी. रामाराव यांनी २९४ पैकी २०० जागा जिंकून निर्विवाद बहुमत प्राप्त केले. आंध्रप्रदेशाची लोकसंख्या ५३४०३६१९ आहे. त्यात दोन कोटी पंचेचाळीस लाख मतदार आहेत. ४० टक्के म्हणजे ९८ लाख लोकांनी त्यांना मते दिली. ही मते खेचून घेण्यासाठी त्यांनी मतदारांना अनेक आश्वासने दिली. त्यात, शांतता व सुव्यवस्था, समाजातील प्रत्येक घटकाला न्याय, जमिनीचे फेरवाटप, जीवनावश्यक वस्तूंच्या मर्यादित किंमती, स्वस्त धान्य, लोकाभिमुख शिक्षण, भ्रष्टाचारविरहित स्वच्छ प्रशासन यासारख्या अमूर्त गोलमाल आश्वासनांखेरीज 'दोन रुपये किलो तांदूळ, ६ वी ते ११ वीच्या मुलांना दुपारचे मोफत जेवण.' अशा प्रत्यक्ष परिणाम घडविणाऱ्या आश्वासनांची मतदारांवर अक्षरशः खैरात केली. साहजिकच दारिद्र्य, भ्रष्टाचार, हालअपेष्टात पिचत पडलेल्या तेलंगणातील लोकांना संजीवनी लाभल्याचा आनंद न झाला तरच नवल. त्यांनी काँग्रेसला खाली खेचून एन. टी. आर. ना व त्यांच्या तेलगुदेसमला सत्तेवर बसू दिले.

एन. टी. रामाराव यांनी ९ जानेवारी १९८३ ला सत्ता हाती घेतली. त्यांच्या राजवटीला आता पंधरा महिने पूर्ण झाले आहेत. तीन महिन्यांपूर्वी एन. टी. आर. प्रशासनाचा वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरा झाला. या कार्यक्रमात रामाराव आपल्या वर्षाच्या कामकाजाचा आढावा घेतील असे वाटले होते; पण त्यांनी निराशा केली. काय झाले त्या भरमसाठ आश्वासनांचे ? त्यातली किती प्रत्यक्षात आली ? कितीसाठी प्रयत्न झाले ? वास्तविक पाहता एक आदर्शवादी मुख्यमंत्री म्हणून त्यांनी आपल्या वर्षातील कार्याची बेरीज—वजाबाकी लोकांपुढे ठेवायला हवी होती. जमाखर्च मांडायला पाहिजे होता; पण त्यांनी ते न करता उलट महसूलकर रद्द करण्यासारखी आकर्षक आश्वासने नव्याने लोकांना दिली आहेत. नुसत्या आकर्षक घोषणांनी राज्य कसे चालणार ?

एन. टी. रामारावनी दोन रुपये किलो तांदूळ देण्याचे आश्वासन मतदारांना दिले होते. शपथविधीनंतर लगोलाग या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी पावलेही उचलली गेली. दोन रुपये भावाने एका कार्डावर पंचवीस किलो तांदूळ कमी उत्पादन गटातल्या लोकांना व तोच तांदूळ २ रुपये ६५ पैसे दराने मध्यमवर्गीयांना वाटण्याचे काम धुमधडाक्याने सुरू झाले. गोरगरिबांना मुख्यमंत्री एन. टी. रामाराव दोन रुपये किलोचा तांदूळ स्वतः घालीत असल्याची छायाचित्रे वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली. जेमतेम तीन—चार महिने हे चालले असेल नसेल तोच त्यातला आतबट्ट्याचा व्यवहार 'तेलगुदेसम' च्या लक्षात आला. बाजारभावापेक्षा कमी दराने तांदूळ विकायचा म्हणजे सबसिडी देऊन तोटा शासनाने अंगावर घेण्याचा प्रकार. त्यासाठी मग भातगिरणीवाल्यांकडून लेव्हीने तांदूळ घेण्याचा प्रयत्न तेलगुदेसम शासनाने केला. साहजिकच त्याला गिरणीवाल्यांनी जोरदार विरोध केला. काही काळ गिरणीमालक विरोधात तेलगुदेसम असा संघर्ष झाला व त्यात तडजोड निघाली. तडजोडीप्रमाणे लेव्हीव्यतिरिक्तचा बाकीचा तांदूळ खुल्या बाजारात जादा भावाने विक्रीस गिरणीवाल्यांना शासनाने परवानगी दिली. गिरणीवाल्यांनी जाडा—भरडा तांदूळ दोन रुपये दराने विकून त्यातली थोडीफार राहिलेली कसर काढण्यासाठी चांगला तांदूळ भरमसाठ किंमतीने विकला व त्यात करोडो रुपये मिळविले. जाडा, भरडा तांदूळ खालच्या घटकांखेरीज इतर कोणाला मिळत नव्हता. तोही कार्डामागे पंचवीस किलो फक्त, त्यामुळे इतर घटकांच्या लोकांना झक मारीत चांगला तांदूळ जादा भावाने खरेदी करावा लागतो. व्यावहारिक बाजू लक्षात न घेता, तपशीलवार योजना न आखता केवळ घोषणा केली आहे, ती राबवायलाच पाहिजे म्हणून राबवली गेलेली ही योजना आता पार निकालात निघाली आहे. लोकांच्या खिशाला चाट बसली. शासनाला फायदा नाही. व्यापारीवर्ग मात्र गैल्या भरभरून बसला आहे.

## एन्. टी. आर. इडली

तेलगुदेसमने सत्ता हाती घेताच दुसरी केलेली आकर्षक घोषणा म्हणजे स्वस्त इडली, चहा, कॉफीची घोषणा. त्यांनी हॉटेलमालकांशी विचारविनिमय वगैरे न करता चटकन दर देखील जाहीर केले. डबल इडली पंचावन्न पैसे. चहा चाळीस पैसे व कॉफी पन्नास पैसे. या घोषणेने सर्वसामान्य जनता खुष झाली. लोकांनी फटाके वाजवून स्वागत केले. त्या वेळी डबल इडली एक रुपया, चहा साठ पैसे व कॉफी ऐंशी पैसे असा दर होता. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचे एकीकडे स्वागत होत असताना दुसरीकडे हॉटेलवाल्यांनी हॉटेले बंद ठेवून निषेध केला. हा बंद आठ-

वडाभर पाळला गेला. शेवटी तो एन. टी. आर. नी कसावसा वाटाघाटीने मिटवला. त्यासाठी तांदूळप्रकरणात काढला तसाच शॉर्टकट काढण्यात आला. तो म्हणजे पंचावन्न पैसे डबल इडली, चाळीस पैसे चहा व पन्नास पैसे कॉफी ही एन. टी. आर. स्कीम चालूच राहील; पण त्याशिवायचे दर हॉटेलमालकांना परवडतील त्याप्रमाणे राहतील असे ठरले. हॉटेलवाल्यांनी तांदूळ गिरणीमालकांप्रमाणे दुहेरी किंमत-तंत्र अवलंबिले. एन. टी. आर. स्कीमच्या पदार्थाचा तोच दर कायम ठेवून इतर इडलीला एक रुपया वीस पैसे, चहा ऐंशी पैसे व कॉफी एक रुपया हे दर सुरू केले. हॉटेलमधील गिऱ्हाइकाने इडली, चहा, कॉफी मागितली की, वेटर पहिला प्रश्न विचारणार कोणती? एन. टी. आर. की, जनरल? गिऱ्हाइकाने एन. टी. आर. म्हटले की, अगदी सुपारीच्या आकाराच्या दोन इडल्या व त्यावर मोजून पळीभर सांबर. चहा मागितला की, नुसते उकळलेले गरम पाणी व कॉफी म्हटले की, फुळुक पाणी वेटर समोर आणून ठेवतो. जनरल म्हटले की, तेलगुदेसम सरकार अस्तित्वात येण्यापूर्वी प्रचलित असलेल्या आकारातल्या दोन इडल्या किंवा चहा किंवा कॉफी नेहमीची आणून ठेवतो, किंमत मात्र इडली एक रुपया वीस पैसे, चहा ऐंशी पैसे व कॉफी रुपया. या सर्व प्रकारामुळे सध्या हैद्राबादेत एन. टी. आर. इडली, चहा कॉफी हा टिंगलीचा विषय बनला आहे. बाकी हॉटेलवाल्यांनी मात्र हात मारून घेतला. या एन. टी. आर. स्कीमची टवाळी 'आज का एम. एल. ए. रामअवतार' या चित्रपटातही आहे. चित्रपटात मुख्यमंत्री राम अवतार हॉटेलवाल्यांना दर कमी करायला सांगतो. ते दुप्पट करतात. त्यावर लोक निदर्शने करतात, तेव्हा तो एकपट कमी करून वाढीव रेट याप्रमाणे लोकांच्या गळी उतरवितो. नेमका हाच प्रकार एन. टी. आर. चहा-इडली-प्रकरणात घडला. विधानभवनाच्या जवळच असलेल्या वातानुकूलित, 'कामत हॉटेलमध्ये' गेलो असताना मी इडली मागितली. त्याबरोबर वेटरने कोणती? म्हणून प्रश्न विचारला. त्याचा एकंदर टवाळीचा आविर्भाव पाहून, मी हॉटेलमालकाकडे तक्रार केली. तेव्हा हॉटेलमालकाने जवळ बसवून घेऊन 'एन. टी. आर. इडली, चहा, कॉफी-प्रकरण समजावून सांगितले व



दोन रुपये किलो तांदूळ-योजना – एन्. टी. आर्. तांदुळ देताना

¤


त्यानंतरच्या गमती-जमतीचे किस्सेही सांगितले.

निवडणुकीच्या काळात, विद्यार्थ्यांना दुपारचे मोफत जेवण देण्याची योजना एन. टी. आर. नी मतदारांपुढे मांडली होती. एन. टी. आर. सत्तेवर येताच ती राबवायला प्रारंभ झाला. खरेखरच ही योजना फार चांगली आहे. आंध्रापूर्वी, तामिळनाडू व केरळ शासनाने ती राबविली आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतात, अनेक कॉन्व्हेंट शाळांमधून चालू आहे. त्या दृष्टीने तेलगुदेसमचा हा प्रयत्न चांगलाच होता, यात वाद नाही; पण कार्यक्रमात योजना व सुसूत्रता नसल्याने 'दुपारचे जेवण' योजनेत भ्रष्टाचार माजला आहे. एन. टी. आर. इडली, चहा-कॉफीसारखी या योजनेची अवस्था नसली तरी त्यातला भ्रष्टाचार ही स्कीम गिळंकृत करील अशी भीती वाटण्याइतपत परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे. या योजनेतला भ्रष्टाचार थोपविण्यास 'तेलगुदेसम' सरकार असमर्थ ठरले आहे.

तेलगुदेसमच्या धोरणाची दिवाळखोरी ज्या प्रकरणाने देशभर गाजली, ते प्रकरण म्हणजे मेडिकल कॉलेज व इंजिनिअरिंग कॉलेजमधील कॅपिटेशनफी रद्द करण्याची घोषणा. कॅपिटेशनफी रद्द केल्याच्या घोषणेबरोबरच त्यांनी, अशी फी घेणारी खाजगी कॉलेजस्, वेळप्रसंगी ताब्यात घेण्यासही सरकार मागेपुढे पाहणार नाही अशी तंबी दिली. त्यातूनच विजयवाडा येथील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजचे प्रकरण उद्भवले.

## सिद्धार्थ मेडिकल

विजयवाडाचे सिद्धार्थ मेडिकल कॉलेज हे पूर्णपणे खाजगी कॉलेज आहे. त्याला इंडियन मेडिकल कौन्सिलची मान्यता नाही. पूर्वपरवानगी न घेता कॉलेज सुरू केले हा एक भाग. तसा दुसरा भाग म्हणजे कॉलेजला इमारत नाही, वर्गाची सोय नाही, प्राध्यापक नाहीत, वैद्यकीय उपकरणे, प्रयोगशाळा, इस्पितळ यांचीही बोंबाबोंब! तरीही कॉलेजच्या व्यवस्थापकांनी दणकावून कॉलेज सुरू केले. व्यवस्थापकांनी हे धाडस कसे केले? तर त्या वेळी म्हणजे कॉलेज सुरू करतेवेळी इंदिरा काँग्रेस सत्तेवर होती. विद्यार्थ्यांकडून भरपूर कॅपिटेशनफी घेऊन कॉलेजउभारणी करण्याचा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणे त्यांनी जून ८२ च्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. काँग्रेस सरकार



**'तेलगु गंगा' कार्यक्रमाचे उद्‌घाटनही झाले—**
**या कार्यक्रमात एम्. जी. आर्. आणि एन्. टी. आर.**

¤

आले असते तर सर्व काही सुरळीत घडले असते यात शंकाच नाही; पण तेलगुदेसम येण्याने सर्वच घोटाळा झाला.

कॅपिटेशनफी रद्द केल्यापाठोपाठ एन. टी. रामाराव यांनी सांगितले की, शासन प्रथम १८ कोटी रुपये देईल व नंतर प्रतिवर्षी दोन कोटी रुपये खर्च करून अद्या-वत ३०० खाटांचे इस्पितळ उभे करील. अशी पुढील योजनेची तपशीलवार माहिती दिली. मग काय ? सर्व मेडिकलचे विद्यार्थी एकदम खुश ! विद्यार्थ्यांनी मोर्चे काढून घोष-णेचे स्वागत केले; पण लवकरच त्या स्वागतातली हवा गेली. हॉस्पिटल उभे करण्याएवढा पैसा शासन खर्च करू शकत नाही हे पाहून विधानसभेत, कॉलेज ताब्यात घेण्याचा सरकरचा विचार नसल्याचे एन. टी. आर. ने जाहीर केले. त्यामुळे खाजगी व्यवस्थापनाच्याच हाती कॉलेज चालवायचे तर पैसा हवा. परत कॉलेजव्यवस्थापकांनी धुमधडाक्याने पूर्वीपेक्षा पंधरा हजार रुपये जादा रक्कम कॅपिटेशनफी म्हणून वसूल करायला सुरुवात केली. तेव्हा विद्यार्थी संपावर गेले. विद्यार्थी व कॉलेज असा हा वाद सुरू झाल्यानंतर तेलगुदेसम्ने समेट घडवून आणला. कॉलेजने पैशासाठी परदेशां-तील भारतीयांच्या मुलांना प्राधान्य द्यावे असे ठरले. सिद्धार्थ कॉलेजमध्ये एकंदर जागा ११० आहेत. त्यापैकी ७५ जागा परदेशां-तील भारतीयांच्या मुलांना देऊन प्रत्येक विद्यार्थ्यामागे पंधरा डॉलर एवढी फी वसूल केली गेली. राहिलेल्या ३५ जागांत बाहेरच्या राज्यातून जे येतील त्यांना दीडलाख रुपये व आंध्रातल्या मुलांना पंचवीस हजार रुपये कन्सेशन—म्हणजे त्यांच्याकडून सव्वा लाख रुपये कॅपिटेशनफी घ्यायला सरकारने परवानगी दिली. हीच फी कॅपिटेशनफी रद्द करण्यापूर्वी फक्त १ लाख रु. होती. तेलगु—देसम्ने त्याची किंमत मात्र वाढवून ठेवली.

परदेशातील भारतीयांच्या मुलांना ज्या ७५ जागा दिल्या त्यांची कोणतीही पूर्व-परीक्षा कॉलेजने घेतली नाही. आंध्रप्रदेशात एकंदर ९०० मेडिकलच्या जागा आहेत. गंमत अशी की, या ९०० जागांवर सरकारच प्रवेश देते. राज्यातल्या सर्व मेडिकलकॉले-जेसमध्ये वर्षाची फी ३४० रु. आहे, तर सिद्धार्थ कॉलेजात ती वर्षाकाठी ७ हजार रुपये या तफावतीबद्दल एन. टी. रामाराव यांना हैदाबादच्या पत्रकारांनी छेडले. त्या वेळी तेथे उपस्थित असलेले संबंधित खात्याचे मंत्रीमहोदय चटकन म्हणाले, 'पत्रकारांनी विनाकारण बाऊ करू नये, आम्ही तो प्रश्न सोडविला आहे. सर्वांचीच फी वाढवून टाक-ण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.'

सरकारच्या या मूर्खपणाच्या धरसोड-वृत्तीवर विरोधी पक्षांनी टीकेची झोड उठ-विली. विधानसभेतील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री एन. टी. रामाराव म्हणाले की, 'आम्ही फक्त सिद्धार्थ कॉलेजला तीन वर्षे कॉलेज चालवायला अनुमती दिली आहे. परदेशातील भारतीयांच्या मुलांच्या कॅपिटेशन-फीवर बांधलेले रुग्णालय व कॉलेज दोन्ही सरकार ताब्यात घेईल. त्यावर जनतापक्षाचे आमदार श्री. जयपाल रेड्डी यांनी 'सरकार सरळ परदेशी मुलांकडून भरपूर कॅपिटेशन-फी घेऊन कॉलेज का चालवीत नाही ?' असा सवाल केला. तेव्हा एन. टी. रामाराव यांनी सरकारला आता त्यात पडायचे नाही म्हणून चक्क दोन्ही कानांवर हात ठेवला. विद्यार्थ्यांचा संप मिटवून चालू वर्षी तात्पुरता समझोता करण्यात तेलगुदेसम् सरकारला यश मिळाले असले तरी विद्यार्थ्यांचा प्रश्न अद्याप नीट मिटलेला नाही. तो येत्या नवीन शिक्षणवर्षाच्या तोंडाला पुन्हा उग्र रूप धारण करेल अशी परिस्थिती आहे.

## तेलगु-गंगा—प्रकल्प

राज्याची आर्थिक स्थिती, तपशीलवार योजना, तज्ज्ञांचा सल्ला याचा काहीही विचार न करता सवंग लोकप्रियतेसाठी घोषणा करायच्या आणि गळयात आल्या की, चक्क माघार घ्यायची हे एन. टी. रामाराव मंत्रिमंडळाचे वैशिष्टच बनले आहे. त्या दृष्टीने त्यांचे 'तेलगु गंगा प्रकल्पा'-चे प्रकरण बरेच उद्‌बोधक आहे. ते जरा सविस्तरपणाने पाहू.

मद्रासमध्ये पाण्याची एकदम टंचाई निर्माण झाली. अडचणीत आलेल्या थोरल्या आण्णा (एम. जी. आर.) ने धाकट्या आण्णाला (एन. टी. आर.ला) काही सह-कार्य मिळेल का म्हणून विचारणा केली. त्या वेळी मागचा—पुढचा विचार न करता एन. टी. आर. नी घोषणा करून टाकली की, मद्रासला पाणीपुरवठा करण्यासाठी व आंध्रातील सिंचनासाठी तेलगुदेशमचे सर-कार 'तेलगु गंगा प्रकल्प' हाती घेईल. घोषणेपाठोपाठ २० एप्रिल ८३ रोजी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन, यांच्या उपस्थितीत एन. टी. आर. शिलान्यास करून मोकळे झाले. शिलान्यास करण्यापूर्वी योजनेला एकंदर खर्च किती येणार ? हा खर्च कोण देणार ? कमी पडलेल्या पैशाची व्यवस्था काय ? तज्ज्ञमंडळींनी मान्यता दिली आहे की नाही याचा विचारच

नाही. आता १५ टिएमसी पाण्याची ६ अब्ज रुपयांच्या खर्चाची योजना म्हणजे काही पोरखेळ नव्हे. अशा या मोठया योजनांची चार-चार, पाच-पाच वर्षे नुसती आराखड्यात जातात. तज्ज्ञांच्या मते ठरलेल्या वेळात जरी ही योजना पूर्ण झाली तरी त्या काळात वाढत जाणाऱ्या किमतीचा वेग पाहता ही योजना ८ अब्ज रुपयांपेक्षा जास्त खर्चाची आहे आणि नेहमीपेक्षा जादा वेळ लागला तर १० अब्जच काय पण १५ अब्ज रुपयेदेखील कमी पडतील. आपल्याकडील जायकवाडी किंवा उजनीप्रकल्पाचा खेळखंडोबा यावरून हा अंदाज आपण करू शकतो.

तेलगु गंगा प्रकल्पाचा कालवा नेल्लोर-चित्तुर येथून जाणार असल्याने त्या भागातील अडीच लाख एकर जमीन पाण्याखाली भिजणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर करताच कडाप्पा, कर्नूल भागातील लोकांनी दंड थोपटले कारण कृष्णेतून ज्या ठिकाणी कालवा निघतो तेथून कडाप्पा, कर्नूल जिल्हे जवळच आहेत. शिवाय या दोन्ही जिल्ह्यांत नेहमीच पाणीटंचाई असल्याने त्या जिल्ह्यांना पाण्याची गरज अधिक होती. त्यांना वंचित ठेवून दूरच्या जिल्ह्यांना पाणीपुरवठा करण्याचे अन्याय्य धोरण पाहून कडाप्पाचे लोक आंदोलनासाठी मैदानात उतरले. तेव्हा कुठे एन. टी. आर. नी योजना बदलली.

योजनेत बदल केला तरी खर्चाचा प्रश्न मोठा होता. एन. टी. आर. नी 'प्रत्येक वर्षाला साठ कोटी रु. प्रमाणे तीन वर्षांचे तामीळनाडूने १ अब्ज ८० कोटी रु. द्यावेत' असे म्हटले होते. त्याप्रमाणे तामीळनाडू सरकारने एन. टी. आर. चे हात गुंतविण्यासाठी कोणत्याही वाटाघाटी, घासाघीस न करता ६० कोटी रुपयांचा पहिला हप्ता देऊन टाकला व तशी जाहीर घोषणाही केली. त्यामुळे एन. टी. आर. अधिकच अडचणीत आले. कारण या प्रकरणात त्यांनी केंद्राचा सल्ला घेतलेला नव्हता. त्यावर एन. टी. आर. ने मार्ग शोधला. राज्यात जे 'सोमशिला' नावाचे धरण सध्या चालू आहे त्यातून ५ कोटी ६ लाख रु. काढून ते तेलगू गंगाप्रकल्पावर खर्च करण्यात येतील असे जाहीर केले. 'सोमशिला'-साठी कमी पडणारा पैसा केंद्राने द्यावा, शिवाय तेलगू गंगाप्रकल्पासाठी वर्षाकाठी अडीच अब्ज रु. केंद्राने द्यावेत अशी मागणी त्यांनी केंद्राकडे केली. केंद्र पैसा कसा देणार? एक तर केंद्राची पूर्वसंमती न घेता प्रकल्प जाहीर करण्यात आला होता. दुसरा भाग म्हणजे तामीळनाडू सरकारने साठ कोटी रु., केंद्राने अडीच अब्ज याप्रमाणे योजनेचा सर्व खर्च दोघांनी करायचा आणि कोणताही खर्च न करता राजकीय फायद्याचा लोण्याचा गोळा एन. टी. आर. मटकावयाचा याला केंद्र कशी अनुमती देणार? शिलान्यास होऊन बरोबर वर्ष झाले आहे. योजना अद्यापही कागदावरच आहे. कोणत्याही क्षणी ती रद्द होईल अशा अवस्थेत सध्या ती लोंबकळत आहे.

## विधानपरिषद बरखास्त

विधानपरिषद रद्द करण्याची घोषणा तेलगुदेसमने सत्तेवर येताना केली होती. परिषदेचे हे सभागृह चालविण्यासाठी बराच खर्च होतो. तो टाळण्याचा तेलगुदेसमचा उद्देश चांगला होता यात शंका नाही; पण त्यासाठी त्यांनी घटनात्मक तरतुदींचा विचार आधी करायला हवा होता. तो न केल्याने अधिक गोंधळ उडाला. 'एनाडू'च्या संदर्भात जो घटनात्मक पेचप्रसंग सध्या उभा राहिला आहे त्याच्या बुडाशी विधानपरिषद रद्द करण्याची तेलगुदेसमची घोषणा हे एक कारण आहे.

विधानपरिषद बरखास्त करण्याचा ठराव तेलगुदेसमने २४ मार्च १९८३ ला विधानसभेत मांडला व तो २१८ विरुद्ध १ एवढया प्रचंड बहुमताने संमत झाला. तेलगुदेसमची लाट त्या वेळी नवीन होती. तेव्हा त्यात काही आश्चर्य नाही. कॉंग्रेस आयच्या आमदारांनी सभात्याग केला व इतर विरोधी पक्षांपैकी जनता व भा. ज. प. चे आमदार गैरहजर राहिले.

विधानपरिषद बरखास्त करण्यासाठी घटनेप्रमाणे केवळ विधानसभेचा ठराव संमत होणे पुरेसे नाही. त्याला मान्यता देणारा ठराव लोकसभेने मंजूर करणे आवश्यक आहे; पण हा ठराव मांडलाच पाहिजे असे बंधन घटनेने केंद्र सरकारवर टाकलेले नाही. ही झाली घटनात्मक तरतूद. केंद्रात व राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तर परस्परांना पूरक निर्णय घेण्यात अडचण येत नाही. सध्याच्या परिस्थितीत दोन्ही ठिकाणी वेगवेगळ्या पक्षांचे सरकार अस्तित्वात आहे. आंध्रविधानपरिषदेत कॉंग्रेस आयचे बहुमत आहे. त्याचा फायदा घेऊन तेलगुदेसम सरकारला अडचणीत आणता येते. अशा वेळी केंद्र सरकार कशाला हातचे हत्यार गमवील? साहजिकच केंद्राने आंध्र विधानसभेच्या ठरावाची दखल घेतली नाही व दीर्घकाळ थांबून केंद्र सरकारच्या कायदाखात्याने एक हुकूम काढून आंध्रप्रदेश विधानसभेचा ठराव फेटाळला. केंद्रीय कायदामंत्र्यांनी हा ठराव फेटाळून विधानसभेचा हक्कभंग आणि अवमान केला असा ठराव आंध्रप्रदेश विधानसभेत मांडण्यात आला आणि विधानसभेने तो हक्कभंगसमितीकडे सोपविला आहे. आता हा सगळा भाग घटनात्मक तरतुदींचा आहे निर्णयाचा चेंडू आंध्रातून केंद्राकडे व केंद्रातून आंध्राकडे टोलविण्यापलीकडे त्यातून निष्पन्न काही होणार नाही. कारण लोकसभेत कॉंग्रेसचे बहुमत आहे. एन. टी. रामारावनाही लोकांना एवढेच दाखवायचे आहे की, आम्ही आश्वासनाप्रमाणे, काटकसरीसाठी विधानपरिषद रद्द करण्याचा प्रयत्न केला; पण काय करणार? केंद्र त्याला मान्यता देत नाही. आंध्रप्रदेश विधानसभेतून विधानपरिषदेवर ज्या तीन जागा भरल्या जातात त्यासाठी निवडणूक घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी घेतलेला आहे. त्यावरून विधानपरिषद चालू ठेवण्याशिवाय पर्याय नाही हे त्यांनी मान्य केल्याचे दिसून येते.

तेलगुदेसमने इतर आश्वासनांप्रमाणेच बेकारांना मोठ्या प्रमाणात काम उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती आणि ती आवश्यक होती; पण त्यासाठी त्यांनी काही योजना आखायला हवी होती. घोषणा केली आहे ती पाळली पाहिजे म्हणून काही तरी करायचे आणि अंगावर येताच झटकून बाजूला व्हायचे हे काय शासकीय धोरण झाले? एन. टी. आर. नी काम देण्याचा मार्ग शोधला तोही अजबच आहे. त्यांनी त्यासाठी निवृत्तीचे वय ५८ वरून

५५ वर आणले व त्यानुसार ३० हजार कर्मचाऱ्यांना सक्तीने सेवानिवृत्ती दिली व त्या जागी तीस हजार तरुणांना नोकऱ्या देण्यात येतील असे जाहीर केले. त्यामुळे सरकारी नोकर संपावर गेले. हा संप त्यांनी वाईट पद्धतीने हाताळला. आता हे प्रकरण सुप्रीम कोर्टात पडून आहे. निर्णय लागायचा आहे. तेव्हा तूर्तास सर्व कर्मचारी शासनाच्याविरुद्ध गेले आहेत व *गेल्या पंधरा महिन्यांच्या काळात* एकही बेकार कामावर घेतला गेलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

हे झाले तेलगुदेसमच्या धोरणात्मक निर्णयामुळे उडालेल्या गोंधळाचे किस्से. त्यामुळे सर्वसामान्य माणूस अतिशय अडचणीत आलेला आहे. रिक्शावाले, शेतमजूर, हातमाग-कामगार, विडीपान-तोड करणारे कामगार यांचे तर हाल विचारायलाच नकोत. तंबाखू उत्पादकांच्या मोर्चांवर बेछूट गोळीबार करून तेलगुदेसमने आणखी धब्बा शासनाला लावून घेतला आहे. विरोधी पक्षनेते मदन मोहन यांनी तर तेलगुदेसम सरकार हे जनता विरोधी सरकार असल्याचा स्पष्ट आरोप केला आहे.

तेलगुदेसमने दिलेल्या अनेक आश्वासनांपैकी जी काही ठळक आश्वासने ठासूनठासून मांडली होती, त्यात शांतता व सुव्यवस्था अग्रभागी होती. कॉंग्रेसच्या राजवटीत लॉ अँड ऑर्डर निकालात निघाली आहे. ती आम्ही निर्माण करून या वाक्यापासून एन. टी. आर. भाषण सुरू करीत असत. कुठे गेली ती लॉ अँड ऑर्डर? या आघाडीवर तर ते पूर्णपणे अयशस्वी नव्हे तर अपयशी ठरले आहेत. आंध्रातली विशेषत: आदिलाबाद, करीमनगर, नलगोंडा, निजामाबाद, वरंगल या भागातील शांतता व सुव्यवस्था पूर्णपणे कोसळली आहे. तेलंगणातील या पाच जिल्ह्यांत तेलगुदेसमचा कारभार आटोपला असून तेथे नक्षलवाद्यांनी आपले समांतर प्रशासन चालविलेले आहे. पोलीसखात्यात भ्रष्टाचार, बेदिली इतकी वाढली *आहे की, ते नक्षलवाद्यांच्या कारवाया* तर राहूच द्यात; पण शहरातली गुन्हेगारीदेखील थोपविण्यास असमर्थ आहे. १९७९ ते १९८३ या चार वर्षांच्या काळात नक्षलवाद्यांनी एकंदर १५० हत्या केल्या. त्यातल्या निम्म्यापेक्षा अधिक, एन. टी. रामाराव सत्तेवर आल्यानंतर १९८३ या वर्षात झालेल्या आहेत. यावरून आंध्रात लॉ ऑर्डरची परिस्थिती काय आहे हे समजू शकते. मागच्या लेखात हत्याकांड सविस्तर दिलेले आहेच.

नक्षलवाद्यांच्या बाबतीत एन. टी. आर. स्वत: होऊन गोत्यात आले. 'नक्षलवादी हे प्रखर देशभक्त आहेत. त्यांना माझा लाल सलाम! ते जर माझ्या पाठीशी राहतील तर मी जग जिंकेन!' ही जाहीर सभांतून केलेली घोषणा व 'माझे सरकार हे डाव्या विचारप्रणालीचे सरकार असेल, हे अनाहूतपणे मांडलेले धोरणविषयक विचार त्यांच्या गळयाशी आले. परिणामी नक्षलवादी चळवळ जोरात फोफावली. खून, दरोडे यांचे सत्रच त्यांनी सुरू केले. नक्षलवाद्यांनी खून पाडला नाही आणि दरोडा घातला नाही असा एकही दिवस गेला नाही! साहजिकच भारतीय जनता पक्षाचे आमदार व्यंकय्या नायडू, इंद्रसेना रेड्डी, ए. नरेंद्रा, व्ही. रामाराव, विरोधी पक्षनेते (इंदिरा कॉंग्रेस) मदन मोहन, जनता पक्षाचे जयपाल रेड्डी वगैरेंनी विधानसभेत मुख्यमंत्र्यांना धारेवर धरले. करीमनगर जिल्ह्यातील जगितयालहून विधानसभेवर निवडून आलेले तेलगुदेसमचे अबकारी मंत्री जीवन रेड्डी हे स्वत: नक्षलवादी आहेत, असे पुरावे या मंडळींनी सभागृहात मांडले. इतकेच नव्हे तर जीवन रेड्डीच्या नक्षलवाद्यांना असलेल्या पाठिंब्यामुळे करीमनगर जिल्ह्यातील एका विधानसभा मतदारसंघात तेलगुदेसमला पराभव पत्करावा लागला असे देसमच्याच सभासदाने मुख्यमंत्र्यांना ठणकावून सांगितले, तेव्हा कुठे त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी नक्षलवाद्यांचा कठोर नि:पात करण्यात येईल असे नि:संदिग्धपणे सभागृहाला सांगितले. या चर्चेच्या वेळी मी प्रेसगॅलरीत होतो त्यामुळे मुख्यमंत्र्यांची सभागृहात उडालेली त्रेधा-तिरपीट स्वत: मी डोळयांनी पाहिली.

नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्याचे सभागृहाला आश्वासन दिल्याप्रमाणे एन. टी. आर. नी पावले उचलायला सुरुवात केली आहे. विजयवाडयाच्या सरहद्दीवर छापा टाकून २४ नक्षलवाद्यांना पकडल्याची बातमी पी. टी. आयने १८ एप्रिलला दिली आहे. हे सर्व नक्षलवादी कोंडापल्ली सीतारामय्या यांच्या पीपल्स वॉर ग्रुपचे असून त्यांच्या समवेत चार मुलीही आहेत. त्यांच्याजवळ प्राणघातक शस्त्रास्त्रांचा मोठा साठा सापडला असल्याचे बातमीत पुढे म्हटले आहे. उशीरा का होईना मुख्यमंत्र्यांच्या लक्षात नक्षलवाद्यांचा हिंसाचार आला!

(क्रमश:)

**(पुढील अंकात श्रममंत्र्यांना मुख्यमंत्र्यांनी लावलेला सापळा, मुख्यमंत्र्यांच्या चिरंजिवांचे रामकृष्ण स्टुडिओ प्रकरण, विरोधी पक्ष आघाडीतून मुख्यमंत्र्यांनी काढता घेतलेला पाय, विधानपरिषद बरखास्त प्रकरण व दैनिक एनाडूचे संपादक श्री. रामोजी राव यांच्या विरुद्ध विधान परिषदेने उपसलेले हक्कभंगाचे हत्यार इत्यादी.)**


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. बा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

**ले. विजय परुळकर**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**
**मूल्य : ३६ रुपये**

# केरळमधील आघाड्यांचे राजकारण

अभय गोखले

भारतात इंग्लंडप्रमाणे मोजके राजकीय पक्ष नसून ते टाकळ्याच्या रोपाप्रमाणे (पेराल तेथे) उगवत असतात. हल्ली तर भारतात नवनवीन पक्ष स्थापण्याची लाटच आली आहे. यातील काहींच्या पक्षाचा जोर फक्त पक्ष स्थापणाऱ्याच्या मतदारसंघापुरता मर्यादित असतो. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास बहुगुणांचा लोकशाही समाजवादी पक्ष, चंद्रजित यादवांचा जनवादी पक्ष, चेन्ना रेड्डींचा राष्ट्रीय लोकशाहीवादी पक्ष, कर्नाटकातील माजी भाजप अध्यक्ष ए. के. सुबय्या यांचा कन्नडनाडू पक्ष, रतुभाई अदाणींची राष्ट्रीय काँग्रेस, जम्मू–काश्मिरातील भीमसिंग यांची पँथरपार्टी आणि इतर राज्यांतील सटरफटर पक्ष. विनोदाची गोष्ट म्हणजे हे सर्व पक्ष स्वतःला अखिल भारतीय म्हणवून घेत असतात. भारतातील बहुपक्षीय पद्धतीमुळे विरोधी पक्ष दुबळा होतो, विरोधकांची मते विभागली जातात व ते सत्तारूढ पक्षाला आव्हान देऊ शकत नाहीत. एखादा काँग्रेससारखा सत्तारूढ पक्ष मग पिढ्यान पिढ्या राज्य करतो व आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर आणीबाणीसदृश परिस्थिती केव्हाही आणू शकतो. सुदैवाने आणीबाणीतील अत्याचारांमुळे सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांचा जनता पक्ष स्थापन झाला व त्याने १९७७ मध्ये काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचले व एक अशक्यप्राय गोष्ट सत्यात आणली. अर्थात निरनिराळे विरोधी पक्ष एकत्र आल्यानेच हे शक्य झाले. मात्र जनता पक्ष फुटल्यावर ये रे माझ्या मागल्या होऊन १९८० च्या निवडणुकीत काँग्रेसने विखुरलेल्या विरोधकांना चारीमुंड्या चीत केले. तेव्हा लोकशाहीच्या निकोप वाढीकरिता राजकीय पक्षांची संख्या मोजकीच असेल तर ते आलटूनपालटून सत्तेवर येतात व मुख्य म्हणजे मतदारांना चॉइस रहातो. अर्थात जनता पक्षाचा (म्हणजेच विरोधकांच्या ऐक्याचा) प्रयत्न फसला याचे कारण त्यातील बहुतेक घटक पक्षांचे आपापसात सैद्धान्तिक मतभेद होते. केवळ आणीबाणीमुळे ते एकत्र आले व नंतर काही काळ सत्तेने त्यांना एकत्र बांधून ठेवले.

अखिल भारतीय पातळीवर जरी बरेच पक्ष असले तरी सर्व राज्यात त्यांची स्थिती सारखीच असत नाही. आता मध्यप्रदेश, गुजराथ, हिमाचलप्रदेश, जम्मू–काश्मीर या राज्यांचे उदाहरण घ्या. मध्यप्रदेशात फुटकळ पक्ष बरेच आहेत; परंतु तेथील मतदारांचा बहुपक्षीय पद्धतीवर विश्वास दिसत नाही. ते नेहमी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष (पूर्वीचा जनसंघ) यापैकी एखादाच पसंत करतात, इतर पक्षांना महत्त्व देत नाहीत, तर गुजराथमध्ये पूर्वी संघटना काँग्रेस व इंडिकेट काँग्रेस असा सामना असायचा, इतर पक्षांना तेथील मतदार संधी देत नसत. जनता पक्ष फुटल्यावर जनसंघवाले वेगळे झाले व संघटना काँग्रेसवाले जनता पक्षातच राहिले. आता गुजराथेत जरी काँग्रेस, जनता व भाजप अशी विभागणी होत असली तरी सध्याचा कल पहाता कालांतराने गुजराथेत काँग्रेस व भाजप हे दोनच तुल्यबळ पक्ष राहतील व मोरारजींच्या जुन्या संघटना काँग्रेसवाल्यांची जागा भाजपवाले घेतील. हिमाचलप्रदेशात काँग्रेस व भाजप अशीच नेहमी टक्कर असते. इतर पक्षांना तेथे स्थान नाही. जम्मू–काश्मीरमध्येही पक्ष बरेच आहेत; पण नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेस हेच तेथील तुल्यबळ पक्ष आहेत. पूर्वी काही जागा मिळवणाऱ्या भाजपला (जनसंघ) ही तेथील मतदारांनी गेल्या विधानसभा निवडणुकात झिडकारले आहे. याउलट परिस्थिती बिहार, महाराष्ट्र, केरळ या राज्यांत पहावयास मिळते. बिहारमध्ये पक्षांचा सुकाळ आहे. तेथील मतदारांचे वैशिष्ट्य म्हणजे ते विरोधकांना साधारणतः विभागून मते देतात. ही सर्व विभागणी जवळजवळ सारखीच असते. बिहारमध्ये काँग्रेसशिवाय जनता (पूर्वीचे समाजवादी व संघटना काँग्रेसवाले), भाजप (जनसंघ), उजवे कम्युनिस्ट, लोकदल, समाजवादी काँग्रेस इत्यादी प्रमुख विरोधी पक्ष असून त्यांना विधानसभेत जवळजवळ सारख्याच जागा आहेत. बिहारमधील मतदारांनी दोन–तीन वेळा विरोधकांनाही सत्ता उपभोगण्याची संधी दिली; परंतु जनसंघ–कम्युनिस्ट यांच्यासारखे परस्परविरोधी पक्ष आघाडीत असल्याने तिचा (संयुक्त विधायक दल) थोड्याच कालावधीत बोऱ्या वाजला. महाराष्ट्रातही बरेच पक्ष आहेत. भाजप, जनता, कम्युनिस्ट, शे.का.प., रिपब्लिकन पक्षाचे दोन गट, समाजवादी काँग्रेस, शिवसेना इत्यादी. या विरोधकांत मते विभागली गेल्याने नेहमीच काँग्रेसचा फायदा होतो. १९७८ मध्ये महाराष्ट्रात काँग्रेसफुटीचा प्रभाव जास्त जाणवल्याने व शरद पवारांचा गट काँग्रेसमधून फुटून निघाल्याने प्रथमच बिगर काँग्रेसी मंत्रिमंडळ राज्यात सत्तेवर आले. नाही तर ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य मावळत नसे असे म्हणतात त्याप्रमाणे, महाराष्ट्रात काँग्रेसचा सूर्य सत्तेवरून कधी मावळेल असे स्वप्नातही वाटत नसे.

केरळमध्ये तर पक्षांचा घुमाकूळच आहे. जो उठतो तो पक्ष काढतो. प्रत्येक जातीचा स्वतंत्र पक्ष आहेच, त्याशिवाय त्या छोट्याछोट्या पक्षांचे दोन-तीन गट आहेत. क्रांतिकारी समाजवादी पक्ष (आर. एस. पी.) या छोट्या पक्षाचे चार गट केरळात आहेत. एकुलता एक पक्ष केरळात कधीच सत्तेवर येऊ शकलेला

नाही. साधारणतः कॉंग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट हे केरळमधील मोठे पक्ष मानले तरी सत्तेवर येण्यासाठी त्यांना फुटकळ पक्षांची मदत घ्यावीच लागते. याचा परिणाम म्हणजे कोणतेही मंत्रिमंडळ आपली मुदत संपेपर्यंत सत्तेवर रहात नाही. याला अपवाद फक्त अच्युत मेनन मंत्रिमंडळाचा. हे मंत्रिमंडळ आपली मुदत संपेपर्यंत सत्तेवर राहिले. त्याअगोदर नंबुद्रिपाद (मार्क्सवादी कम्युनिस्ट), नंतर अँटोनी, कोया, वासुदेवन नायर, नयनार यांपैकी कोणीही या ना त्या कारणाने आपली मुदत संपेपर्यंत सत्तेवर राहू शकले नाहीत. सध्या इंदिरा कॉंग्रेस सत्तेवर आहे व त्या आघाडीत (संयुक्त लोकशाही आघाडी), कॉंग्रेस (इं) शिवाय केरळ कॉंग्रेस (जोसेफगट), केरळ कॉंग्रेस (मणी), इंडियन युनियन मुस्लिम लीग, क्रांतिकारी समाजवादी पक्ष (शिवदासन गट), लोकशाही कामगार पक्ष, सोशॅलिस्ट रिपब्लिकन पार्टी, नॅशनल डेमॉक्रॅटिक पार्टी, एक अपक्ष सदस्य, जनता (गोपालन गट), प्रजासमाजवादी पक्ष. दुसऱ्या आघाडीचे नाव आहे डावी लोकशाही आघाडी. यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्टांशिवाय उजवे कम्युनिस्ट, समाजवादी कॉंग्रेस, अखिल भारतीय मुस्लिम लीग, जनता पक्ष, क्रांतिकारी समाजवादी पक्ष, केरळ कॉंग्रेस (एस.), राष्ट्रीय लोकशाहीवादी पक्ष आणि मध्यंतरी कॉंग्रेसमधून बाहेर पडलेले इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे (केरळ युनिट) तीन आमदार यांचा समावेश आहे. या (सटरफटर) स्वतःचे, स्वतःच्या जातीचे हित संभाळणाऱ्या पक्षांना संभाळून ( त्यांच्या नेत्यांची व अनुयायांची मर्जी सांभाळून ) सत्ता टिकवणे मुख्यमंत्री करुणाकरन यांना किती जड जात आहे याची माहिती साप्ताहिक संडेने फारच परिणामकारकरीत्या गोळा केली आहे. या सर्व, विविध दिशांना तोंडे असणाऱ्या पक्षांची मोट *एकत्र बांधून ती तशीच टिकवणे म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत* आहे. त्या दृष्टीने करुणाकरन यांची कामगिरी जनता पक्षाचे पंतप्रधान मोरारजी देसाई व पुरोगामी लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्यापेक्षाही कठीण आहे. या दोघांनाही निरनिराळ्या घटकपक्षांना संभाळून घ्यायचे होते; परंतु करुणाकरन यांना नुसती तेवढीच कामगिरी करावयाची नसून त्यांच्या आघाडीत एका पक्षाचे जे दोन किंवा तीन तुकडे (रायव्हल ग्रुप्स) आहेत. त्यांच्यातही भांडणे होऊ न देता, त्यांना संभाळून घ्यावयाचे आहे. त्यांच्या कॉंग्रेस (इं) मधील असंतुष्टांनाही चुचकारायचे आहे.

## छोट्या छोट्या पक्षांचेही तुकडे

केरळात हे जे छोटे छोटे पक्ष आहेत त्यांचे किमान दोन तुकडे (गट) तरी पडलेले आहेत. सत्ताधारी आघाडीतील क्रांतिकारी समाजवादी पक्षाने तर या बाबतीत उच्चांक नोंदवला आहे. सध्या सत्ताधारी आघाडीत कामगारमंत्री असलेल्या के. शिवदासन यांचा एक गट आहेच. त्याशिवाय पूर्वी एकसंध असलेल्या क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष बेबी जॉन यांचाही एक गट आहेच. पूर्वी हा गट अखिल भारतीय क्रांतिकारी समाजवादी पक्षाशी (त्रिदीप चौधरी प्रमुख असलेल्या) संलग्न होता. नंतर हा गट विरोधीपक्षात असताना केंद्रीय नेतृत्वाचा आदेश डावलून त्या वेळचे (केरळ आ. एस. पी. चे अध्यक्ष) नेते बेबी जॉन यांनी तेव्हा अस्तित्वात असलेल्या सी. पी. आय.–कॉंग्रेस संयुक्त मंत्रिमंडळाला (अच्युत मेनन मुख्यमंत्री होते) आपला पाठिंबा जाहीर केला व हा गट केरळपुरता मर्यादित राहिला. त्याचे केंद्रीय नेतृत्वाशी संबंध तुटले. नंतर बेबी जॉन यांचा गट आणखी फुटला व त्यातून श्रीकांतन नायर यांचा गट बाहेर पडला. त्यांच्या गटातील एकमेव आमदार के. शिवदासन हे सत्ताधारी आघाडीत मंत्री आहेत; परंतु पक्षाची ही फाटाफूट इथेच थांबायची नव्हती. के. शिवदासन यांचा गट आणखी फुटला व त्रिवेंद्रमचे माजी महापौर नामदेवन यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक तुकडा अस्तित्वात आला. श्रीकांतन नायर यांची पत्नी महेश्वरीअम्मा हिचे के. शिवदासन यांच्याशी न पटल्याने तिने आणखी एका गटाची वेगळी चूल मांडली. अशा प्रकारे केरळमध्ये आता बेबी जॉन, के. शिवदासन, नामदेवन, महेश्वरीअम्मा व परमेश्वर यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे पाच तुकडे अस्तित्वात आहेत. यातील परमेश्वरन यांचा गट (मूळ पक्ष) विरोधी आघाडीत आहे तर के. शिवदासन सोडता इतर कोणत्याही गटामध्ये आमदार नसल्याने करुणकरन त्याला महत्त्व देत नाहीत. सध्या उजवा कम्युनिस्ट पक्ष विरोधी आघाडीत आहे; पण तोही फुटीपासून मुक्त नाही. डांगेगट बाहेर पडल्याने उजव्या कम्युनिस्ट पक्षात फूट पडली. तिचे परिणाम केरळातही जाणवले. डांगेगटाने अखिल भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. या पक्षाचा केरळात एकही आमदार नाही. हा पक्षसुद्धा केरळात फुटला. इंदिरा कॉंग्रेस की मार्क्सवादी कम्युनिस्ट या वादात केरळमध्ये जनता पक्षाचे दोन तुकडे झाले. गोपालन यांच्या नेतृत्वाखालील गट जनता पक्षाबाहेर पडला. या गटाचे चार आमदार हे सत्ताधारी इंदिरा कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडीत आहेत. अधिकृत जनता पक्षाचा चार *आमदारांचा गट मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील* विरोधकांच्या आघाडीत आहे. सत्ताधारी आघाडीतील जनता (गोपालन) गट फुटला तो त्या पक्षाच्या मंत्रिमंडळातील प्रतिनिधी एम. कमलम यांनी एक कन्व्हेन्शन बोलावून के. गोपालन यांना पक्षातून काढून टाकल्याने. एम. कमलम यांनी नवीन पक्ष स्थापन केला. त्यात त्यांच्याशिवाय दोन आमदारांनी प्रवेश केला. गोपालनगटाकडे एक आमदार आहे. मग प्रतिक्रिया म्हणून गोपालनगटाने करुणाकरन (मुख्यमंत्री) यांच्याकडे एम. कमलम यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली, एम. कमलम आमच्या पक्षाचे प्रतिनिधित्व करत नाहीत असा दावा केला. करुणाकरन यांनी गोपालन यांचे म्हणणे ऐकून घेतले; परंतु त्यावर अंतिम निर्णय घेतला नाही. काहींच्या मते जनता (गोपालन) गटात मुख्यमंत्री करुणाकरन यांनीच फूट पाडली. बंगलोर येथील विरोधी पक्षनेत्यांची परिषद गोपालन यांनी अटेंड केल्याने करुणाकरन यांच्या मनात गोपालन यांच्या पाठिंब्याविषयी शंका निर्माण झाली व त्यांनी एम. कमलम यांना पक्ष फोडण्यास फूस दिली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

केरळ कॉंग्रेसमध्ये जोसेफगट व मणीगट हे जुने प्रतिस्पर्धी आहेत. हे दोन्ही गट नेहमी एकमेकांच्या विरोधात राहिलेले आहेत. मात्र करुणाकरन यांनी या दोन्ही गटांना आपल्याच आघाडीत एकत्र राखण्याची किमया करून दाखवली आहे. जोसेफ हे करुणा-

करन मंत्रिमंडळात महसूलमंत्री आहेत तर मणी हे अर्थमंत्री आहेत. यातील जोसेफ यांच्या गटात सात आमदार असून मणी यांच्या गटात सहा आमदार आहेत. मात्र आपले आसन स्थिर राखण्याकरिता करुणाकरन या दोन्ही गटात भांडणे लावून देतात असे जोसेफ यांना वाटते. हे दोन्हीही गट ख्रिश्चनांचे प्रतिनिधित्व करतात. मध्यंतरी जोसेफ यांनी टायटल डीडस्च्या प्रश्नावरून करुणाकरन यांच्या तोंडचे पाणी पळवले होते. जंगलातील जमिनीवर जे लोक रहातात त्यांना त्या जागेचे मालकीहक्क बहाल करावेत असे टुमणे जोसेफ गटाने करुणाकरन यांच्या मागे लावले. यामागे गरीब लोकांना जमिनीची मालकी मिळवून देण्याची तळमळ वरवर दिसत असली तरी सत्य परिस्थिती तशी नाही. या जंगलांमध्ये जे लाकूड आहे ते घशात घालण्याच्या प्रयत्नात तेथील श्रीमंत लोक आहेत. एकदा का सरकारने जंगलातील जमिनीचे मालकी हक्क गरीब लोकांना दिले की मग हे श्रीमंत लोक (जमीनदार) त्यांच्याकडून कमी पैशात ते विकत घेतील व जंगलातील लाकडावर त्यांचे मालकी हक्क प्रस्थापित करून आपले उखळ पांढरे करून घेतील. या बड्या जमीनदारांचे प्रतिनिधित्व जोसेफगट करत आहे असे कित्येकांना वाटते. या प्रश्नावर करुणाकरन सरकार चालढकल करत असल्याने वैतागून जोसेफगटाने काही महिन्यांपूर्वी, आर. एस. पी. च्या बेबी जॉन यांनी करुणाकरन सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणला असता, ठरावाच्या बाजूने (मार्क्सवादी विरोधी आघाडीच्या बाजूने) मतदान करण्याचा निर्णय घेतला होता; परंतु शेवटच्या क्षणी करुणाकरन यांनी टायटल डीडस् वितरित करण्यावरचा वादग्रस्त स्टे उठवल्याने जोसेफगटाने आपला निर्णय फिरवला. अर्थात जोसेफ-गटाचा करुणाकरन यांना ब्लॅकमेल करण्याचा हा प्रयत्न होता. कारण मार्क्सवादी कम्युनिस्टांशी त्यांचे कधीच पटले नसते. जोसेफ व मणी गटांना ज्या सिरियन ख्रिश्चनांचा प्रामुख्याने पाठिंबा आहे त्यांचे कम्युनिस्टांशी जमण्यासारखे नाही. पक्षफुटीपासून मुस्लिम लीगही वाचलेली नाही. केरळमध्ये सुलेमान सैत यांच्या नेतृत्वाखालील (केंद्रीय नेतृत्व) इंडियन युनियन मुस्लिम लीग आहे. या पक्षाचे केरळमधील नेते, माजी मुख्यमंत्री कोया यांच्या निधनानंतर पक्षात फूट पडण्याची (स्थानिक नेतृत्वाच्या प्रश्नावर) शक्यता निर्माण झाली होती; परंतु अवुकादर कुट्टी नाहा यांची नेतेपदी निवड झाल्यामुळे फूट टळली. या पक्षाचे दिवंगत माजी मुख्यमंत्री कोया यांनी आपल्या कर्तृत्वाने इंडियन युनियन मुस्लिम लीगला केरळात अमाप लोकप्रियता मिळवून दिली. या गटाचे तेरा आमदार सत्ताधारी आघाडीत आहेत. ऑल इंडिया मुस्लिम लीग हा आणखी एक गट केरळमध्ये आहे. या गटाचे चार आमदार असून ते विरोधकांच्या आघाडीत आहेत. या दोन्ही गटांमध्ये मुस्लिमांची मते विभागल्याने त्याचा फायदा दोन्ही आघाड्यांना मिळतो. डेमॉक्रॅटिक पार्टी नावाच्या तिसऱ्या गटाचा उदय झाल्याने आता केरळात तीन मुस्लिम लीग अस्तित्वात आहेत. इंडियन युनियन मुस्लिम लीग व ऑल इंडिया मुस्लिम लीग या पक्षांमध्ये मुस्लिमांतील अल्पसंख्य मुजाहिदांचे वर्चस्व असल्याने केरळात बहुसंख्य असलेल्या सुन्नी पंथीयांनी मुस्लिम डेमॉक्रॅटिक पक्षाची स्थापना केली आहे. हा पक्ष मुस्लिमांची मोठ्या प्रमाणावर मते खेचण्याची शक्यता असल्याने दोन्ही आघाड्या निवडणुकांच्या वेळी या पक्षाला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करतील.

नॅशनल डेमॉक्रॅटिक पक्ष व सोशॅलिस्ट रिपब्लिकन पक्ष हे प्रामुख्याने हिंदूंचे प्रतिनिधित्व करतात. यातील नॅशनल डेमॉक्रॅटिक पक्ष हा केरळातील हिंदूंत बहुसंख्य असलेल्या नायर जमातीचा पक्ष ओळखला जातो, तर सोशॅलिस्ट रिपब्लिकन पक्ष एझवास जमातीचे प्रतिनिधित्व करतो. हे दोन्ही पक्ष इंदिरा काँग्रेसप्रणीत सत्तारूढ आघाडीत आहेत. काँग्रेस (स) हा पूर्वी केरळातील बलाढ्य पक्ष होता. काँग्रेस (स) चे नेते अँटोनी, वायलर रवी, ओमान चंडी हे जनमानसावर आपला प्रभाव राखून होते. ते मार्क्सवाद्यांच्या आघाडीत असताना (मार्क्सवादी पक्षाचे मुख्यमंत्री जयनार यांच्या कारकीर्दीत) त्यांचे मार्क्सवाद्यांशी बिनसले व काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाचा आदेश डावलून अँटोनी, वायलर रवी, चंडी इत्यादींनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला त्याची बरीच मदत झाली. आता उरलेल्या काँग्रेस (स) मध्ये उन्नीकृष्णन वगैरे नेते असून त्यांचे सहा आमदार मार्क्सवादीप्रणीत विरोधी आघाडीत आहेत.

केरळमधील पक्षपद्धती अशी बहुविध आहे. प्रत्येक पक्षाच्या मागण्या मान्य करताना मुख्यमंत्र्यांच्या नाकी नऊ येतात. यातून राज्याच्या विकासकामांना वेळ काढणे मुश्कील होऊन बसते. या छोट्या छोट्या पक्षांच्या परस्परविरोधी मागण्या मान्य न केल्यास ते विरोधी आघाडीला जाऊन मिळण्याची धमकी देतात. दोन आघाड्यांच्या बळामध्ये फारसा फरक नसल्याने एखादा छोटा गट मंत्रिमंडळ कोसळवू शकतो. केरळच्या राजकारणाला हा शापच आहे. कोणत्याही मुख्यमंत्र्याची या छोट्या पक्षांच्या मनधरणीतून सुटका नाही. प्रेम नझीरसारखा एखादा लोकप्रिय नट एन. टी. रामाराव (आंध्र) किंवा एम. जी. आर. (तामीळनाडू) यांच्याप्रमाणे दणदणीत बहुमताने आपल्या पक्षास केरळात निवडून आणू शकला तरच हे चित्र बदलेल. मात्र केरळातील जातीय राजकारण पहाता ही शक्यता जमेस धरता येणार नाही. □

---

"एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी.
स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी.
कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी
मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या
कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा
एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने
या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या
गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

**पुस्तक पंढरी : ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब–ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा




'शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या' या लेखमालेतील हा शेवटचा लेख आहे. यापूर्वी या लेखमालेतील सहा लेख प्रसिद्ध झाले. त्यामध्ये शरच्चंद्रांची कला व मूल्ये यांचा परिचय करून देणारा प्रास्ताविक लेख आणि चरित्रहीन, विप्रदास, श्रीकांत, गृहदाह आणि शेषप्रश्न (दोन भागात) या पाच कादंबऱ्यांवरील परिचय-लेख असे सहा लेख आहेत. 'शेषेर परिचय' या कादंबरीची ओळख करून देणाऱ्या या लेखाबरोबरच ही लेखमाला संपत आहे.

# शरच्चंद्रांची अखेरची कादंबरी : शेषेर परिचय

**लेखांक : सात । लेखक : प्रा. बा. वि. पोतदार**

'शेषेर परिचय' (शेवटचा परिचय) ही कादंबरी 'भारतवर्ष' या बंगाली मासिकात क्रमशः प्रसिद्ध होत होती व ती लोकप्रियही झाली. तथापि शरदबाबूंच्या निधनामुळे ती अपूर्ण राहिली. त्यांच्या एक शिष्या, कवयित्री राधाराणीदेवी, यांच्याबरोबर शरदबाबूंनी या कादंबरीच्या कथानकाबाबत पुष्कळ चर्चा केली होती. प्रकाशकांच्या विनंतीवरून राधाराणीदेवींनी ही कादंबरी पूर्ण केली. या कादंबरीत एका गृहत्यागी स्त्रीचे अतिशय करुण असे चित्र शरच्चंद्रांनी रंगविले आहे. करुणरसाने इतके ओतप्रोत भरलेले वातावरण शरदबाबूंच्या फारच थोड्या कादंबऱ्यांत सापडेल. ज्या स्त्रीने बारा-तेरा वर्षांपूर्वी काही कारणाने कुलत्याग केला तिची आता अकस्मात आपल्या पतीशी भेट होते आणि तेव्हापासून तिचे अंतःकरण आपल्या पतीकडे व मुलीकडे ओढ घेऊ लागते, येथून कादंबरीच्या कथाभागास सुरवात झालेली आहे. तथापि तिचा गृहत्याग व बारा वर्षे तिने दुसऱ्याच्या घरी एक अंगवस्त्र म्हणून घालविलेले जीवन यामुळे एका बाजूला ती व दुसऱ्या बाजूला तिचा पति आणि मुलगी यांच्यामध्ये धर्म, नीतिकल्पना, इत्यादींमुळे एक अभेद्य भिंत निर्माण झालेली आहे. विशेषतः तिच्या पतीचा सर्व व्यवहार आकस्मिकरीत्या बुडून त्याला पूर्ण विपन्नावस्था प्राप्त झाल्यावर, तिला आपल्या तेरा वर्षांपूर्वी केलेल्या कुलत्यागाचा पूर्ण पश्चात्ताप होतो. त्याचे आणखी एक कारण असे की, पूर्वाश्रमी या सज्जन, निष्पाप व ईश्वरसेवामग्न पतीचा तीच एक आधारस्तंभ होती व तो आधार नाहीसा झाल्यामुळेच या सालस, धर्मनिष्ठ व अव्यवहारी माणसास विपन्नावस्था प्राप्त झालेली असते. तथापि पति व कन्या यांना विपन्नावस्थेत पाहून तिचे हृदय कितीही पिळवटून निघाले, आणि कुलत्यागाविषयीच्या पश्चात्तापाने तिचे हृदय कितीही पोळून निघाले तरी या दोघांना साहाय्य करण्याचा किंवा या कुटुंबात पुन्हा समाविष्ट होण्याचा एकही मार्ग तिला दिसू शकत नाही.

शरदबाबूंच्या पुष्कळशा नायिका पतिता आहेत; परंतु त्या बहुधा परिस्थितीमुळे पतित झालेल्या असतात. 'शेवटचा परिचय' मधील सवितेने बारा–तेरा वर्षांपूर्वी स्वतःच काही कारणाने गृहत्याग केलेला आहे. सज्जन, प्रेमळ व ईश्वरनिष्ठ पति आणि तीन वर्षांची रेणू यांना सोडून ती एके दिवशी घराबाहेर पडली होती. कुलत्यागी सवितेचा बारा वर्षांनंतरचा पश्चात्ताप पाहून वाचकाला तिच्या कुलत्यागाच्या कारणाबद्दल साहजिकच कुतूहल निर्माण होते. ज्या माणसाबरोबर ती बारा वर्षे राहिली तो तिच्या पतीपेक्षा थोर होता असे तिलाही वाटलेले नव्हते. तिच्या गृहत्यागामागे काही रहस्य दडलेले आहे, अशी जाणीव वाचकाला अधूनमधून देऊन तिच्याविषयी वाचकाला पूर्ण सहानुभूति वाटावी, अशा प्रकारे कथानकाची रचना शरदबाबूंनी केलेली आहे.

तिच्या गृहत्यागावर कादंबरीच्या सुरवातीला जो थोडासा प्रकाश पडतो तो राखालच्या संभाषणातून. राखाल हा तरुण आता जवळजवळ तीस वर्षांचा, लहानपणी सवितेच्या घरी वाढलेला. अनाथ राखालला तिने मुलाप्रमाणे पाळले होते. तिच्या गृहत्यागानंतर बारा-तेरा वर्षांनी राखालची हकीकत आपला मित्र तारक याला सांगतो,

त्यावरून सविता-व्रजबाबू या कुटुंबाविषयी थोडीफार माहिती आप-ल्याला मिळू शकते, व तिच्या गृहत्यागाच्या एका बाजूवर थोडाफार प्रकाश पडतो. व्रजबाबूंची शेतीवाडी, जमीनजुमला, व्यापारधंदा, पुष्कळ होता. खुद्द कलकत्त्यालाही त्यांचा मोठा व्यवहार होता. तथापि त्यांचे स्वार्थी आप्त बांडगुळाप्रमाणे त्यांना चिकटून बसले होते. त्या वेळच्या संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे हे दृश्यही विशेष नाविन्य-पूर्ण नव्हे; पण व्रजबाबूंचा स्वभाव फारच भोळा व निष्पाप! देव-घरात गोविंदजीच्या सेवेत त्यांचा दिवसाचा निम्मा वेळ जात असे. त्यांच्या या स्वभावामुळे आप्त-स्वजन व नोकर–चाकर त्यांना लुबा-डीत होते. पहिली पत्नी निवर्तल्यावर सवितेला त्यांनी लग्न करून घरी आणली. ती बुद्धिमान व तेजस्वी असल्याने तिने आप्तांकडून होणारी पतीची ही फसवणूक थांबवली. गोविंदजींच्या पूजेची तयारी करण्याचा सर्व भार स्वतःवर घेऊनही तिने घरातील ज्येष्ठ स्त्रियांचा मत्सर ओढवून घेतला. साहजिकच ही नवी सून घरातील आप्तांच्या डोळ्यात खुपू लागली. घरात ठाण मांडून बसलेल्या आप्तस्वकी-यांच्या मनात द्वेषाची भावना रुजू लागली. व्रजबाबूंचे एक दूरचे नातेवाईक व मित्र रमणीबाबू व्यापारधंद्यानिमित्त वारंवार कल-कत्त्याहून येत असत. त्यांच्याबरोबर मेवामिठाई, फळफळावळ इत्यादी गोष्टीही पुष्कळ येत असत. त्यांच्या व सवितेच्या मोकळे-पणाच्या संबंधाविषयी व्रजबाबूंच्या मनात किल्मिष भरवून देण्याचा आप्तांनी प्रयत्न केला; पण तो फसला. मग एके दिवशी विशेष प्रयत्न करून वरवर बिनतोड दिसणारा पुरावा सादर करण्यात आला. कुभांड रचून घरातल्या आप्तांनी तिला गृहत्याग करण्यास एक प्रकारे भाग पाडले.

त्या वेळी लहान असलेल्या व सवितेला आई मानणाऱ्या राखाल राजला जे माहीत होते ते एवढेच, व्रजबाबूंना व तीन वर्षांच्या रेणूला सोडून गेलेल्या सवितेविषयी खुद्द व्रजबाबूंच्याही मनात किल्मिष नसते, असेही आपल्याला कथानकाच्या सुरुवातीसच आढ-ळून येते. आज बारा वर्षांनंतर भेट झाल्यावर व्रजबाबू सवितेला म्हणतात, 'त्या दिवशी मला सर्वजण आंधळा म्हणाले, मूर्ख-बावळट म्हणाले, ज्याच्या डोळ्यात बोट घालून दाखवलं असताही ज्याला दिसत नाही त्याची अशी दुर्दशा होऊ नये, तर व्हावी कुणाची? परंतु दुर्दशा झाली म्हणून स्वतःला आंधळं मानणं जरूर आहे का? जे काही मी केले ते सारं चुकीचं, असंच म्हणायला हवं का? मला माहीत आहे, प्रत्यक्ष भावानं मला फसविलं, मित्रांनी मला फसविलं. आप्तेष्ट, दासदासी, पदरचे कामगार, पुष्कळ–पुष्कळांनी मला फस-विलं आहे; पण ज्या काळी माझं सारं काही जायला निघालं होतं त्या दुर्दिनांच्या प्रसंगी तुला लग्न करून घरी आणली. घरी आल्या-वर तू एकेक हे सारं बंद केलंस. सर्व नुकसान हळूहळू भरून निघालं. त्या तुझ्यावर मी अविश्वास करू शकलो नाही म्हणून मी झालो आंधळा! अन् ज्यांनी कारस्थानं करून बाहेरच्या लोकांना गोळा करून आणून तुला खाली ओढून घराबाहेर काढून लावलं ते मात्र डोळस!... तू नुसती काय माझी बायको होतीस, नवी बहू? तू माझ्या घरसंसाराची लक्ष्मी होतीस, सगळ्या माझ्या कुटुंबाची कर्ती यजमानीण होतीस, सगळ्या स्वजनांत श्रेष्ठ आप्तस्वजन होतीस, सर्व मित्रात मोठी मित्र होतीस! तुझ्यापेक्षा माझ्यावर अधिक श्रद्धा कोणाची होती? माझी अधिक भक्ती कधी कुणी केली होती? अशा प्रकारे माझ्या मंगलाची इच्छा कधी तरी कुणी केली होती काय?

तथापि त्यांच्याही मनात एक प्रश्न वारंवार सलत असतो तो हा की, सवितेने गृहत्याग का करावा? काही वर्षे त्यांच्या सान्निध्यात राहूनही तिचे त्यांच्यावर प्रेम जडले नव्हते काय? प्रेम व त्याचे स्वरूप याची चर्चा हाही या कादंबरीचा एक विषय आहे. आज बारा वर्षांनंतर भेट झाल्यावर व्रजबाबू सवितेला तिच्या गृहत्यागाचे खरे कारण विचारतात, तेव्हा ती उत्तर देण्याचे नाकारते. केवळ आप्तांच्या कुभांडामुळे अगतिक होऊन तिने त्या वेळी गृहत्याग केला असता, तर आज बारा वर्षांनंतर ती पतीकडे मोकळेपणाने बोलली असती. तिच्या गृहत्यागास आणखी एक बाजू असली पाहिजे असे सुचवून लेखकाने ती बाजू रहस्यमय ठेवण्याचा काही काळपर्यंत प्रयत्न केला आहे. जणू तिच्या गृहत्यागाचे कारण तिलाही नीटपणे कळून आलेले नव्हते. आत्मशोधनाने ते तिचे तिला स्पष्ट होईपर्यंत लेखकालाही ते कळण्याचा संभव नव्हता. एकदा शारदेने तिला त्या-संबंधी विचारले तेव्हाही तिने 'माझ्या पूर्वजन्मीचे फळ' असेच संदिग्ध उत्तर दिले व पतिता या केवळ स्वतःच त्यांच्या दुर्गतीला जबाबदार नसतात असे सूचित केले.

सवितेकडून खरोखर पापाचरण घडले होते काय? किती प्रमाणात घडले होते? त्या दिवशी क्षणिक मोहाला वश होऊन ती रमणी-बाबूंच्या सान्निध्यात होती की, कित्येक दिवस हे असेच चालले होते? की ते केवळ एक कुभांड होते? परंतु तसे असेल तर काहीच स्पष्टी-करण न देता सविता रमणीबाबूंबरोबर एकदम निघून कशी गेली? इतकी ती बेजबाबदार होती काय? तिच्या अभिमानी, बेमुर्वत, हट्टी परंतु तेजस्वी मनोवृत्तीचा उल्लेख कादंबरीत जागोजाग आलेला आहे; परंतु कोणती स्त्री केवळ अभिमानापायी स्वतःच्या संसाराला अशा तऱ्हेने उद्ध्वस्त करील? आणि सविता त्यानंतर बारा वर्षे रमणीबाबूंसारख्या अतिसामान्य माणसाबरोबर कशी राहिली? क्षणिक मोहाने म्हणा की, नातेवाइकांच्या कुभांडाला बळी पडून म्हणा, जी स्त्री पती व मूल यांना टाकून गृहत्याग करते ती त्या मोहाचा निरास झाल्यावर, बेकामपणे घडून आलेल्या घटनेने निर्माण झालेला मनाचा गोंधळ ओसरल्यावर, रमणीबाबूंचाही त्याग करून कुठे परागंदा कशी होत नाही? बारा वर्षांत ती निदान आपल्या मुलीच्या व पतीच्या भेटीला कशी येत नाही? इतकी वर्षे ती आपल्या वात्सल्यभावनेला दडपून कशी ठेवू शकली? व्रजबाबूंसारख्या प्रेमळ माणसाने तिला आपल्या मुलीची भेट नाकारली असती काय?

या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून व गृहत्यागाचे कारण संदिग्ध ठेवून, गृहत्यागानंतर बारा–तेरा वर्षांनी शरदबाबूंनी आपल्या कथानकाला सुरुवात केलेली आहे. वरील प्रश्न त्यांच्या दृष्टीने तूर्त तरी फारसे मह-त्त्वाचे नाहीत. सविता ही कोणत्याही कारणामुळे पतित असली, तरी आज तिच्या हृदयात प्रेम, वात्सल्य, सहानुभूती, दया, माणुसकी नाही काय? पती व मूल यांना विपन्नावस्थेत पाहून तिच्या मनाची जी तगमग होते ती खरी नाही काय? एखाद्या व्यक्तीच्या हृदयातील मंगलभावनांची किंमत अधिक, की केव्हा तरी दहा–बारा वर्षांपूर्वी तिच्या हातून घडलेल्या बऱ्यावाईट कृतीचे महत्त्व अधिक, असेच

जणू शरच्चंद्रांना विचारायचे आहे. सवितेबद्दल वाचकांच्या मनात सहानुभूति निर्माण झाल्यानंतर, तिला स्वतःला आत्मशोधनासाठी आणखी काही सवड दिल्यानंतर, शरच्चंद्रांनी सवितेच्या तोंडूनच पुढे तिच्या गृहत्यागाच्या कारणावर अधिक प्रकाश टाकलेला आहे.

सवितेबद्दल आपणाला पूर्ण सहानुभूती वाटावी असा प्रयत्न करूनही तिच्या प्रमादाचे गांभीर्य व त्या प्रमादातून उद्‌भवणारे दुष्परिणाम शरदबाबू आपल्यापुढे पायरी–पायरीने व सूचकतेने चित्रित करतात. तिचे पती ब्रजबाबू यांना एका निरागस, अश्राप, निःस्पृह व साधुत्वपूर्ण अशा व्यक्तिरेखेचे स्वरूप शरच्चंद्रांनी हेतुपूर्वक दिलेले आहे. अशा या माणसाचा त्याग सविता कशी करू शकली ? या प्रश्नाचे उत्तर तिच्या व तिच्या पतीच्या भिन्न व्यक्तित्वात वाचकाला हळूहळू मिळत जाते. तारुण्यातील विषयवासना एवढेच तिच्या गृहत्यागाचे कारण असते तर तिचे चित्र रंगविण्याचे आकर्षण शरदच्चंद्रांना वाटलेच नसते. म्हणूनच तिच्या व ब्रजबाबूंच्या व्यक्तित्वातील अंतर त्यांनी कल्पिले आहे व हे अंतर कल्पिताना ब्रजबाबूंचे व्यक्तित्व एका वेगळया प्रकारचे फार वरच्या पातळीवरचे दाखवून सवितेच्या प्रमादाचे गांभीर्यही अनेक पटींनी वाढविले आहे. उलट तिच्या गृहत्यागास आप्तांचे कुभांड हे एक दुय्यम व तात्कालिक कारण कल्पून तिच्या अपराधाचे गांभीर्य कमी करण्याचाही त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

ब्रजबाबू चैतन्यपंथीय भगवद्‌भक्तात सहज सामावून जातील असे आहेत. संसार धर्मविहित असल्याने त्यांनी संसार केला; परंतु त्यात त्यांना रस नाही. त्यांचे सर्व तत्त्वज्ञान भक्ति, श्रद्धा, त्याग, विश्वास यावर आधारलेले आहे. आप्तांवर, भागिदारांवर, नोकरचाकरांवर, विश्वास ठेवल्यामुळेच त्यांचा सर्व व्यवहार बुडतो, तथापि इतका बालसदृश विश्वास ठेवण्यात आपली चूक झाली असे त्यांना कधीच वाटत नाही. चूक विश्वास ठेवणाऱ्याची नव्हे, विश्वासघात करणाऱ्याची, त्याला केव्हा तरी पश्चात्ताप होईल व ईश्वर त्याला क्षमा करील. विश्वास न ठेवणाऱ्याला जीवनात मनःशांती, समाधान मिळत नाही, असे ब्रजबाबूंचे साधे, सरळ, अव्यवहारी तत्त्वज्ञान आहे. अर्थात त्यांना आपल्या संसाराचे, व्यापार–व्यवहाराचे व शेवटी आपली कन्या रेणू हिचेही बलिदान करावे लागते.

अशा माणसाचा सर्व व्यवहार सांभाळण्यासाठी विश्वासू मित्राची, आप्ताची वा नोकर–माणसांची आवश्यकता असते. ब्रजबाबूंना असे विश्वासू आप्तमित्र कुणी नव्हते, ती जागा सवितेनेच भरून काढली होती. तिच्यावर सर्वभार सोपवून ते निश्चिंत झाले होते. तिच्या गृहत्यागाने त्यांचा फार मोठा आधार नाहीसा झाला व ते असहाय्य झाले. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे म्हणा, रेणूची नीट काळजी घेतली जावी म्हणून म्हणा किंवा सवितेप्रमाणे संसारात आधार देणारी पत्नी पुन्हा आपल्याला लाभू शकेल अशा आशेने म्हणा, त्यांनी पुन्हा विवाह केला; परंतु त्यांची नवी पत्नी सामान्य बुद्धीची व प्रेमश्रद्धाशून्य होती. अर्थात ब्रजबाबूंच्या मूल्यांत अगर वागण्याच्या पद्धतीत कोणताच फरक झाला नाही. तो त्यांचा जन्मदत्त स्वभावच होता. घरसंसाराची सर्व सूत्रे नव्या पत्नीच्या भावाच्या व आईच्या हातात जातात. जुन्या मतलबी आप्तांची जागा नव्या मतलबी आप्तांकडून घेतली जाते; पण कुलत्याग करून स्वतःला व रेणूला सर्वस्वी असहाय्य करून निघून जाणाऱ्या सवितेलाही ब्रजबाबू मनोमन क्षमाच करतात. इतकेच नव्हे तर तिच्या नावे ठेवलेले पन्नास हजार रुपये व दागिने बारा वर्षांनंतर भेट झाल्यावर तिला देऊन टाकतात. बुडत आलेला त्यांचा व्यवहार यामुळे पूर्णपणे बुडतो. नवी पत्नी आपल्या मुलीला घेऊन आपल्या भावाबरोबर वेगळी राहू लागते. तिची नीट व्यवस्था करून, राहता वाडा विकून, स्वतःला व रेणूला काहीही न ठेवता पूर्ण निष्कांचन होऊन, ब्रजबाबू एका गल्लीत भाड्याच्या एका गलिच्छ घरात तूर्त वस्ती करून राहातात. सर्व कामे आवरल्यावर आपल्या गावी जाऊन गरिबीत व गोविंदजींच्या सेवेत दिवस कंठण्याचा त्यांचा विचार असतो.

तथापी कथानकास सुरुवात होते तेव्हा ब्रजबाबूंस अजून विपन्नावस्था प्राप्त झालेली नाही. रेणूचा विवाह ठरल्याचे ऐकून तो मोडण्यासाठी काही तरी करावे या उद्देशाने सविता राखालराजच्या खोलीवर त्याची भेट घेण्यास येते, येथून कथानकास सुरुवात झालेली आहे. नियोजित वर सर्व दृष्टींनी चांगला असला तरी त्या घराण्यात पूर्वी कुणाला तरी वेड लागलेले होते, असे ऐकल्यामुळे सवितेला मुलीच्या भविष्यासंबंधी काळजी निर्माण होते. हा विवाह होऊ नये असा आपला आग्रहाचा निरोप राखालकरवी ब्रजबाबूंकडे पोहोचवावा या उद्देशाने ती राखालच्या भेटीला आलेली असते. दुसऱ्या दिवशी तेथे तिची अकस्मात ब्रजबाबूंशीच भेट होते. पतीच्या मनात आपल्याविषयी किल्मिष नाही. अजूनही आपल्या कर्तृत्वशक्तीवर त्याचा पूर्ण विश्वास आहे हे पाहून माईचे हृदय उचंबळून येते. गेली बारा वर्षे त्यांच्या जीवनातून जणू पुसून गेल्यासारखी होतात. ब्रजबाबू त्यांच्या नावचे पन्नास हजार रुपये व त्यांचे दागिने दुसऱ्या दिवशी माईंना परत आणून देतात, ते रागारागाने नव्हे, तर ज्याचे त्याला दिले पाहिजेत म्हणून; कुणाच्या ऋणात असताना मृत्यू आला तर गोविंदाच्या पायाजवळ जागा मिळणार नाही या भावनेने याची जाणीवही माईंना आहे. म्हणूनच त्या पैशांचा व दागिन्यांचा त्या नम्रतेने स्वीकार करतात.

येथेच कथानकाचे इतर धागेही गुंफण्यास लेखकाने सुरुवात केलेली आहे. माई राखालचा शोध घेत त्याच्या खोलीवर येतात, तेव्हाच त्याची एक गरीब भाडेकरू शारदा आत्महत्येचा प्रयत्न करते व कुणाच्याही मदतीला नेहमी धावून जाणारा राखाल तिला हॉस्पिटलमध्ये पोहोचवून तिचा जीव वाचवितो आणि पुढेही तिच्या अडचणी समजावून घेऊन तिला मदत करतो. गेल्या कित्येक वर्षांत त्याची व माईची भेट झाल्याचे दिसत नाही. ब्रजबाबूंकडेही तो अधूनमधून जात असला पाहिजे. त्यांनी पुन्हा विवाह केल्यानंतर बदललेल्या परिस्थितीत तो स्वतंत्रपणे खोली घेऊन राहू लागला व शिकवण्या आणि अन्य किरकोळ कामे करून उदरनिर्वाह करू लागला असे दिसते. इतरांना राखालराज हरकाम्या वाटत असला तरी त्याच्या सद्‌भावनेला निःस्पृहतेची धार आहे. स्वतःच्या कामांचा व्याप सांभाळून तो आता मात्र ब्रजबाबूंना वारंवार भेटत राहातो. रेणूच्या आजारात त्याचाच मोठा आधार ब्रजबाबूंना मिळतो व पुढेही मिळत राहातो. ब्रजबाबू यांच्या कुटुंबातून सवितेच्या गृहत्यागानंतर केव्हा तरी दूर फेकल्या गेलेल्या राखालचा घनिष्ठ संबंध पुनः ब्रजबाबू-रेणू या कुटुंबाशी जोडला जातो. त्याचप्रमाणे माईशी पुनः एकदा संबंध

जोडला गेल्यामुळे व माईबद्दल त्याला लहानपणापासून प्रेमादर असल्याने तो त्यांच्याकडेही आता अधूनमधून जात राहातो. ज्या शारदेस त्याने वाचविले तिची अधूनमधून खबर घेणे व या विधवा, अनाथ तरुणीस मदत करत राहाणे हेही त्याचे एक काम होऊन बसते. त्यातूनच शारदेबद्दल त्याच्या मनात जिव्हाळा व प्रेम निर्माण होते. अशा तऱ्हेने त्याच्याकडून माईंना व्रजबाबू–रेणू यांची खबर नेहमी मिळत राहाते.

तथापी सविता, राखाल, शारदा यांच्या स्वभावविशेषांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि देवाचा परिहास सवितेच्या वाट्याला तिच्या स्वभावामुळेच वारंवार कसा येतो याचे चित्रीकरण करण्यासाठी एक प्रसंग लेखकाने येथे अतीव कुशलतेने योजला आहे. व्रजबाबूचे सर्वस्व नाहीसे होते, तेव्हा राखाल गावात नसतो. तो परत आल्यावर सहज त्यांच्या भेटीस जातो, तेव्हा घर कर्जापायी विकून ते शेजारच्याच गल्लीत राहायला गेल्याचे त्याला कळते. तेथे जाऊन त्यांची तात्पुरती व्यवस्था लावल्यानंतर तेथील परिस्थितीमुळे स्वत:च्या मनाला आलेला दु:खावेग कसाबसा आवरून तो माईकडे येतो. माई त्या वेळी रमणीबाबूंनी योजिलेल्या पार्टीमध्ये गर्क असतात. पूर्वी राखालला माईंनी आपला मुलगा मानले होते. मनाच्या उद्विग्न अवस्थेत तो माईकडे काही रकमेची मागणी करतो. व्रजबाबूंना मदत करता यावी म्हणून ही मागणी होती हे उघडच आहे; तथापि त्याच्या विपन्नावस्थेचा व रेणूच्या आजाराचा उल्लेख तो अर्थातच करीत नाही. माईंना व्रजबाबूंवरील संकटाची कल्पना नाही. शिवाय पाहुण्यांच्या गडबडीत त्या असतात, हे खरे; तथापि ज्या राखालला पूर्वी आपण आपला मुलगा मानले होते, त्याला आज कोणती अडचण आहे, किती रकमेची गरज आहे, ती का आहे याबद्दल साधे कुतूहलही न दाखवता 'माझ्याजवळ पैसे नाहीत' असे उत्तर त्या देतात. त्यांच्या स्वयंकेंद्रित मनाचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. शारदेच्या मदतीने आपले घड्याळ ठेवून राखाल पैसे उभे करतो व व्रजबाबूंना आणि आजारी रेणूला मदत करतो. शारदेच्या सहज बोलण्यावरून नंतर माईंना कळून येते की, कुणी सज्जन माणूस दैवगतीमुळे एकदम विपत्तीत सापडल्यामुळे व त्याची मुलगी आजारी असल्यामुळे राखाल त्यांना मदत करीत आहे. ही कथा व्रजबाबू व रेणू यांचीच असावी याबद्दल माईंची मनोमन खात्री पटते व त्या पश्चात्तापाने पोळू लागतात. आजारी रेणूला भेटण्यासाठी त्यांचे आईचे मन अधीर होऊन जाते. राखाल न भेटल्याने त्या स्वत: पत्ता काढीत शारदेला बरोबर घेऊन व्रजबाबूकडे जातात. आधीच पश्चात्तापदग्ध झालेल्या त्यांच्या मनात व्रजबाबूंची विपन्नावस्था पाहून व तशा अवस्थेतही ईश्वरावर हवाला ठेवून शांत राहाण्याची त्यांची वृत्ती पाहून, पतिप्रेमाची भावना उचंबळून येते. मधला बारा वर्षांचा काळ जणु पुसून जातो. संसार पूर्ववत सुरू करण्यास त्या आतुर होतात. मनाने त्या आपल्या घरकुलात पूर्णपणे मिसळूनही जातात व व्रजबाबूंनी त्यांचा पुन: स्वीकार न केल्यास तेथेच कुठे तरी दासाप्रमाणे राहून आजारी कन्येची व पतीची मनोभावे सेवा करण्याचे त्या मनोमन ठरवूनही टाकतात.

व्रजबाबूंच्या विपन्नावस्थेमुळे माईंच्या पश्चात्तापाला विशेष धार चढते हे खरे; परंतु त्या विपन्नावस्थेची वेळीच खबर न मिळण्याचे व नकळत त्यांच्याकडून जी मदत झाली असती ती करण्याच्या संधीला पारखे होण्याचे दुर्भाग्य त्यांच्या वाट्याला त्यांच्याच अनवधनाने येते. नुकतेच पतीकडून मिळालेले पन्नास हजार रुपये रमणीबाबूंच्या साहाय्याने नव्या घराच्या खरेदीत गुंतवून, त्याबद्दल रमणीबाबूंनी दिलेल्या पार्टीत त्या मग्न असता, इकडे व्रजबाबू दिवाळखोर ठरून, राहते घरही विकण्याची त्यांच्यावर पाळी येते व रेणूही आजारी पडते, या गोष्टींची खबरही माईंना नाही व ज्याच्याकडून ती मिळाली असती त्या राखालशी त्या तुटकपणे वागतात. दैव त्यांच्याशी नेहमीच असा लपंडाव खेळत राहाते. चुका करणे व नंतर त्याबद्दल पश्चात्ताप करीत राहाणे हाच माईंचा स्थायीभाव आहे की काय, असा विचार कथानकाच्या ओघात वाचकांच्या मनात निर्माण होतो.

व्रजबाबू–रेणू यांना अर्थातच माईंकडून कोणतीच मदत नको आहे. कुलत्यागाबरोबर बारा वर्षांपूर्वी माईंचा संबंध संपला, नाते संपले. माई पतिता आहे. आजारी रेणूला भेटण्यासाठी त्या जातात तेव्हा वैष्णववृत्तीच्या व्रजबाबूंकडून व रेणूकडून त्यांचे स्वागत होते; परंतु भेटीसाठी आलेल्या माणसाचे व्हावे तसे ते सौजन्यपूर्ण परंतु औपचारिक असते. रेणूबद्दल वात्सल्य, प्रेम, करुणा इत्यादी भावनांनी माईंचे हृदय उचबंळून येत असले तरी रेणूला व व्रजबाबूंना त्यांच्याबद्दल करुणाच वाटते. पुन्हा आपल्या कुटुंबात सामावून जाण्याची त्यांची कितीही उत्कट इच्छा त्या क्षणी असली तरी या कुलत्यागी स्त्रीला तिचा पति व कन्या एवढी मोठी क्षमा करू शकत नाहीत. एवढी मोठी क्षमा ईश्वरच करू शकला असता. व्रजबाबू म्हणतात, '*रेणू तुझी मदत स्वीकारणार नाही. माझ्या धर्माचे अनुशासन* म्हणून तू देशील ते मी घेईन. हात पुढं करून, तुझं दान घेऊन, पुरुषाचा शेवटचा अभिमान नष्ट करून टाकून, गवतापेक्षाही हीनदीन होऊन, मी जगाचा निरोप घेईन! मग तरी गोविंदाच्या पायाशी मला ठाव मिळो, एवढीच माझी इच्छा आहे!'

रेणू व व्रजबाबू या दोघांचे जे कुटुंब आज आपल्या नजरेसमोर दिसते ते विशिष्ट मूल्यांचे निदर्शक असे कुटुंब आहे. गोविंदजीची मूर्ती व व्रजबाबू या दोघांची काळजी वाहणारी रेणू ही घरातील कर्ती स्त्री आहे. वयाच्या नवव्या वर्षापासून गोविंदजींच्या सेवेच्या तयारीचा सर्व भार तिच्यावरच आहे. कारण तिच्या नव्या आईला त्यात रस नसतो. असहाय्य, निष्पाप, बालसदृश व ईश्वरनिष्ठ *पित्याची प्रेमळपणे सेवा करणे, हा रेणूचा धर्म.* कुलत्यागी आईची जागा आपण भरून काढली पाहिजे, पित्याला आपल्याखेरीज खरोखर कोणीही नाही, याची जाणीव तिला प्रथमपासूनच असावी. तिचा विवाह सवितेच्या आग्रहामुळेच मोडतो. तिचा विवाह करून दिला म्हणजे व्रजबाबू संसाराच्या जबाबदारीतून पूर्णतया मुक्त होणार होते. विवाह मोडल्यामुळे ते रेणूच्या काळजीत अधिकच गुरफटले जातात. हा विवाह मोडल्यामुळे आणखी एक गोष्ट घडून येते. पुढे केव्हा तरी बुडणारा व्रजबाबूंचा व्यवहार तत्काळ बुडतो. मुलीचा

**दैवाचा परिहास सवितेच्या वाट्याला तिच्या स्वभावामुळेच वारंवार येतो.**

विवाह त्यांनी मोडल्यामुळे त्यांची धाकटी पत्नी व आप्तस्वकीय त्यांना वेढ्यात काढतात व सर्व व्यापार–व्यवहार त्यांना तत्काळ आवरावा लागतो. आपल्या नावची घरे व पंचवीस हजारांची रोकड घेऊन रेणूची सावत्र आई आपल्या बंधूच्या आश्रयाने वेगळी राहू लागते. देण्यापायी ब्रजबाबूंना राहता वाडासुद्धा विकावा लागतो. तथापि धाकट्या पत्नीच्या नावचे जे होते ते जसे ब्रजबाबू तिला विनातक्रार देऊन टाकतात. तसेच कुलत्यागी सवितेच्या नावे जे होते तेही ब्रजबाबू तिला काळजीपूर्वक परत करतात. त्यांच्या धर्मनिष्ठेचा अर्थ हा असा आहे. बुद्धिमान सवितेला तो समजतोही. ब्रजबाबूंची व रेणूची विपन्नावस्था हा आपल्या कुलत्यागाचाच एक प्रकारे परिपाक आहे. या जाणिवेने तिच्या पश्चात्तापाला विशेष धार प्राप्त होते. रेणूच्या विवाहात तिने केलेला हस्तक्षेपही निरर्थक ठरतो. रेणूच्या सावत्र बहिणीचा त्याच मुलाशी विवाह होतो व ती दोघे सुखाने नांदतात. मुलीच्या कल्याणासाठी आज इतक्या वर्षांनी सविता जे करायला जाते त्यातून अनर्थच उद्भवतो. देव अशा प्रकारे तिचा पुनःपुन: परिहास करीत राहतो. किंबहुना देवाचा परिहास ती पुनःपुन: स्वतःवर ओढवून घेते.

रेणूला काहीच राहात नाही. तथापि तिच्या सावत्र मामाबरोबर धासाधीस करून ते मागावे असे ब्रजबाबूंना किंवा रेणूलाही वाटले नसावे. या व्यवस्थेबाबत रेणूचीही काही तक्रार नाही. बापाची व तिची मूल्ये एकच आहेत. संस्कारामुळे पित्याइतकीच त्यागशक्ती व सहनशीलता रेणूमध्येही निर्माण झालेली आहे. आता विवाहच न करता पित्याच्या सेवेत पुढील काळ कंठण्याचा निश्चय ती मनापासून करते. ती ब्रजबाबूंना म्हणते, 'तुम्ही काही माझे अदृष्ट बदलू शकत नाही! बाबा, लहानपणीच जिला आई टाकून निघून गेली, जिच्या लग्नाच्या दिवशीच ध्यानीमनी नसलेलं विघ्न उत्पन्न होऊन सर्वच काही छिन्नभिन्न होऊन गेलं, जिच्या बापाची राज–संपत्ति जादूप्रमाणं वाऱ्यावर उडून गेली, तिला सुखोपभोगासाठी परमेश्वरानं जगात पाठविलेलं नाही! माझ्या कपाळीच हे लिहिलेले आहे बाबा! माझ्यासाठी काळजी करून तुम्ही आपल्या मनाला त्रास करून घेऊ नका!'

ब्रजबाबू व रेणू या असहाय्य व निष्कांचन, विपत्तीने पूर्णपणे ग्रासलेल्या व्यक्तीत धर्मनिष्ठा व दैवाचा स्वीकार यामुळे विलक्षण आंतरिक सामर्थ्य निर्माण झालेले आहे. किंबहुना हे सामर्थ्य त्यांच्यात प्रथमपासूनच आहे. कादंबरीच्या सुरुवातीच्या भागातीलच हा संवाद पाहा : राखाल म्हणतो, 'पण काका खूप दुर्बल आहेत असे खरोखर वाटतं तुम्हाला माई?'

'ते तर अगदी दुर्बल स्वभावाचे पहिल्यापासूनच आहेत राजू! यात संशय कसला?'

राखाल म्हणाला, 'दुर्बल प्रकृतीची माणसं इतके आघात मुकाट्यानं सोसू शकतात असं वाटतं तुम्हाला माई? आयुष्यात किती त्रास, किती ताप काकाबाबूंनी सहन केला आहे हे तुम्हाला माहीत नाही माई; पण मला चांगलं माहीत आहे–'

व्यावहारिक बाबतीत दुर्बल असलेले ब्रजबाबू ईश्वरभक्ती, त्याग, धर्मनिष्ठा, निष्पापता, सहनशीलता यामुळे सामर्थ्यसंपन्न आहेत. बुद्धिमान, व्यक्तित्वसंपन्न, व्यवहारनिपुण व परोपकारी असलेली सविता आत्मकेंद्री वृत्तीमुळे, त्यागाच्या व समर्पणाच्या अभावामुळे स्खलनशील व दुर्बल आहे. माणसाची शक्ती खरोखर कशात असते हा प्रश्न त्या त्या माणसाच्या मूल्यांवर व जीवनदृष्टीवर शेवटी अवलंबून आहे. ब्रजबाबूंच्या व रेणूच्या रक्षणाचा भार एक गृहिणी व माता या नात्याने सवितेवर पडला असता तो टाकून देऊन ती त्यांच्या व स्वतःच्या जीवनाचीही परवड करते. तरीही तिची संवेदनक्षमता व तज्जन्य पश्चात्ताप यामुळे तिच्याबद्दल शरदबाबूंना व म्हणून वाचकांना अपार सहानुभूती वाटते. जे 'चांगले' म्हणून आपण समजतो त्यासाठी कधीकधी सर्वस्वाचाच नव्हे तर स्वत्वाचाही त्याग करावा लागतो. तो करण्याचे सामर्थ्य सवितेत नाही, म्हणून ती अतिसामान्य माणसाइतकी स्खलनशील आहे. अर्थात, ज्यासाठी त्याग करावयाचा ते 'चांगले' कोणते याबाबत ब्रजबाबूंच्या व तिच्या कल्पना प्रथमपासूनच भिन्न असाव्यात. या कादंबरीच्या कथानकाच्या मध्यावर, तिच्या मदतीचा अस्वीकार ब्रजबाबू–रेणू यांजकडून झाल्यानंतर, विमलबाबूंचा व तिचा परिचय होऊन त्यांच्या निरपेक्ष प्रेमाचा स्वीकार करण्याकडे तिच्या मनाचा कल होतो, तेव्हा आपल्याला प्रथम तिच्या व्यक्तित्वाची व समस्येची खरी कल्पना येते. ब्रजबाबूंबद्दल तिला वाटणारी करुणाही खरी, रेणूबद्दल वाटणारे वात्सल्यही खरे व विमलबाबूंबद्दल वाटणारे प्रेमही खरे. रमणीबाबूंच्या सहवासाच्या ग्लानीतून बाहेर पडल्यावर व ब्रजबाबूंशी पुन्हा सहजीवन अशक्य आहे असे दिसून आल्यावर, तिचे ि्तते मन नवीनच ओळख झालेल्या विमलबाबूंकडे ओढ घेऊ लागते; परंतु पश्चात्तापातून ती मुक्त होऊ शकत नाही. आपला कुलत्याग ब्रजबाबूंच्या विपन्नावस्थेला किती प्रमाणात कारणीभूत आहे व त्यांच्या अव्यवहारीपणाचा व ईश्वरभक्तीचा तो किती प्रमाणात परिपाक आहे याचा काटेकोर हिशेब ती करू पाहाते; परंतु स्वतःचे निरपराधित्व तिला स्वतःपुढे शाबित करता येत नाही.

ईश्वरभक्तीत स्वतःला हरवून बसण्याची ब्रजबाबूंची वृत्ती सवितेला मनापासून कधीच आवडलेली नसावी. मूलतः ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची 'आधुनिक' स्त्री आहे. ती स्वयंकेंद्रित आहे; परंतु ब्रजबाबूंशी विवाह झाल्यावर तिला त्यांच्या निष्पाप वृत्तीचे कौतुक वाटले असले पाहिजे. पतीवर वात्सल्याने व निष्ठेने प्रेम करून ती त्यांचा संसार समर्थपणे उभारून देते. तथापि हे सर्व खोटेच, असे तिला मधून मधून वाटले असले पाहिजे. तिच्या मनात ईश्वरनिष्ठा रुजलेली नाही. भक्ती हे तिचे मूल्यच नाही. ती बुद्धिवादी आहे. पतिभक्तीमुळे ती पतीच्या मूल्यांचाही आदर करीत होती इतकेच; परंतु पतिभक्ति व ईश्वरभक्ति या दोन्ही गोष्टींमागच्या श्रद्धेचा पायाच कच्चा असल्यामुळे ती क्षणात या दोन्ही मूल्यांना हरवून बसू शकली. तिचे व्यक्तित्व दुहेरी आहे. श्रद्धाभक्तीने पतिप्रेम व अपत्यप्रेम यात स्वतःला हरवू पाहाणारी एक सविता व प्रेमाचा निसर्गदत्त प्रत्यय शोधू पाहाणारी, प्रेमाच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तित्वाचे साफल्य शोधू पाहाणारी सविता, अशी सवितेची दोन स्वरूपे प्रथमपासूनच असावीत. तिच्या मनाचा एक कप्पा प्रथमपासूनच स्वतंत्र, पतिप्रेमाने व वात्सल्यभावनेने न व्यापलेला असा आहे. तिची वृत्ती संपूर्ण समर्पणाची नाही. पतिप्रेमात स्वतःला हरविण्याची नाही. तिला आई मानणाऱ्या राखालने एकदा तिच्या स्वयंकेंद्रित

मनाची निर्भर्त्सना केलेली आहे. तत्त्वशोधकाची अंतर्मुख व विनीत वृत्ती तिच्यामध्ये नाही व प्रेमशोधनासाठी हीच वृत्ती आवश्यक असते याची जाणीवही तिला नाही. तिची प्रेमकल्पना आत्मनिष्ठ आहे. एखाद्या व्यक्तीचा स्वीकार हा त्या त्या व्यक्तीच्या गुणदोषांसह करावयाचा असतो. त्या व्यक्तीवर प्रेम करताना स्वतःला विसरून स्वतःच्या व्यक्तित्वाला मुरड घालावी लागते. त्या व्यक्तीसाठी, त्या व्यक्तीभोवतीची कटु परिस्थिती हसतमुखाने स्वीकारावी लागते, बुद्धिवाद बाजूला ठेवावा लागतो, हे तत्त्व पचनी न पडल्याने तिच्याकडून गृहत्याग घडून येतो. ती अहंकारी व अभिमानी आहे हेही खरेच, म्हणूनच तारुण्यात तिचे मन जेव्हा बंड करून उठते त्या वेळी ती सहजप्रेरणेने वागते. कर्तव्य, वात्सल्य या भावना क्षणभर विसरल्या जातात. पतीच्या विश्वासास व प्रेमास ती पात्र झालेली असते अशी स्त्री नातेवाइकांच्या दुष्ट व मत्सरी वर्तनामुळे चिडून जाऊन कुलत्याग करू शकणार नाही. पतीवर खरेखुरे प्रेम नसलेल्या व म्हणून क्षणिक मोहाने पतीला व अपत्याला असहाय्य करून निघून गेलेल्या सवितेची ही कहाणी आहे. सज्जनपती मिळालेल्या; परंतु कर्तव्यभावनेपेक्षा प्रेमभावनेला व स्वतःच्या व्यक्तित्वाला अतिरिक्त महत्त्व देणाऱ्या स्त्रीची ही करुण कहाणी आहे व ती शरदबाबूंनी मुद्दाम करुण बनविलेली आहे. आपण जे केले ते पाप आहे याची जाणीव तिला तीव्रतेने झाली असती तर त्या पापाच्या बोजाने ती परागंदा झाली असती. 'चरित्रहीन'मधील किरणमयीप्रमाणे वेडी झाली असती किंवा एखाद्या अथांग नदीच्या पात्रात तिने उडी घेतली असती. पती व रेणू यांना विपन्नावस्थेत पाहून सवितेला कितीही पश्चात्ताप झाला तरी गृहत्यागाचा आपला प्रमाद क्षम्य मानण्याकडे तिची प्रवृत्ती आहे. स्वतःकडे त्याची जबाबदारी न घेता 'पूर्वजन्मीचे फळ' इत्यादी संदिग्ध शब्दात तिने आपल्या कुलत्यागाची कारणे सांगितली आहेत. अशी चूक करण्यावरच त्या प्रमादाची जबाबदारी खरोखर येत नाही काय, असा प्रश्न सरळपणे तिला विचारणे शारदेला भाग पडते. व्रजबाबूंनी पुन्हा आपला स्वीकार करावा असा आग्रह ती करू शकते. याचे कारण हेच की, आपला प्रमाद तिला अक्षम्य वाटत नाही. अंतर्मुख होऊन केलेल्या आत्मशोधनानंतर तिला जे निःसंदिग्ध सत्य सापडते ते एवढेच की, पतीवर तिचे खरेखुरे प्रेम नव्हते व नाही. विमलबाबूंना ती म्हणते, 'अंतरीची भक्तिश्रद्धा व संस्कारगत धारणा आणि हृदयाचे प्रेम ही एक नाहीत. करुणा, ममता व सहानुभूती पुष्कळ ठिकाणी प्रेमाची उभारणी करतातही; परंतु माझा विश्वास असा आहे की, स्त्री आणि पुरुषांत आत अन् बाहेर जर स्वाभाविक ऐक्य नसेल तर प्रेम निपजूनही त्याचं चांगलं सार्थक होत नाही. पुष्कळ वेळा श्रद्धा–भक्तीला किंवा स्नेह–ममतेलाच मनुष्य प्रेम समजून चूकही करतो–स्नेह–ममता खरोखरीच जर प्रेमात परिणत झाली तरच ते प्रेम!'

रमणीबाबूंचे स्नेही विमलबाबू हे सिंगापूरहून कलकत्त्यास येतात तेव्हा ते सवितेची मुद्दाम ओळख करून घेतात. तिची हकीकत त्यांना माहीत असते. याच वेळी पश्चात्तापदग्ध सवितेचे व रमणीबाबूंचे भांडण होऊन ती त्यांच्याशी असलेला संबंध तोडून टाकते. विमलबाबूंचे मन तिच्याकडे ओढले जाते. पुष्कळ जग पाहिल्याने मनाच्या परिपक्व अशा अवस्थेप्रत पोहोचलेल्या या करोडोपतीला सवितेच्या अपराधाचा न्याय करण्याची आवश्यकता वाटत नाही. ऐश्वर्याच्या बळावर पूर्वायुष्यात पुष्कळ खेळ खेळलेला हा माणूस. क्षुद्र स्त्रियांनी बनविले याची जाणीव त्याला आहे. प्रेमाच्या धनाला बांधून ठेवता येत नाही हा धडाही त्यांना आयुष्यात मिळालेला आहे. धीर–गंभीर आकृतीचे, मृदु वाणीचे, सर्व व्यवहार संयमित व सुनियंत्रित ठेवणारे विमलबाबू सवितेच्या मनात नकळत आत्मविश्वासाची, सहिष्णुतेची व स्थैर्याची भावना निर्माण करतात.

तथापि माईंच्या मनाची ही ओढ राखालला समजू शकत नाही. हरिणपूरला तारककडे काही दिवस जाऊन राहण्याचे माई विमलबाबूंच्या सल्ल्याने ठरवितात. तारक हा वास्तविक राखालचा मित्र, त्याच्यामुळे तारकची सवितेशी ओळख झालेली असते; परंतु त्यानंतर व्यवहारी वृत्तीचा तारक परस्पर तिच्याशी स्वार्थासाठी परिचय वाढवून राखालला भेटण्याचेही टाळतो, याची चीड राखालला आलेली असते. तारकला माई आपला दुसरा मुलगा मानतात व राखालकडे व त्याच्या झालेल्या अपमानाकडे त्या एक प्रकारे दुर्लक्ष करतात. प्रकृतिस्वास्थ्यासाठी व मनःस्वास्थ्यासाठी त्यांनी तारककडे हरिणपूरला जावे असा सल्ला त्यांना विमलबाबूंनी दिला, यात विमलबाबूंचीही तशी चूक नव्हती; कारण तारकने त्यांना आग्रहपूर्वक निमंत्रण दिले होते. तरी त्याचा स्वतःचा सल्ला न घेता माईंनी तारककडे जाण्याचे ठरवावे हे राखालला आवडत नाही. वरवर साध्या वाटणाऱ्या प्रसंगांनाही काही अर्थ असतो व म्हणून केवळ सोयी–गैरसोयीचा विचार न करता काही जीवनमूल्यांचे व्यवधान माणसाने आचरणात ठेवले पाहिजे, असे मानण्याची राखालची वृत्ति दिसते. तारकबद्दल त्याला असूया वाटते असे सर्वजण समजतात. तथापि त्याची प्रतिक्रिया इतकी नव्हती. संकुचित मनाच्या व्यवहारी तारकला राखालप्रमाणेच आपला एक मुलगा मानण्यात माईंची मुळातच एक चूक होत होती. माईंना माणसाची पारख नव्हती काय? माणसांची पारख न करता केवळ स्वतःच्या वात्सल्यभावनेच्या तृप्तीसाठी माई कुणालाही जवळ करीत होत्या काय? आधारासाठी व प्रेमासाठी, विशेष विचार न करता त्यांनी याच प्रकारे रमणीबाबूंना जवळ केले होते व आता त्या विमलबाबूंना जवळ करीत होत्या, असे तर नव्हे? इतरांच्या गरजेपेक्षा स्वतःच्या गरजेतूनच या आत्मनिष्ठ स्त्रीचा परोपकार, प्रेम, वात्सल्य, स्फुरत होते काय? राखालची ही मानलेली आई अखेर एक सामान्य पतिता होती काय? पश्चात्तापाने पोळलेल्या माई आता सन्यस्त जीवन घालवू पाहतील अशी राखालची अपेक्षा असावी. व्रजबाबू व रेणू तिकडे विपन्नावस्थेत भिकाऱ्याचे जीवन जगत असता माई इकडे विमलबाबूंना जवळ करू पाहात होत्या, हे दृश्य त्याला घृणास्पद वाटले असावे व म्हणूनच तो त्यांना विमलबाबूंसमोर टाकून बोलतो. याला आणखी एक लहानसे तात्कालिक कारणही घडले.

**धीरगंभीर विमलबाबू सवितेच्या मनात नकळत स्थैर्याची भावना निर्माण करतात.**

राखालला तारकबरोबर जेवायला बोलवायला माई विसरलेल्या असतात. आयत्या वेळी त्या त्याला आग्रह करतात तेव्हा राखाल म्हणतो. 'कुणी बोलत नाही म्हणूनच मी बोलतो आई...दु:खितांच्या परममित्र आहात तुम्ही; परंतु तुम्ही दु:खितांच्या आई नाही. दु:खाची जाणीव हे तुमचं बाहेरचं ऐश्वर्य आहे, अंतरंगातील धन-वैभव नव्हे! त्यामुळे जितक्या सहजतेने तुम्ही एखाद्याला आश्रय देता तितक्याच सहजतेने तुम्ही त्याचा त्यागही करू शकता... तुम्ही माझे किती तरी केलं आहे माई! त्याचं स्मरण मी माझ्या अंतापर्यंत मनात कायम ठेवीन...केवळ तोंडच्या शब्दांनी नव्हे तर मनाच्या सर्व शक्ती एकवटून मी ते स्मरेन! मला वाटतं आता यापुढं तुमची माझी भेट होणार नाही अन् व्हावी अशी माझी इच्छाही नाही; पण माझ्या संग्रही जर थोडंबहुत पुण्य असेल तर त्याच्या बदल्यात मी परमेश्वराची प्रार्थना करीन की त्यानं आता तुमच्यावर दया करावी. अज्ञातामधून बाहेर काढून ज्ञातामध्ये त्यानं आता तुम्हाला स्थान द्यावं!'

एखाद्या लहान घटनेला अनेक महत्त्वपूर्ण मानसिकवृत्ती व घटना कारणीभूत झालेल्या दाखवून, त्या घटनेचे उलट-सुलट व संमिश्र असे स्वरूप उघड करून, ती घटना अर्थगर्भ करण्यात शरच्चंद्राचे कौशल्य सर्वत्रच दिसून येते. वर दिलेल्या राखालच्या शब्दापूर्वी मी जे त्याच्या प्रतिक्रियेचे विश्लेषण केलेले आहे ते अर्थातच कादंबरीत नाही. शरदबाबूंची पात्रे सूचक शब्दांत बोलतात व त्यांच्या सूचक हालचालींना व कादंबरीतील साध्या घटनांनाही महत्त्व असते. वर दिलेले राखालचे शब्द हे अशा संमिश्र, अर्थगर्भ व सूचक अशा लहानमोठ्या घटनांचा व प्रवृत्तींचा परिपाक आहेत, इतकेच नव्हे तर या भाषणाच्या प्रतिक्रियाही शरदबाबूंनी फार सूचकतेने व थोडक्यात रंगविलेल्या आहेत. राखालच्या वरील परखड शब्दांनी शारदेला राग येतो व ती तसे बोलूनही दाखविते; परंतु तिच्या भावना राखालमध्ये गुंतलेल्या असल्याने माईंबरोबर स्वत: हरिणपूरला जाण्याचा तिने केलेला बेत ती निग्रहाने रहित करते. विमलबाबूंना राखालच्या शब्दाचे आश्चर्य वाटते; परंतु ते शांत राहतात. त्यांचा व राखालचा पुरेसा परिचय अजून झालेला नसतो. ज्यांना तो इतके टाकून बोलतो त्या माईही शांत राहतात. कारण त्याच्या बोलण्यातली सत्यता त्यांना जाणवली असावी. शारदेने स्वत:चा बेत रहित केला याचे कारण त्यांना जाणवते व त्याचे त्यांना कौतुकही वाटले असावे; परंतु तिच्या वर्तनापासून धडा घ्यावयाचा तो मात्र त्या वेगळाच घेतात. राखालबद्दल प्रेम वाटत असल्याने त्याच्या कलाप्रमाणे शारदेने वागणे योग्य, तसे आपण विमलबाबूंच्या सल्ल्याप्रमाणे वागणे योग्य, असा वेगळाच कौल त्या शारदेच्या उदाहरणावरून घेतात व हरिणपूरला जाण्याचे निश्चित करतात.

शरच्चंद्रांची पात्रे एकमेकांबद्दल व स्वत:बद्दल जे उद्गार काढतात व एकमेकांशी ज्या पद्धतीने वागतात त्यावरून काळजीपूर्वक हिशेब करून सत्य काय ते वाचकांनी जाणावयाचे असते. शरदबाबू स्वत: ते फार क्वचित सांगतात. लहानसहान प्रसंगांतून, संवादांतून, एकमेकांबद्दलच्या उद्गारांतून आणि पात्रांच्या वृत्ती व जाणिवा यांमधून व्यक्ति-व्यक्तीतील संबंधांना शरदबाबू हळुवारपणे ताण देतात व त्या संबंधात सूक्ष्म बदलही घडवून आणतात. त्या संबंधाची रचना विशिष्ट क्षणी वेगळीच करून दाखवून त्यातून फार मोठा अर्थ ते निर्माण करू शकतात. वरील उदाहरणात राखाल, शारदा, माई, विमलबाबू यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांना सूक्ष्म ताण दिलेला आहे; शिवाय कादंबरीच्या शेवटी असेही सूचित केले आहे की, पुढे-मागे रेणूशी तारक विवाह करू शकेल, या दृष्टीने, रेणूचा विवाह मोडल्यापासून तारकवर माई लक्ष ठेवीत असाव्यात.

व्रजबाबूंवर माईंचे खरेखुरे प्रेम नव्हतेच याची कल्पना शारदेला नाही. तिला माईंच्या खऱ्याखुऱ्या समस्येची विशेष जाणीव नाही. ती करून घेण्याचा आपला अधिकार नाही असे शारदा समजते. सवितेच्या व्यक्तिमत्त्वाचा व परोपकारी वर्तनाचा इतर गरीब भाडेकरूंप्रमाणे तिच्यावरही प्रभाव पडलेला असतो. सविता ही रमणीबाबूंची लग्नाची बायको नव्हे हे त्या सर्वांना माहीत असते; तथापि ही एक बड्या घरची लेक व सून केवळ नशिबाच्या फेऱ्यात सापडून इकडे रमणीबाबूंच्या आश्रयाला येऊन राहिली असावी असे ते समजतात. 'जो कोणी पति मिळेल त्याच्याबरोबर श्रद्धेने संसार करण्यासारखे सुख नाही' असे माई आपल्या पश्चात्तापदग्ध अवस्थेत शारदेला बोलून दाखवतात. त्यामुळे तर तिचे मत माईंबद्दल अधिकच चांगले होते. माईंच्या आश्रयाला राहिलेली व स्वत: पतित असलेली शारदा त्यांच्याकडे नेहमी आदराच्या व सहानुभूतीच्या भावनेनेच पाहाते; त्यांच्यावर टीका करण्याची भूमिका ती घेत नाही!

राखालची गोष्ट थोडी वेगळी आहे. त्याचे मन स्वच्छ आहे व तो नि:स्पृह आहे. त्यामुळे तो माईंचा मानलेला मुलगा असूनही व माईंबद्दल त्याला पूर्ण सहानुभूति व आदर असूनही, प्रसंग येताच तो आपले विचार स्पष्टपणे त्यांना बोलून दाखवितो. राखाल हा श्रीकांतच्या जातीचा, शक्य तो तटस्थपणे वावरणारा तरुण आहे व म्हणूनच त्याच्या मतप्रदर्शनाला विशेष महत्त्व आहे. तो सहृदय असला तरी एखाद्या व्यक्तीसाठी किंवा समाज-सुधारणेच्या एखाद्या तत्त्वासाठी एकंदर समाजाची घडीच विस्कटून टाकण्याची कल्पना त्याला मानवत नाही. परंपरेप्रमाणे चालणाऱ्या परंतु विशाल माणुसकीच्या अनेक व्यक्ती शरच्चंद्राच्या विश्वात वावरतात; त्यांचा या कादंबरीतील प्रतिनिधी म्हणजे राखाल. या परोपकारी व तटस्थ वृत्तीच्या तरुणाच्या शब्दाद्वारे शरदबाबूंनी आता सवितेकडे पाहण्याचा वेगळाच दृष्टिकोण सूचित केलेला आहे. त्यामुळे वाचकालाही किंचित धक्का बसतो. कारण आतापर्यंत शरच्चंद्रांनी कथानकाची रचनाच अशी केलेली आहे की, वाचकांना सवितेबद्दल सहानुभूती वाटावी.

राखालचा विमलबाबूंशी हळुहळू परिचय होत जातो व त्यांच्याविषयी त्याच्या मनात तेढ राहात नाही. ते चांगले असल्यामुळेच त्यांचे सहाय्य तो व्रजबाबूंच्या आजारात घेऊ शकतो. तथापि नंतर व्रजबाबूंसाठी वृंदावनला माराव्या लागलेल्या फेऱ्यामुळे त्याच्या उदरनिर्वाहाचे साधनच बुडाले. तरीही स्वत:साठी कोणतीच मदत विमलबाबू किंवा माईंकडून घेण्याचे तो नाकारतो. तशी मदत त्याने घेतली असती तर व्रजबाबू-रेणू यांना मदत करण्यास तो रेणूच्याच नव्हे तर त्याच्या स्वत:च्याही दृष्टीने लायक ठरला नसता! माईंच्या लाखाच्या इस्टेटीकडे पाठ फिरवून, संपूर्णतया निष्कांचन व निरा-

धार होऊन, विवाहाची कल्पनाच सोडून देऊन, रेणू वृंदावनला बापाच्या सेवेत निमग्न असते. तिकडे जाण्यापूर्वी कलकत्याच्या संक्षिप्त वास्तव्यात लोकरीचे कपडे विणून व राखालच्या मदतीने ते विकून ती आपला व बापाचा उदरनिर्वाह करीत असते. माईंनी पाठविलेली फळेसुद्धा ती परत करते! राखालने केलेल्या तिच्या विवाहाच्या प्रयत्नाला तिचे संक्षिप्त उत्तर एवढेच की, 'हिंदूंच्या घरच्या मुलीचा हळदसमारंभ दोनदा होत नाही!' स्वतःच्या मूल्यांमध्ये काही बदल घडवून न आणता तिच्या जीवनात हस्तक्षेप करणाऱ्या माईंच्या हातून चांगले नव्हे, केवळ वाईटच होऊ शकेल, असे जणू तिला सुचवावयाचे असते. तिच्या आईच्या व तिच्या जीवनदृष्टीतील फरक तिला जणु या उत्तराने स्पष्ट करावयाचा असतो! माईंना तो तत्काळ स्पष्ट होतोही.

कारण रेणूच्या विवाहात माई जो हस्तक्षेप करतात त्यालाही एक प्रकारचा अहंकारच म्हणता येईल. बारा वर्षांत त्यांनी कधी मुलीची भेट घेतलेली नव्हती. आपण जिवंत आहो की नाही याबद्दल रेणूला माहिती आहे काय, याचीही त्यांना कल्पना नव्हती. रेणूची नवी आई व मामासाहेब ब्रजबाबूंचा बुडता व्यवहार, याबद्दल त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. आपल्या कुलत्यागाबद्दल रेणूच्या काय प्रतिक्रिया आहेत हे त्यांनी कधी जाणून घेतले नव्हते. या परिस्थितीत रेणूचा ठरलेला विवाह, ब्रजबाबूंकडे आग्रह धरून आईच्या अधिकाराने त्या मोडतात. तसे करताना त्यांनी सामाजिक संकेताचा विचार केलेला नाही, आधीच रेणू ही एका कुलत्यागी स्त्रीची मुलगी; त्यातून तिचे लग्न एकदा मोडल्यावर ब्रजबाबूंसारख्या माणसाला पुनः तिच्यासाठी वर शोधणे किती अवघड होते हे त्यांनी लक्षात घेतलेले नाही. किंबहुना मुलीच्या कल्याणाच्या इच्छेबरोबरच सामाजिक संकेताविरुद्ध बंड करण्याची वृत्तीही त्यांच्या हस्तक्षेपामागे आहे. आपल्याला योग्य पति न मिळाल्याने आपला संसार उध्वस्त झाला, मुलीला तरी चांगल्यात चांगला पति मिळून तिचे पतीशी पूर्ण मनोमीलन होण्यात काही अडचण राहू नये, आपल्याला जे मिळाले नाही ते मुलीला मिळावे, अशा प्रकारची प्रच्छन्न आत्मकरुणेची वृत्तीही या आकस्मिक हस्तक्षेपात भासमान होते. आपला बळी गेला तसा मुलीचा जाऊ नये असा विचार त्यांच्या जाणिवेत कुठे तरी असावा. अपत्याच्या कल्याणाची इच्छा त्यांच्या मनात होती हे अर्थात खरेच, ब्रजबाबूंचा सर्व व्यवहार बुडू लागला होता, याची त्यांना जाणीव नव्हती हेही खरे प्रत्येक घटनेला वा वृत्तीला अनेक बाजू दाखविणारे शरच्चंद्र माईंचा हा हस्तक्षेप स्वाभाविक करून दाखवतात. तथापि माईंना अपत्याची एवढी चिंता होती तर शेवटी त्या वृंदावनला रेणू व ब्रजबाबू यांची सेवा करीत का राहात नाहीत? वृंदावनच्या संकेताप्रमाणे ते अशक्य मुळीच नव्हते. तथापि कोणत्याही गोष्टीसाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची वृत्तीच माईंच्या ठिकाणी नाही. राखालचे भाष्य बरोबर होते असेच शेवटी म्हणावे लागते. इथे माईंचा बुद्धिवाद आड आला असावा. भगवद्भक्तीची मदिरा प्राशन करून धुंद होणाऱ्या माणसाने विवाह करून संसारात पडू नये असे माईंचे या वेळचे भाष्य आहे. ब्रजबाबू थोडे व्यवहारी वृत्तीचे व महत्त्वाकांक्षी असते तर आपले त्यांच्यावर प्रेम जडले असते किंवा आपल्या गृहत्यागानंतर निदान पतीला व मुलीला सुखात पाहाण्याचे भाग्य आपल्याला लाभले असते. अशी माईंच्या मनाची प्रतिक्रिया आहे. एवढेही सुख त्यांना लाभू न देण्यात ब्रजबाबूंनी मोठा अन्यायच केला होता! त्यांच्या गृहत्यागामुळे असहाय झालेल्या ग्रामस्थांनी धिक्कारलेल्या नव्या प्रेम-श्रद्धाशून्य विवाहसंबंधाने अधिकाधिक विरक्त झालेल्या कन्येच्या विवाहाच्या चिंतेने पोखरून निघालेल्या माईसकट सर्वांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी सर्वस्वाचे दान करून निष्कांचन झालेल्या, ब्रजबाबूंच्या मनाचे सौंदर्य व सामर्थ्य माईंना समजू शकत नाही! रेणूच्या मृत्यूचा धक्काच त्यांना शुद्धीवर आणू शकतो. तरीही विमलबाबूंना निरोप देताना आपला शेवटचा आसरा आपण सोडून देत आहोत या विचाराने त्यांना स्वतःचीच करुणा येते!

ब्रजबाबू–रेणू–राखाल यांची त्यागमय व निवृत्तिपर मूल्ये व सवितेची वरच्या पातळीवरचीच, परंतु भोगमय व प्रवृत्तिपर मूल्ये यांतील हा संघर्ष आहे. त्याची जाणीव सवितेलाही आहे म्हणूनच ती राखालच्या निर्भर्त्सनेकडे मूकपणे दुर्लक्ष करून गप्प बसते, शारदेचा हरिणपूरला जाण्याविषयीचा बदलेला बेत ती समजू शकते. हा झगडा दोन प्रकारच्या जीवनदृष्टीमधला आहे. अदृष्टावर विश्वास ठेवून जीवनाकडे तटस्थतेने पाहात असलेला राखाल हळूहळू ब्रजबाबू व रेणू यांच्या मूल्यांकडे ओढला जातो. ब्रजबाबूंच्या आजारात शारदेच्या सल्ल्याप्रमाणे तो विमलबाबूंची मदत घेतो, ती अगतिक होऊन मूल्यांच्या या झगड्यात तसूतसूने आत्मे जिंकले किंवा हरले जातात. कारण स्वतः शरदबाबू कोणत्याच मूल्याच्या मागे पूर्णतया उभे नाहीत. सवितेचे वात्सल्य, बुद्धिमत्ता, परोपकार व पश्चात्ताप यामुळे तिच्याकडे सहानुभूतीने व आदराने पाहणारा राखाल तिच्या जीवनदृष्टीला मात्र मान्यता देत नाही. या बाबतीत त्याचे वर्तन थेट श्रीकांतसारखे आहे. शारदेने वारंवार सवितेच्या माणुसकीचे गोडवे गायिले नसते व तिच्या पश्चात्तापाचे वर्णन त्याच्याकडे केले नसते तर त्याचा सवितेबद्दलचा प्रेमादर पुष्कळच कमी झाला असता आणि ब्रजबाबूंच्या प्राणरक्षणाचाच प्रश्न नसतो, तर विमलबाबूंनाही त्याने मदतीसाठी आवाहन केले नसते.

अर्थात केवळ काळे व पांढरे, चांगले आणि वाईट, स्वार्थ व त्याग असे हे साधे व सोपे द्वंद्व नाही. हा झगडा पुष्कळच गुंतागुंतीचा आहे. म्हणूनच या कादंबरीतील एकेक घटना, तीमधील पात्रांच्या आत्म्याचा एकेक पीळ गुंतवते वा सोडवते आणि झुंजणारी मूल्ये एकेका पिळाबरोबर पुढे-मागे होतात. तुल्यबल आत्म्यातील ही रस्सीखेच आहे. या रस्सीखेचीतला दोर अक्षरशः तसूतसूने इकडे वा तिकडे सरकतो. राखाल आपल्या सर्व चांगुलपणासह ब्रजबाबू रेणूच्या बाजूला उभा आहे. तसेच विमलबाबू आपल्या सर्व चांगुलपणासह सवितेच्या बाजूला उभे आहेत. म्हणूनच जीवनदृष्टीमधील हा झगडा फार वरच्या व सूक्ष्म पातळीवर चालतो. ब्रजबाबू व रेणू याजबद्दल

## त्यागमय, निवृत्तीपर मूल्ये व भोगमय, प्रवृत्तीपर मूल्ये यातील संघर्ष

विमलबाबूंच्या मनात स्नेह व आदराचीच भावना निर्विवादपणे आहे. त्यांना लागेल ते साहाय्य करण्याची विमलबाबूंची तयारी आहे; परंतु शरच्चंद्रांच्या कथाविश्वात अशा व्यक्ती वावरतात व असे प्रसंग निर्माण होतात की, तेथे शुद्ध, निर्मळ त्यागाला, सर्वस्वाच्या समर्पणाला, केवळ बावनकशी सोन्यालाच किंमत राहाते.

विमलबाबूंचा कस लावण्यासाठी एक छोटासा प्रसंग अतीव कुशलतेनं शरच्चंद्रांनी कादंबरीच्या उत्तरार्धात गोविला आहे. नुकतेच आजारातून उठलेले, शरीराने व मनानेही किंचित दुर्बल झालेले ब्रजबाबू विमलबाबूंपुढे असा प्रस्ताव मांडतात की, त्यांनी रेणूचे पाणिग्रहण करून ब्रजबाबूंना कन्येच्या विवाहाच्या चिंतेतून मुक्त करावे! पुरा एक दिवस यावर विचार करून विमलबाबूंनी यावर असे उत्तर दिलेले आहे की, रेणूला दत्तक घेण्याची त्यांची तयारी होती व त्यामुळे तिच्या विवाहाची जबाबदारी आपोआपच त्यांच्यावर पडली असती, ब्रजबाबू निश्चित झाले असते! अगतिक व विव्हल मनाने, शरीराच्या व मनाच्या दुर्बल अवस्थेत ब्रजबाबूंनी मांडलेला हा प्रस्ताव व विमलबाबूंनी तितक्याच गांभीर्याने व कळकळीने मांडलेला दुसरा प्रस्ताव, खोलवर विचार करता, बुद्धिबळातील शह देण्याच्या प्रकारासारखाच आहे! ब्रजबाबूंचा प्रस्ताव हे विमलबाबूंच्या चांगुलपणाला कळत नकळत दिले गेलेले आव्हान आहे. सवितेबद्दलची त्यांची भावना संपूर्णपणे नाकारणारा, ती संपूर्णपणे दुर्लक्षून / नष्ट करून टाकू पाहाणारा हा प्रस्ताव होता. रेणूला दत्तक घेण्याचा प्रस्ताव करून विमलबाबूंनी दिलेले उत्तर त्यांच्या औदार्याप्रमाणेच त्यांच्या बुद्धिचातुर्याचाही साक्ष देते. रेणूच्या पित्याची जागा त्यांनी स्वीकारल्याने सवितेबद्दल या त्यांच्या भावनेला बाध येत नव्हता. मात्र रेणूच्या काळजीतून ब्रजबाबू मुक्त होणार होते. विमलबाबूंचा हा प्रस्ताव व्यवहाराच्या दृष्टीने कितीही उदार असला तरी त्यामुळे ब्रजबाबूंना कमीपणाच येणार होता. या प्रस्तावाला ब्रजबाबूंकडून होकार मिळत नाही. रेणूकडून प्रतिसाद मिळण्याचा संभवच नसतो. सवितेबद्दल पूर्ण सहानुभूती ठेवून तिच्या मनाचा पीळ शरदबाबू पाहू शकतात, तसेच ब्रजबाबू, रेणू, राखाल यांच्या ध्येयवादी व निःस्वार्थ मनाचा पीळ दाखवून सवितेच्या मनाचे संकुचित स्वरूपही ते उघड करू शकतात. तथापि शेवटपर्यंत चाललेल्या सवितेच्या मातृहृदयाच्या आर्त आक्रंदनामुळे व दोन भिन्न जीवनदृष्टींमध्ये तिने खाल्लेल्या केविलवाण्या हेलकाव्यामुळे, तिला मिळणारी शिक्षा जणू पूर्ण झाली असे वाटून लेखकाने शेवटी म्हटले आहे : 'आयुष्याच्या प्रारंभकाळी एखादा बलवान, सहृदय पुरुष जर तिच्या जीवन–मार्गावर येऊन उभा ठाकला असता, तर आज तिच्या स्त्रीजीवनाच्या उज्ज्वल तेजाने समाज आणि संसार उजळून निघाले नसते काय? प्रसन्न देहाच्या, मनाच्या, हृदयाच्या अनुकूल परिस्थितीत ती आज लक्ष्मीसमान स्त्री. आदर्शभूत माता आणि ममता–माधुर्यमय महिला होऊन राहिली नसती काय?

तथापि अमुक झाले असते तर बरे झाले असते हे कळून आले तरी जीवनाची शोकांतिका त्यामुळे टळत नाही. दोन प्रकारच्या ध्येयवादात हेलखावे खात राहणे आणि स्वतःच्या स्खलनशीलतेचे स्पष्टीकरण मिळूनही पश्चात्तापात सतत होरपळत राहणे ही सवितेच्या जीवनाची शोकांतिका आहे. राखालच्या निर्भर्त्सनेकडे दुर्लक्ष करून माई हरिणपूरकडे निघतात; परंतु शारदेने आपला बेत बदलल्याचे पाहून त्यांच्या मनाचे चक्र फिरत राहते. तारकबरोबर त्या स्टेशनवर पोहोचतात त्या वेळी ते पश्चात्तापाकडे झुकलेले आहे, म्हणूनच विमलबाबूंचे 'नयी बहू' हे संबोधन त्यांच्या कानाला गोड लागत नाही. त्यांनी आपल्याला 'रेणूची आई' या नावाने हाक मारावी, असे त्या साश्रुनयनांनी सुचवितात. तथापि पुनः काही काळानंतर, विमलबाबू सिंगापूरहून परत आल्यावर आपले कृच्छ्रव्रत व आपले कधी न संपणारे दुःख फेकून देऊन त्या क्षणभर नवीन होऊन उभ्या राहिल्यासारख्या दिसतात व त्यांच्या मनोहर स्त्रीत्वाने विमलबाबू भारून जातात. पतीवर आपले प्रेम नव्हते व नाही असे त्या याच वेळी विमलबाबूंना सांगतात. तरीही त्यानंतरच्या दीड–दोन वर्षांत त्या विमलबाबूंच्या प्रेमाचा स्वीकार करू शकत नाहीत. आईच्या लाखाच्या इस्टेटीकडे पाठ फिरवून रेणूने पित्याबरोबर वनवास पत्करलेला असतो. उद्विग्न होऊन माई तीर्थयात्रेला निघतात. तिकडेच कुठे तरी एखादा प्रदेश आवडला तर तिकडेच वसती करून राहण्याचा त्यांचा विचार असतो. तथापि पश्चात्तापाने आणि कन्येच्या उपेक्षेने दीन झालेल्या माई पुन्हा विमलबाबूंचे सान्निध्य आणि सहानुभूती मिळताच वात्सल्याचेही बंधन तोडून सिंगापूरला जाऊन राहण्याचे ठरवितात. जेथे भूतकाळ त्यांचा पाठलाग करणार नाही अशा देशात त्यांना जावेसे वाटते आणि विमलबाबूंच्या प्रेमातच आसरा व मनःशांती मिळेल अशी त्यांना आशा वाटते. वृंदावनात ब्रजबाबूंना पाहूनही त्यांचे मन कठोरच राहते; परंतु रेणूच्या मृत्यूमुळे विमलबाबूंबरोबर त्यांचे जाणं होत नाही. विमलबाबू त्यांचा निरोप घेतात त्या वेळी मनाला अतीव वेदना होऊन त्या एखाद्या निराश्रित माणसाप्रमाणे म्हणतात, 'माझ्याबद्दल तुम्ही बिलकुल गैरसमज करून घेऊ नका. आयुष्यात वारंवार मिळालेला आसरा सुटावा असंच माझ्या नशिबात लिहिलं आहे, असं दिसतं!' आणि विमलबाबू निघून गेल्यावर स्फुंदत स्फुंदत त्या राखालला म्हणतात, 'राजू, माझ्या रेणूनं जेव्हा मला क्षमा केली नाही तेव्हाच मी पुरतेपणी समजले की, जगात कोणाकडूनही क्षमा मिळायची नाही!' या दोन्ही निवेदनात आत्मकरुणेची भावनाच दिसते.

अशी ही सवितेची कहाणी. कुलत्यागी सवितेविषयी अपार करुणा मनात ठेवून शरदबाबूंनी तिचे चित्रण अति कौशल्याने व हळुवारपणे केलेले आहे आणि विमलबाबूंच्या पत्राने या कथेचा शेवट केलेला आहे. सवितेचा तसाच विमलबाबूंचाही माणसांचा शोध आता संपलेला आहे. त्यांचे प्रेमनिधान त्यांना सापडलेले आहे. विमलबाबूंना 'घर' या भावनेचे प्रतीक सापडलेले आहे. माई मात्र प्रेम व कर्तव्य या दोन टोकात अजून हेलकावे खात राहतात. कारण प्रेम व कर्तव्य यांचे मीलन त्या साधू शकत नाहीत. विमलबाबूंपासून त्यांना मागे खेचून धरणारा एक बलवान धागा ब्रजबाबू अजूनही शिल्लक आहे व या धाग्यावर माईंच्या मनाचा फाटलेला पतंग हेलकावे खातो आहे. विमलबाबूंच्या हृदयात सुप्रतिष्ठित झालेली सवितेची मूर्ती त्यांना प्रत्यक्ष मिळत नाही. ब्रजबाबूंच्या मृत्यूपर्यंत बहुधा मिळूही शकणार नाही. तोपर्यंत सवितेच्या दुःखार्त पश्चात्तापाच्या धगीने तिचा सर्व जीवनरस, सर्व माधुर्य व सौंदर्य अधिकच होरपळून गेलेले असेल.

पश्चात्ताप, दुःख, संकटे यामुळे शेक्सपियरच्या किंग लियरचे जीवनाच्या शाळेतले त्याचे शिक्षण पूर्ण होते. तशीच ही सवितेची कथा आहे. विकाराच्या आधीन होऊन कुलत्याग केलेल्या सवितेला शेवटी रेणूला हरवून बसावे लागते. विमलबाबूंच्या निरपेक्ष प्रेमानेही तिच्या हृदयाचा दाह शांत झालेला नाही. कारण लियरला जीवनाचा अर्थ कळला तसा तिला तो कळलेला नाही. 'Thou art the thing itself' असे उद्गार एखाद्या वेडया भिकाऱ्याला पाहून काढण्याइतके ती आपले व्यक्तित्व विसरू शकत नाही. 'जीवनातला एक मोठा आसरा सुटला' असे म्हणून स्वतःविषयीच्याच करुणेने आक्रोश करण्याचा तिचा स्त्रीस्वभाव आहे. म्हणूनच सवितेविषयी अपार करुणा वाटूनही तिला आपल्या हृदयात वरचे स्थान मिळत नाही. बुद्धिमान व व्यक्तित्वसंपन्न असूनही त्यागाचे मोल न समजल्यामुळे ती लहान राहिलेली आहे. त्याग संपत्तीचा व इस्टेटीचा करून चालत नाही. स्वतःला जे प्रियतम असते त्याचा त्याग केल्याशिवाय माणसाच्या आत्म्याच्या समस्या सुटू शकत नाहीत. म्हणूनच सवितेने देऊ केलेल्या लाखाच्या इस्टेटीला रेणूच्या दृष्टीने काहीच किंमत नाही.


सविता ही 'शेषप्रश्न' मधील कमलप्रमाणे बंडखोर असली; आधुनिक होऊ पाहणारी असली, तरी ती कमलप्रमाणे निःसंग व स्वयंपूर्ण नाही. विमलबाबू कमलला अधिक जवळचे आहेत. 'श्रीकांत'मधील अभयेपेक्षा सवितेची समस्या अधिक आध्यात्मिक आहे. अभया ही परित्यक्ता असते व पतीच्या प्रेमासाठी, स्वकर्तव्यासाठी, पराकाष्ठेचा प्रयत्न केल्यानंतरच ती बंड करून रोहिणीबाबूंचा स्वीकार करते. या स्वीकारामुळे ती मलिन होत नाही. कारण तिच्या हृदयात माणुसकीच्या तेजाची, त्यागाच्या तेजाची आग धगधगत आहे, जिच्या बळावर ती प्लेगची भीती असतनाही श्रीकांतची शुश्रषा प्रेमाने करू शकते. अभया ही परित्यक्ता आहे व तिचे बंड समाजाच्या संकेतांविरुद्ध आहे. सवितेची तुलना 'गृहदाह' मधील अचलेशी अधिक योग्य प्रकारे होऊ शकेल; परंतु अचलेविषयी आपल्याला जितकी सहानुभूती वाटते तितकी सवितेविषयी वाटत नाही. पतीचे आपल्यावर प्रेम नाही असा गैरसमज, मृणालबद्दल संशय, सुरेशच्या दुर्दम्य प्रेमभावनेचे सतत होणारे दर्शन, महिमचा अबोल स्वभाव व औदार्य, सतीशची प्रेमळ परोपकारी वृत्ती, यामुळे अचलेकडून तात्पुरता गृहत्याग घडून येतो. अर्थात गृहत्याग करून ती आपल्या वडिलांकडे जाते, सुरेशकडे नव्हे. तिचे वयही लहान आहे. तिच्याकडून पुनः गृहत्याग घडतो तो सुरेशने फसवून नेल्यामुळे. त्यामुळेच 'गृहदाह'मधील अचला ही शरच्चंद्रांच्या इतर नायिकांच्या मालिकेतील पतिता समजावयास हरकत नाही.

'शेवटचा परिचय'मध्ये शरच्चंद्रांनी एका आधुनिक विषयाला हात घातलेला आहे; परंतु तो विषय आपल्या नेहमीच्या कथाविश्वात बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. जुन्या पद्धतीने झालेल्या विवाहात, व्यक्तिमत्त्वाच्या व मूल्यांच्या विजोडत्वामुळे पती वा पत्नी यांपैकी एकास दुसऱ्याबद्दल खरे प्रेम उत्पन्न न झाल्यास जो प्रच्छन्न धोका निर्माण होतो तो त्यांनी अधिक स्पष्ट करून दाखविलेला आहे. घटस्फोट वा विधवाविवाह ज्या समाजात रूढ नाही, तेथे काही माणसांची अशी कुचंबणा होते, हे त्यांना सुचवायचे आहे; परंतु घटस्फोट वा विधवाविवाह रूढ झाल्यास हा प्रश्न निकालात निघू शकेल असेही त्यांना वाटत नाही. उथळ समाजसुधारकांपेक्षा प्रेमभावनेशी त्यांचा परिचय अधिक सखोल आहे. केवळ विवाहपद्धतीत सुधारणा झाल्याने अशा समस्या सुटू शकत नाहीत, याची त्यांना जाणीव आहे, म्हणूनच ही समस्या सामाजिक समस्येच्या पातळीवर न ठेवता त्यांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ती आध्यात्मिक पातळीवर नेऊन ठेवलेली आहे व त्याबरोबर स्त्रियांवर नेहमीच होत राहिलेल्या अन्यायाला वाचा फोडलेली आहे.

( समाप्त )

---

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

मुलीच्या लग्नाचं आमंत्रण द्यायला ते जोडपं आलं होतं. त्यामुळं अगदी साहजिकच त्यांच्या वागण्या-बोलण्यात, विचारात, एकूण वातावरणातच आनंदीआनंद भरून राहिलेला होता. लग्नानंतर मुलगी कुठे राहील, काय करील असं बोलताना सहज तिच्या नोकरीचा विषय निघाला तेव्हा दोघंही एकमुखाने म्हणाली;

'लग्नानंतर तिनं नोकरी करावी की नाही हा त्यांचा प्रश्न ! ते म्हणाले तर ती करेलसुद्धा; पण तसे ते कर्तबगार आहेत. तिच्या पैशांसाठी त्यांचं काही ऽ अडायचं नाही. अर्थात नोकरीला विरोध करण्याइतके ते मागासलेलेही नाहीत. बघू या आता ते काय ठरवतात ते !' मला खूप कुतूहल वाटत होतं. हे इतक्या गौरवाने उल्लेखले जाणारे 'ते' म्हणजे काही दिवसांपूर्वीपर्यंत त्यांची ओळखही नसणारा कोणी तरी अज्ञात इसम ! पण किती अलगदपणे आपल्या मुलीचं पालकत्व त्यांनी त्याला बहाल केलं होतं ! लग्नानंतरचे तिचे सगळे विचार, कृती, निर्णय, योजना त्यांच्या सल्ल्याने (खरं तर आज्ञेने) होणार. ज्या मुलीला वीस-बावीस वर्षे घडवली, वाढवली, तिच्या कुवतीनुसार, तिला मिळालेल्या संधीनुसार तिच्या आयुष्याची भलीबुरी दिशा ठरवली त्या सगळ्याचा अखेर कशात होणार ? तर 'त्यांच्या' इच्छेत ! अर्थात हे पालक तसे परंपरानिष्ठच होते. ते धडधडीतपणे कुणा सोमणांकडे मुलगी 'द्यायलाच' निघाले होते त्यामुळे त्यांना दोष देण्यात काही फारसा अर्थ नव्हता; पण या निमित्तानं पुरुषाचं पालकत्व हा विषय पुन्हा एकदा माझ्या मनात घोळू लागला खरा !

आयुष्यात खूप वेगवेगळ्या नात्यांनी पुरुष स्त्रीला सामोरा येतो. मित्र, सहकारी, नवरा, वरिष्ठ, पुत्र, पिता, काका, मामा, भाऊ, दीर इत्यादी; पण या सर्व नात्यांचे नैमित्तिक पदर वेगवेगळे असले तरी एक सूत्र नेहमी समान आणि ठळक असते. ते म्हणजे पुरुषाच्या पालकत्वाचे. साधी शाळेची बरोबरीच्या मुलामुलींची ट्रिप गेली तरी मुली आगगाडीच्या डब्यात बसून राहातात, मुलं प्लॅटफॉर्मवरची पळापळ करतात. तेवढ्यापुरती ती त्यांची पालक झालेली असतात. घरामध्ये बरोबरीचा भाऊ एरवी इकडची काडी तिकडे करीत नसला तरी अंधार पडला की, पोचवायला, आणायला, सोबतीला वगैरे हमखास घराबाहेर पडणारच. कारण अंधारानं ते तात्पुरतं पालकत्व त्याला बहाल केलेलं असणार ! आणि ऑफिसमध्ये स्त्री सहकारी कितीही तुल्यबल असली तरी, स्पर्धेत उतरण्याजोगी असली तरी बरोबरचे पुरुष उघड, छुपेपणाने काय म्हणणार ?' ' बाई आहे, करत्येय धडपड तर करू दे ! ' जणू काही यांनी ' करू नका ' म्हटलं असतं तर ती थांबलीच असती ! तीच कर्तबगार स्त्री पत्नीच्या भूमिकेत गेली की, केवळ दैववशात तिचा पती झालेला कोणी तरी क्ष इसम ' मी तिच्या गुणांना असा असा वाव दिला ' असं श्रेय तरी घेणार किंवा इतकी बुद्धिमान स्त्री आपली पत्नी, अंकित दासी असल्याचा सूक्ष्म अहंकार तरी बाळगणार !

या सर्व नात्यांमध्ये संबंधित पुरुषांनी स्त्रीसाठी काहीच केलेलं नाही किंवा त्यांचं काहीच श्रेय नाही असं मला म्हणायचं नाही. मानवी नाती कधीच एकतर्फी नसतात. किमान देवाणघेवाण झाल्याशिवाय कुठलंच नातं उभं राहात नाही; पण कुठल्याही वयाच्या, कुवतीच्या, नात्याच्या स्त्रीचं पालकत्व कुठल्याही पुरुषाला आपोआप मिळावं आणि तेही केवळ दैवदत्त पौरुषाच्या बळावर हे मला मनापासून खटकतं. शिवाय हे पालकत्वही कसं ? तर ऐच्छिक. मुलांच्या बाबतीत आईचं जे पालकत्व असतं ते किती बांधून ठेवणारं, देह-मन झिजवणारं, स्वार्थापलीकडचं असतं ते सगळ्यांना माहीत आहे, या पालकत्वाची फार मोठी किंमत स्त्री क्षणोक्षणी देत असते आणि मुख्य म्हणजे आवडो-नावडो, जमो न जमो, सुखाचं होवो वा जाचक होवो, या पालकत्वातून तिची कधीही सुटका नसते. त्यात कुठल्याही कारणानं काहीही कमतरता राहिली तरी कुटुंब, समाज तिलाच दोषी ठरवणार. स्त्रीचं पालकत्व हे असं इच्छेच्या, पर्यायाच्या पलीकडचं असतं. पुरुषाचं पालकत्व मात्र मोठं चलाख ! आणि स्त्रीशिक्षणानं, स्त्रीजीवनाच्या रुंदावलेल्या कक्षांनी त्याची मोठी सोय करून ठेवलेली आहे. कामाच्या, जबाबदारीच्या, स्वार्थाच्या वेळी ती त्याच्या बरोबरीची ! एरवी मात्र तो तिचा पालकच !

बालपणी पित्यानं, तरुणपणी पतीनं आणि वृद्धत्वात पुत्रानं स्त्रीचं रक्षण करावं असं आपण परंपरेतून शिकलो. परंपरेतल्या इतर अनेक गोष्टी कालाच्या ओघात बदलल्या, मोडीत गेल्या. पुरुषाचं पालकत्व मात्र दशांगुळे उरलं. इतकंच नव्हे तर कौटुंबिक नात्यापलीकडेही जिथे जिथे स्त्री पोचली तिथे तिथे पुरुषाचं पालकत्व पोचलं. कारण मुळात ती इतक्या विभिन्न क्षेत्रांमध्ये इतक्या दूरपर्यंत पोचली तरी कोणामुळे ? तर त्या पुरुषोत्तमामुळेच ! मुळामध्ये पालकत्वाची भावना कोणाही माणसाला मोहवणारी आहेच. कारण त्याच्यात मालकीची कल्पना आहे. निर्जीव वस्तूंवरचा मालकी हक्कसुद्धा माणसाला सुखवतो तर सजीव माणसावरची मालकी सुखावह होणारच ! प्रश्न फक्त इतकाच आहे की, या मालकीहक्कामुळे त्या माणसाच्या घडण्याच्या, वाढण्याच्या, विचाराच्या, विकाराच्या शक्यता डावलल्या जात असतील का ? स्त्रियांच्या बाबतीत पुरुषांनी दाखवलेल्या पालकत्वात मालकी हक्कात हे सगळे धोके मला दिसतात. म्हणून त्याचा खोलवर विचार होण्याची जरूर वाटते.

आज व्यवहारात सर्वत्र स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कामं करताना दिसतात. स्त्रीत्वासाठी उघडपणे स्त्रीला कुठे मागे ढकळलं जात नाही. तरीही पुरुषी मनोवृत्तीत मात्र आजही स्त्रीला समान स्थान दिलं जात नाही. व्यवसायातल्या उच्चपदस्थ अशा कित्येक स्त्रियांचे अनुभव असं सांगतात की, कोणत्या ना कोणत्या मुद्द्यावर, कुठे ना कुठे, स्त्रीला एखादी तरी पायरी खाली ठेवण्याचा पुरुषाचा आटोकाट प्रयत्न चालतो. त्या पायरीपर्यंत औदार्याचे, मित्रत्वाचे, सहकार्याचे अनेक हात अहमहमिकेने तिच्यापुढे येतात. मग मात्र तिची शारीरिक दुर्बलता, कुटुंबाची बांधिलकी, वेळ-अवेळीचं बंधन अशा अनेक खऱ्याखोट्या अडचणींचा बागुलबोवा उभारून ती शेवटची पायरी तिला नाकारली जाते. तरीही जिद्दीनं तिनं ती गाठलीच तर अधिकाऱ्याच्या मनातला पुरुषी अहंकार डिवचला जातो आणि त्याची किंमत तो कुठे ना कुठे निष्ठुरपणे वसूल करतो. हा धोका येऊच नये म्हणून कित्येकदा स्त्रियांना दुय्यम महत्त्वाची कामंच दिली जातात. अखेरचा शब्द, निर्णय एखादी सही, संमती यासाठी निष्कारण त्यांची अडवणूक केली जाते किंवा अगदी टोकाला जाऊन, त्यांचं चारित्र्यहनन करून त्यांच्या कर्तबगारीचा सूडही घेतला जातो. पालकत्व नाकारण्याची ही किंमत असते.

कुटुंबापुरतं बोलायचं तर ज्या काळात पती पत्नीपेक्षा वयानं, ज्ञानानं मोठा असायचा, एकटाच कमावता असायचा त्या काळातलं त्याचं पालकत्व आजच्या स्त्रीला भोगावं लागू नये हे कोणालाही पटेल; पण सत्यात तसं होताना फारसं दिसत नाही. यात काही वाटा स्त्रीच्या मनोवृत्तीचा, जडणघडणीचाही असतो हे मान्य करायलाच हवं. प्रेम व समर्पण इत्यादी पुस्तकी कल्पनांच्या पहिल्या भरामध्ये पुष्कळदा स्त्री पतीचं पालकत्व स्वीकारत असते. काहींना तर त्यातून आनंदही मिळत असण्याची शक्यता आहे; पण हा आनंद फार काळ टिकत नाही. ती स्त्री जर चांगल्या अर्थानं ' वाढणारी ' असेल तर लवकरच या पालकत्वाचे कंगोरे तिला टोचायला लागतात. तीही बापडी सर्वज्ञ नसतेच; पण चुका करण्याचं, प्रयोग करण्याचं, चाचपडत का होईना पण आपली वाट आपण शोधण्याचं स्वातंत्र्य तिला हवं असतं. जोवर ती नवऱ्याला देव मानत होती तोवर ती एका अर्थानं सुखी होती. आता त्याचं माणूसपण स्वीकारल्यावर आपल्या जीवनाची सर्व सूत्रं सदासर्वदा त्याच्या हाती देणं तिला कसं आवडेल ? दिवस झपाट्यानं बदलताहेत, लहानलहान मुलंसुद्धा पालकत्वाचं जू फार काळ स्वीकारेनाशी झालीयेत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या, स्वायत्ततेच्या, स्वयंनिर्णयाच्या कल्पना बळावत आहेत. अशा स्थितीत खाजगीत किंवा मुलाबाळांसमोर पतीचं पालकत्व स्त्रीला खूपच क्लेशकारक वाटतं. कुटुंबावरची सुटत चाललेली पकड, व्यावसायिक स्पर्धेचा ताण, वैयक्तिक यशापयश या सगळ्यांचं उट्टं काढण्याचं हक्काचं ठिकाण म्हणून पती तिच्याकडे बघतो; पण मला तरी पुष्कळदा वाटतं की कौटुंबिक नातेश्रेणीचं मूळ बहुतांशी पुरुषाच्या पालक-

त्वात आहे. तो तिचा पालक होतो, त्याची भरपाई ती मुलांवर पालकत्व गाजवून करते तर याच क्रमाने पुढं मुलं पाळीव प्राण्यांवर किंवा खेळण्यांवर सत्ता गाजवून आपली पालकत्वाची हौस भागवतात. एक दुष्टचक्रच जणू काही सुरू होतं.

त्यातच तो कुटुंबप्रमुख स्वतः नामवंत असला तर बघायलाच नको! वास्तविक एखाद्या क्षेत्रातली त्याची कर्तबगारी हा काही सर्व जीवनातल्या तिच्यावरच्या पालकत्वाचा परवाना नव्हे; पण थोरामोठ्यांच्या बायकांच्या निवेदनातून हमखास असं चित्र दिसतं. अलीकडे कल्पनारम्य ललितसाहित्याकडून आत्मचरित्रात्मक लेखनाकडे जसजसा वाचकांचा कल होऊ लागला आहे तसतशी मोठ्या नटांच्या, लेखकांच्या, कलावंतांच्या, चित्रकारांच्या वगैरे बायकांची आत्मनिवेदनं छापण्याला भरतीच आली आहे. त्या सगळ्या लेखनामधलं पुरुषाचं पालकत्व आणि स्त्रियांची पतिशरणता मला खूप अस्वस्थ करते. दिवाळी अंकामधल्या एका अशाच आत्मपर लेखमालेबद्दल मैत्रिणीशी बोलत होते तेव्हा मी म्हटलं,

'मी हे करणं 'त्यांना' आवडलं नाही, मला तमुकची परवानगी 'त्यांनी' दिली नाही हे या बायका इतक्या फुशारकीनं कसं लिहू शकतात?'

मैत्रीण सूचक हसली. म्हणाली, 'बरोबर आहे! लेखकांच्या बायकांपेक्षा लेखिकांच्या नवऱ्यांची एखादी लेखमाला असावी असंच तुला वाटणार!'

मला मनापासून वाईट वाटलं. या मैत्रिणीला मी बऱ्यापैकी समंजस समजत होते. तिलाही या सगळ्यात 'एकास एक' असाच काही तरी वास यावा ना? कळवळून म्हटलं—

'बाई ग, असल्या शाळकरी देवघेवीत आता आपल्याला कोणालाच रस नाही. खरं म्हणजे वयाच्या, समजुतीच्या ठराविक टप्प्यानंतर, स्त्रीनं काय आणि पुरुषानं काय, कोणीच कोणाचं पालकत्व पत्करू नये. प्रौढ, समंजस, जबाबदार व्यक्ती म्हणून प्रत्येकानं स्वतः जगावं आणि दुसऱ्याला जगू द्यावं एवढीच आमची माफक अपेक्षा आहे!'

पण ही अपेक्षाच फार तर होत नसेल? □

## पुस्तके

# समाजातून उठविणाऱ्या एका भीषण रोगावरील माहितीपूर्ण कादंबरी 'तपस्या'

वि. शं. पारगावकर

**डॉ.** सुमती क्षेत्रमाडे यांनी नुकतीच 'तपस्या' नावाची कादंबरी लिहिली. ती पुण्याचे कॉन्टिनेंटल प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केलेली आहे. डॉ. सुमती क्षेत्रमाडे या मराठी वाचकाला नवीन लेखिका नाहीत. तसेच कॉन्टिनेंटल प्रकाशन या संस्थेबद्दलही म्हणता येईल.

५०६ पृष्ठांच्या या महत्त्वपूर्ण पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात दि. २५ मार्च रोजी सकाळी दहा वाजता झाला. अमरावतीच्या तपोवनाचे संचालक डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी या पुस्तकाचे अधिकृत प्रकाशन झाल्याचे त्या वेळी घोषित केले.

या कादंबरीच्या जन्माची कथा डॉ. क्षेत्रमाडे यांनी या प्रसंगी सांगितली. तपस्या म्हणजे अक्षरशः बारा वर्षांची तपस्या ही कादंबरी घडविताना त्यांना करावी लागलेली होती. कारण या कादंबरीचा विषय तसा साधा आणि सोपा नाही. तसे पाहिले तर कुठल्याच ललितकलाकृतीचा विषय सोपा नसतो. कलानिर्मितीची क्रिया ही कुठल्याच अर्थाने सोपी क्रिया नसतेच.

त्यातही या कादंबरीचा मध्यवर्ती विषय आहे. 'महारोग आणि महारोगियांचे जीवन.' त्यामुळे लेखिकेला ही कादंबरी लिहिताना तिच्यामधील जीवनाचा शोध तीन पातळ्यांवरून घ्यावा लागलेला आहे. एक तिच्यामध्ये चित्रिलेले वैय्यक्तिक जीवन, दुसरे सामाजिक जीवन आणि तिसरी पातळी आहे. कलेची प्रतिज्ञा सांभाळण्याची. या तिन्हीही पातळ्या आपापल्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. कादंबरीत त्या जेवढ्या महत्त्वाच्या आहेत तितकीच महत्त्वाची गोष्ट कादंबरीमध्ये या तीन पातळ्यांचा तोल एकमेकांशी सांभाळण्याचे कामही महत्त्वाचे आहे.

महारोग ही जेवढी सामाजिक समस्या आहे तेवढीच ती व्यक्तीच्या जीवनातीलही एक महत्त्वपूर्ण वैयक्तिक समस्याही होऊन बसलेली आहे. आज जगात जेवढे म्हणून रोग अस्तित्वात आहेत त्यांपेक्षा या रोगाची रोग म्हणून भयानकता कमी असली, त्यापासून आज जीवनाला जरी धोका उरलेला नसला तरी या रोगाचे सामाजिक दुष्परिणाम प्रत्यक्ष रोगाहूनही भयानक आहेत, हीच या रोगाची खरी भयानकता आहे आणि या रोगाची शिकार झालेल्यांच्या जीवनाची शोकांतिका आहे!

आज कुठल्याही रोगासाठी, सेवा घेण्यासाठी दवाखाने आहेत; परंतु वसाहती मात्र फक्त या महारोग्यांच्यासाठीच आहेत. एक तर तो बरा होऊनही या वसाहतीच्याबाहेर जाऊ शकत नाही. तेथेच तो चांगल्या अथवा वाईट तऱ्हेने आपले जीवन संपवितो किंवा तो रस्त्यावर येतो आणि अक्षरशः लाचारीचे, भिकाऱ्याचे जीवन जगतो!

आजच्या विसाव्या शतकात हा रोग असाध्य राहिलेला नाही. त्याची जात कोणतीही असो, तो संसर्गजन्य असो अथवा असंसर्गजन्य असो तो कालांतराने संपूर्ण बरा होऊ शकतो. इतकेच नव्हे तर तो इतर काही रोगांप्रमाणे आनुवंशिकही नाही हेही सिद्ध झालेले आहे; परंतु असे असले तरी महारोग म्हटले की व्यक्तीच्या, तसेच समाजाच्या जीवनाला जो एक जबरदस्त धक्का बसतो त्या धक्क्यामधून व्यक्ती किंवा समाज सावरू शकत नाही ही गोष्ट मात्र खरी आहे.

या रोगाचे वैय्यक्तिक आणि सामाजिक रूप व परिणाम हे असे आहेत. या रूपाचा आणि त्याच्या परिणामांचा अधिक खोलात जाऊन आज विचार होणे आवश्यक आहे आणि मला वाटते हे काम सामाजिक कार्यकर्त्यांचे, डॉक्टरांचे आणि शास्त्रज्ञांचे आहे. तपोवनाचे डॉ. शिवाजीराव पटवर्धन आणि

आनंदवनचे बाबा आमटे हे काम अत्यंत निष्ठेने, कमालीच्या तीव्र सामाजिक जाणिवेने, डोळस उपचारपद्धतीने आणि माणूस या प्राण्याविषयी असणाऱ्या अपार सहानुभूतीने करीत आहेत; परंतु एवढे असूनही असे म्हणावेसे वाटते की, त्यांना प्रत्येकी दोन दोनच हात आहेत. हे काम अनंत हस्तांनी झाले पाहिजे आणि ते मानवी जीवनाविषयी अपार सहानुभूती असणाऱ्या सर्व लोकांकडून झाले पाहिजे.

डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांची 'तपस्या' ही कादंबरी जेव्हा माझ्या हाती आली, तेव्हा ते एवढे मोठे पुस्तक पाहून प्रथम मी हरखून गेलो. आजकाल सामाजिक विषयावर अशा दीर्घ कादंबऱ्या फार थोड्या लिहिल्या जातात राजकीय, ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांवर प्रचंड पृष्ठसंख्येने लिहिण्याची प्रथा आपल्याकडे पडत चाललेली आहे. स्वत: कै. वि. स. खांडेकर यांच्या सामाजिक कादंबऱ्यांची पृष्ठसंख्या आणि त्यांच्या 'ययाती'ची पृष्ठसंख्या याची या संदर्भात तुलना करता येण्यासारखी आहे. अर्थात एखाद्या कादंबरीची पृष्ठसंख्या किती असावी यावर तसे बंधन असण्याचे काही कारण नाही तिच्यामधून व्यक्त झालेल्या विषयानुसार ही पृष्ठसंख्या कमी-जास्त असणार; परंतु ज्या वेळी मी कादंबरीमधील 'विषय' असा उल्लेख करतो तेथूनच वादविवादाला सुरुवात होते !

कोणत्याही ललितकृतीला अथवा कलेला विषय हा असतोच. जसा विषय असावा लागतो तसाच तिच्या पाठीमागे एक हेतूही असावा लागतो आणि हा 'विषय' आणि 'हेतू' हे दोन शब्दच विशेषतः ललितकलेमध्ये अनंत घोटाळे निर्माण करून ठेवीत असतात ! आजपर्यंत त्यांनी ते करून ठेवलेले आहेत आणि पुढेही ते करीत राहणारच आहेत ! हे घोटाळे फक्त ललितकलेच्या बाबतीतच प्रामुख्याने होतात. इतर कलांमध्ये अशा घोटाळ्यांना वावच नसतो. उदाहरणार्थ नृत्यकला; संगीतकला, शिल्पकला, चित्रकला इत्यादी. याचे कारण तसे अगदी स्पष्ट आहे. ललितकलेचे माध्यम शब्द हे असते, तसे इतर कलांचे नसते. संगीतकलेमध्ये जरी काही वेळा शब्द येत असले तरी संगीतकलेचा जो आत्मा 'स्वर' अथवा 'राग' यावर शब्द आपला प्रभाव गाजवू शकत नाहीत. याउलट ललितकलेमध्ये आपण जे शब्द वापरतो ते शब्द सामाजिक व्यवहाराप्रमाणेच जीवनातील इतर अनेक व्यवहारांचे वाहक असतात. ते पूर्वीपासूनच अर्थपुष्ट असतात. अनेक शब्द तर अनेकार्थांनी पुष्ट असतात म्हणून ललितकलेच्या बाबतीत हे शब्द खुद्द कलावंताची आणि अगदी रसिक वाचकांची (किंवा आस्वादकांची म्हणा) सतत दिशाभूल करीत असतात.

स्वत: डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांनी आपल्या पार्श्वभूमीत एक परिच्छेद लिहिला आहे. (पान ८) त्यामध्ये त्या म्हणतात...'एकाच दगडात दोन पक्षी (कुष्ठरोग आणि अस्पृश्यता) टिपण्याचा अल्प प्रयत्न करावयाचा होता. दोन हेतू कथानकाच्या सूत्रात अलगद गुंफायचे होते. ललितकृतीची कुठेही रसहानी होऊ न देता– त्यातल्या लालित्याला– कादंबरीच्या गाभ्याला-यत्किंचितही धक्का न लावता.'

## तीन घटक

यावरून असे दिसते की, सुमती क्षेत्रमाडे यांना मी वर म्हटले आहे त्या तीनही गोष्टींची कादंबरी लिहिण्यापूर्वी जाणीव होती. कलाकृतीचा विषय, कलाकृतिपाठीमागचा हेतू आणि कलाकृतीच्या रूपाविषयीची जाणीव. कोणत्याही ललितकलाकृतीच्या निर्मितीसाठी या तिन्ही घटकांची अत्यंत आवश्यकता आहे; परंतु कलावंताला या गोष्टींची केवळ जाणीव असणे पुरेसे नसते. कलाकृतीची निर्मिती होत असताना या तिन्ही घटकांचा आपला तोल सांभाळला जाणे ही गोष्ट फार महत्त्वाची असते. मनुष्याजवळ (कलावंताजवळ) राजकीय, सामाजिक, वैज्ञानिक, वैद्यकीय; नैतिक, आध्यात्मिक आणि कलात्मक जाणिवांचा जो अनुभव साठलेला अथवा त्याने साठविलेला असतो त्या अनुभवाचा एखाद्या कलाकृतीच्या निर्मितीच्या बाबतीत योग्य उपयोग करून घेणे ही गोष्ट फार महत्त्वाची असते. ही देखील एक तपस्याच असते. आपल्या संग्रही असलेल्या रंगांचे योग्य मिश्रण त्याच्या चित्रकृतीत झाले नाही तर त्या चित्रकृतीचा जसा तोल बिघडतो तसेच तिचे सौंदर्य देखील बिघडते. ललितकृतीत रंगाची जागा मी वर म्हटले त्या निरनिराळ्या अनुभवांनी घेतलेली असते. राजकीय, सामाजिक, वैद्यकीय वगैरे. तेव्हा या ज्ञानाचा अथवा अनुभवांचा वापर आपण कल्पिलेल्या कलाकृतीमध्ये कसा आणि किती करावा याचे भान कोणत्याही कलावंताच्या मनात नेहमीच असले पाहिजे. अन्यथा कलाकृतीचा तोल बिघडण्याचा आणि सौंदर्यहानी होण्याचा धोका समोर उभा असतोच.

मी वर ज्या 'शब्द' या संकल्पनेचा उल्लेख केला तो यासाठीच. शब्द हे निरनिराळ्या विचारांचे स्पष्टीकरण करण्याचे माध्यम आहे. भावाभिव्यक्ती करण्यापासून ते एखादे शास्त्रीय प्रमेय सोडविण्याचे कार्य या शब्दांद्वारेच होत असते. शब्द विधाने करतात, शब्द निष्कर्ष काढतात, शब्द प्रमेये मांडतात आणि शब्द एखाद्याचे भावजीवनही उभे करतात. अर्थपुष्ट शब्दच भाषा निर्माण करतात आणि ही भाषा निरनिराळ्या प्रकारची असू शकते, तसेच भाषेप्रमाणेच शब्दही निरनिराळ्या प्रकारचे असू शकतात. वैज्ञानिक भाषा, शास्त्रीय भाषा, आध्यात्मिक भाषा, तशीच ललित भाषाही. एखादी काव्यनिर्मिती करताना शास्त्रीय भाषा वापरता येत नाही. तसेच एखाद्या शास्त्रीय विषयावरील ग्रंथ लिहिताना ललित भाषा वापरून चालत नाही. या जशा भाषेच्या मर्यादा आहेत तसेच तो एक भाषेचा स्वभावही आहे असे म्हणता येईल.

यावरून निष्कर्ष असा निघतो की, कोणत्याही ललित–लेखकाला आपल्या ललितकृतीसाठी ललित–भाषाच वापरावी लागते. ते त्याच्यावर बंधन असते. कारण ललितकृती ही एखाद्या जीवनावरचे भाष्य नसते तर ती जीवनदर्शन घडवीत असते.

तेव्हा 'तपस्या' या कादंबरीत वरील सर्व नियम पाळून लेखिकेने जीवनदर्शन घडविले आहे काय ? हा पहिला प्रश्न उभा राहतो. त्याचे उत्तर असे की, असे जीवनदर्शन घडविण्याचा या कादंबरीत बऱ्याच अंशी प्रयत्न झालेला आहे. कोणत्याही ललितकृतीतून व्यक्त झालेले जीवन हे प्रामुख्याने व्यक्तीचे भावजीवन असते. तेथे विचारदर्शनापेक्षा भावदर्शनाला महत्त्व असते. जीवनाविषयीचा एखादा सिद्धांत

सांगणे, एखादे उपदेशपर अवतरण देणे, एखाद्या गोष्टीच्या प्रचाराचा आविष्कार करणे या गोष्टी ललितकृतीला वर्ज आहेत. त्यामुळे कलाकृतीमध्ये ज्या भावाकृती निर्माण होत असतात त्यामध्ये अडथळे निर्माण होतात आणि कलाहानी होते, सौंदर्यहानी होते. अशी हानी निर्माण करणारे प्रसंग या कादंबरीत बरेच आहेत.

तसेच कादंबरी ही एक ललितकलाकृती असते. तिच्यामध्ये जीवन आणि जीवना-पाठिमागचा हेतू हे तर असावेच लागते; परंतु त्याचबरोबर ती एक साधी गोष्ट असून चालत नाही. अनेक प्रसंगांची साखळी गुंफून त्यामधून एक सलग गोष्ट तयार करणे ही एक साधी घटना झाली. कलात्मक ललितकृतींमध्ये असे कधीही घडत नसते. कोणत्याही मोठ्या कलावंताच्या मनात आपल्या हातून घडणाऱ्या कलाकृतीविषयी इतक्या साध्या आणि प्राथमिक गोष्टी नसतात. जगातील थोर ललितकृतींचा अभ्यास केल्यास असेच दिसून येईल की, केवळ प्रसंग जुळवून त्यांनी एखादी गोष्ट तयार केलेली नसते! तर त्याने आपल्या कलाकृतीसाठी जो विषय निवडलेला असतो त्या विषया-संबंधी सर्व पातळ्यांवरून त्याने अगदी खोलवर जाऊन विचार केलेला असतो!

एखाद्या जीवनानुभवाची कलात्मक अनुभूती घडविणे हे कलावंताचे प्रमुख कार्य असते. अर्थात कलाकृतीमध्ये हे जे जीवन-दर्शन असते तेदेखील अनेक अर्थांनी संपन्न असावे लागते आणि तितकेच ते भेदकही असावे लागते. काही नवीन पाहिले, नवीन अनुभवले, त्यामुळे वाचकाच्या जीवनात भावसंपन्नता निर्माण झाली. नवीन साक्षात्काराची अनुभूती घडली. जीवनाकडे पाहण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनाला धक्का बसला, मन अंतर्मुख झाले, वृत्ती थरारून गेल्या आणि भावजीवनात प्रचंड उलथा-पालथ घडून आली आणि अशा सर्व अवस्थांचा मनावर पगडा बसायला हवा.

## भेदक विषय आणि प्रवाही निवेदन

'तपस्या' या एवढ्या मोठ्या प्रचंड पृष्ठसंख्येच्या कादंबरीत या साऱ्यांचा प्रत्यय येत नाही! तसे पाहिले तर या कादंबरीचा विषय अतिशय भेदक आहे. तसेच या भयंकर रोगाला बळी पडलेल्या व्यक्तींच्या जीवनांची असहाय्यता मन व्याकूळ करणारी आहे. तसेच जाता जाता या कादंबरीच्या प्रकाशन-समारंभात काही उल्लेख झाले त्यांचाही परामर्ष घेणे आवश्यक वाटते. 'महारोग या विषयावर आजवर मराठीत कादंबरीलेखनच झाले नाही आणि जगात या विषयावर केवळ एकदोनच कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत' असा तेथे उल्लेख झाला तो अचूक नाही. मराठीमध्ये श्री. उद्धव शेळके यांनी या विषयावर दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांपैकी एकीला तर महाराष्ट्राचे प्रथम दर्जाच्या साहित्य-लेखनाचे पहिले पारितोषिक मिळालेले आहे. त्या कादंबऱ्यांपैकी पहिलीचे नाव आहे 'धग' आणि दुसरीचे 'अगतिका.' त्यांपैकी 'अगतिके'चा विषय तर संपूर्ण महारोग्यांच्या जीवनावरच आहे. 'धग' मध्ये या भयंकर रोगाच्या चाहुलीचे फार प्रत्ययकारी दर्शन घडते हेही येथे नमूद केले पाहिजे.

जे दर्शन 'अगतिके' मध्ये घडते तसे ते 'तपस्या' या कादंबरीत घडत नाही असे खेदाने म्हणावे लागते.

याचे कारण काय असावे?

याचे कारण माझ्या दृष्टीने असे आहे की, 'तपस्या' या कादंबरीचा सारा प्रवास वरून घडल्यासारखा दिसतो. जीवनाचे अनेक स्तर आणि त्यांची खोलवर गेलेली पाळेमुळे यांचे एकसंध दर्शन ही कादंबरी घडवू शकत नाही. अगदी समाजदर्शन आणि समाजसेवा या दृष्टीने कादंबरीच्या सुरवातीसच कांचनचा झालेला प्रवास हा केवळ गुळगुळीत आणि छानछोकीचा वाटतो. या मुलीच्या आयुष्यात काही तरी विलक्षण घडणार आहे आणि ते तिची प्रकृती आणि मनोवृत्तीच घडवून आणणार आहे. अशा रीतीच्या तिच्या स्वभावाच्या घडणीचे प्रथमदर्शन घडत नाही. त्यामुळे तो प्रथमपासूनच एक निर्जीवता घेऊन येते आणि शिवाय एका आय. ए. एस. तरुणाशी लग्न करून तिला निर्वेध आयुष्यही जगावयाचे असते!

स्वभावचित्रण घडविण्यासाठी जे शब्द आणि प्रसंग येतात त्यांची ताकद निवेदनाच्या पलीकडे जात नाही. सर्व कादंबरीभर भगीरथच्या केवळ हालचाली दिसतात. त्यामधून एखादे शब्दचित्र अथवा कादंबरीला आवश्यक असे स्वभावचित्र उभे राहात नाही. उष्णतेमुळे, पडशामुळे अथवा थंडीमुळे माणसाचा घसा जरी दुखू लागला तरी 'आपल्याला कॅन्सर तर झाला नसेल ना?' अशी शंका त्याला व्याकुळ करते. तो संशयात्मा बनतो आणि नाना विचारांच्या जाळ्यात अडकून पडतो. इथे कांचनला महारोगासारख्या व्याधीने ग्रासले आहे. शिवाय ती एक सुविद्य आणि सेन्सेटिव्ह मुलगी आहे. अशा अवस्थेत तिच्या मनाचे जे चित्रण व्हायला हवे होते तेवढ्या प्रकर्षाने या चित्रणात भावगर्भता आलेली नाही. ती तिचे घर आणि समाज यामध्ये या विषयाच्या अनुषंगाने जे ताण निर्माण व्हावयास हवे होते ते झालेले दिसत नाहीत.

तसेच आश्रमाचे दृश्य आणि आश्रमाचे चित्रण हे गाडीतून जाताना खिडकीवाटे एखादा प्रदेश पहावा इतके ओझरते वाटते. हा आश्रम हे एक स्वतंत्र जगच आहे. ज्या रोगामुळे या जगाची निर्मिती झाली तो रोग या जगाचा स्थायीभाव आहे. बाहेरच्या जगाशी या जगाचे काही ताण निर्माण झालेले आहेत. जे ताण या आतल्या जगावर तसेच बाहेरच्या जगावरही विलक्षण ताण निर्माण करतात. त्या ताणांचे स्वरूप अत्यंत भेदक असायला हवे; पण अशा रीतीचे ताण या कादंबरीत निर्माणच होत नाहीत!

दैव आणि मानवी जीवन या झगड्याला इथे फार मोठा वाव होता. नुसत्या पॉझिटिव्ह-नेगेटिव्हची चर्चा करून या रोगाने ग्रासलेल्या जीवनाची भेदकता, दुःखे निवारण होऊ शकत नाहीत.

उद्धव शेळके यांच्या 'अगतिका' या कादंबरीतील एक प्रसंग येथे आठवतो. महारोगाने ग्रस्त झालेला एक रोगी दवाखान्यात एका कॉटवर झोपलेला असतो. रात्रीच्या झोपेतच त्याचा एक डोळा उंदराने काढून नेलेला असतो. ही बधिरता, हे जीवनाचे निर्जीवपण, ही अगतिकता आणि हे नियतीने त्याच्यावर लादलेल्या दुःखाचे ओझे किती विलक्षण आहे! असा एखादाच प्रसंग त्या प्रसंगातली भावगर्भता आणि या प्रसंगाचे भावचित्रण केवढा परिणाम साधून जातो!

मानवी जीवनाच्या अशा भेदक प्रसंगांचे दर्शन 'तपस्या' या कादंबरीत कोठे घडत

नसले तरी ज्या जीवनाचा विषय घेऊन ही कादंबरी येते त्या विषयाचा परिणाम साधल्याशिवाय ती राहात नाही. या कादंबरीतील लेखिकेचे साधे, स्वच्छ आणि प्रवाही निवेदनही लक्ष वेधल्याशिवाय राहात नाही. तपोवनातले जे जीवन आहे त्याचे वर्णन एखाद्या महावृक्षाच्या सावलीसारखे न घडता ते प्रखर उन्हासारखे घडविले गेले असते तर परिणामाच्या दृष्टीने ते इष्ट झाले असते. तसेच ज्या एका भेदक विषयाची त्यांनी एक कथा बनविली आहे तो मोह त्यांनी टाळावयास हवा होता. त्यामुळे या साऱ्या चित्रणावर कथात्मकतेची बंधने फार पडलेली दिसतात आणि मूळ विषय क्षीण झाल्यासारखा वाटतो.

डॉक्टरलोक रोग्याला शर्करावगुंठित कडू औषधाच्या गोळ्या देतात आणि त्याच्या आजारावर उपाय करतात, तसेच डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांचे या कादंबरीच्या बाबतीत झाले आहे. या कादंबरीमधील निवेदन, त्या निवेदनाची विशिष्ट रचना, त्यामधून निर्माण झालेला घाट या सर्वांचे यश येथे जाणवते, कथानकाच्या स्थिर, स्वच्छ आणि संयमपूर्ण निवेदनामुळे वाचक तिच्या प्रेमात पडतो आणि तिच्याबरोबर प्रवास करण्यास सिद्ध होतो. याच ओढीने आणि ममत्वाने तो तिचे शेवटपर्यंत वाचन करतो; परंतु हे सर्व झाल्यानंतर कुठल्याही अलिप्त कलाकृतीचा रसिक वाचक जो झपाटला जावयाला हवा, त्याचे मन सर्व बाजूंनी या कलाकृतीने घेरले जावयाला हवे तो अनुभव मात्र येथे येत नाही.

परंतु असे असले तरी एका दुर्लक्षित, तितक्याच जीवन विदीर्ण करून सोडणाऱ्या विषयावर १०–१२ वर्षे अत्यंत परिश्रम घेऊन डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांनी हे पुस्तक लिहिले आणि एका वेगळ्या जगातील खडतर प्रवासाची दिशा वाचकाला दाखविली याबद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत. ¤

तपस्या
लेखिका : सुमती क्षेत्रमाडे
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
पृष्ठे–डेमी ५०६
किंमत : साठ रुपये

रंगभूमी

# मृगया

वि. भा. देशपांडे

पुण्यातील श्री नटराज थिएटर्स या नाट्यसंस्थेने मगया नावाचे नवे नाटक नुकतेच रंगभूमीवर पेश केले आहे. या नाटकाचे लेखक आहेत राजन मोहडीकर आणि दिग्दर्शक आहेत श्रीपाद गोखले. संगीत आनंद मोडक यांनी दिलेले आहे.

एका निष्पाप, निरागस, अवखळ अशा नुकत्याच वयात आलेल्या मुलीच्या जीवनाची झालेली शिकार हे या नाटकाचे सूत्र दर्शनी आहे; परंतु त्याहीपेक्षा एका वेगळ्या दृष्टीने हे नाटक पुढे येते, ते म्हणजे एका कुरूप चेहऱ्याच्या पुरुषाला लावण्यवती तरुणी पत्नी म्हणून लाभली तर काय होईल? अर्थात हा तसा नवा विषय नाही. अथेल्लो ज्यांनी वाचले असेल किंवा त्यावरून अलीकडच्या काळात दिलीप परदेशींनी बेतलेले निष्पाप नावाचे नाटक पाहिले असेल त्यांना विषयाचे नाविन्य नाही; पण अनेकदा वेगळेपण असते ते कथावस्तूचे, मांडणीचे ! तसे ते या नाटकात आहे.

बिबा नावाची अल्लड, निरागस सतरा वर्षांची तरुणी. तिचे घर सर्वसामान्य परिस्थितीतले. वडील वारलेले आणि आई जन्मांध असलेली. ही मुलगी काहीशी उफाड्याची. त्यामुळे वयापेक्षा अधिक मोठी वाटणारी, जगाकडे निरामय पद्धतीने पाहणारी आणि त्याच वृत्तीने जगणारी. तिला गावातल्या श्रीमंताचे स्थळ सांगून येते. श्रीमंतांचा मुनीम मध्यस्थी करून हे लग्न जुळवतो. एका अर्थाने मुलीच्या आईला धन्य वाटते; कारण आपण अंध आणि नवरा गेलेला, घरातली स्थिती जेमतेम. तेव्हा अनपेक्षित श्रीमंत स्थळ मिळालेले ! मुलीचे लग्न होते. लग्नाच्या पहिल्याच रात्री प्रणयप्रसंगी तिच्या लक्षात येते की, आपल्या नवऱ्याच्या तोंडावर देवीचे व्रण असून ती कुरूपता आपल्याला जन्मभर सोसावी लागणार! या कारणाने ती श्रीमंतांना म्हणजे आपल्या नवऱ्याला स्पर्श करू देत नाही. त्या दोघांतली तेढ वाढतच जाते, तिसऱ्या अंकात या मुलीचा बालमित्र असलेला; पण आता सैन्यात चांगला जम बसलेला सारंग येतो. ही मुलगी खुलते. ती दोघे परस्परांना अनुरूप आहेत हे पाहून त्यांचे लग्न व्हावे असाही प्रयत्न होतो. श्रीमंत त्या मुलीच्या (बिबाच्या) नावे काही जमीन वगैरे देण्याचे ठरवतो. ती मुलगी कोणता निर्णय घेते; नाटकाचा शेवट काय होतो वगैरे गोष्टी साक्षात पाहाण्याच्याच आहेत.

ही नाट्यवस्तू प्रेक्षकाला तशी गुंतवून ठेवते, तरीही नाटक पाहात असताना काही शंका लेखनाच्या संदर्भात राहातातच. नाट्यकथेचा कालखंड नेमका कोणता किंवा किती मागचा याचा अंदाज येत नाही. तो यासाठी हवा असतो की, त्यावरून व्यक्तिरेखांची भाषा, वागणे, वावरणे, परस्पर संबंध यांचे आडाखे बांधता येतात. नाटकात मांडलेला प्रश्न किंवा विषय त्या विशिष्ट काळात तपासून घेता येतो. श्रीमंत आणि मुनीमजी यांची भाषा काहीशी ऐतिहासिक बाजाची, कृत्रिमतेकडे जाणारी आहे. इतरांची संवादभाषा वास्तवाला भिडणारी आहे. आजची वाटणारी आहे. दुसरे म्हणजे नाट्यकथेतला महत्त्वाचा धागा श्रीमंताच्या कुरूपतेचा. श्रीमंताच्या तोंडावर असणारे डाग हे सहजपणाने लांबूनदेखील कोणालाही दिसावेत असे आहेत. ते त्या मुलीला पाहायला आले तेव्हा का दिसले नाहीत ? जरी ती अल्लड, लहान असली तरी चेहऱ्यावरची विरूपता कुतूहलाच्या, भीतीच्या पोटी तिला जाणवायला पाहिजे होती. निदान तिने त्या संदर्भात कोणाला तरी विचारायला हवे होते. त्या संबंधात नाट्यांतर्गत जे स्पष्टीकरण आहे ते जुजबी, भुसभुशीत आहे. तिच्या आईला जन्मांध करणारा हा पुढचा प्रकार तिला दिसू नये हा तर हेतू नसावा अशीही शंका येते !

लेखनातल्या अनेक त्रुटी अभिनय-दिग्दर्शन यांमध्ये भरून काढल्या आहेत. यातल्या तीन महत्त्वाच्या व्यक्तिरेखा म्हणजे बिबा, आई आणि श्रीमंत. बिबाच्या भूमिकेत होती नूतन दांडेकर. व्यक्तिरेखेच्या संदर्भात ती दिसली योग्य. पहिल्या अंकात म्हणजे लग्न होईपर्यंत तिचे परकर-पोलक्यातील वावरणे वयाला-वृत्तीला साजेलसे होते.

पण दुसऱ्या–तिसऱ्या अंकात साडी ती प्रौढ दिसूनही मुद्राभिनयात ती कमी पडली. तरीही ती आहे यापेक्षा अधिक चांगली भूमिका निश्चितच करू शकेल. शीला गुप्ते यांना आईच्या भूमिकेत बराच वाव होता. तो त्यांनी यथायोग्यपणे वापरला. बऱ्याच वर्षांनी त्यांना रंगमंचावर नाटकामध्ये पाहिले. त्यांनी आंधळ्या आईची भूमिका करताना आंधळेपणाचा अभिनय अगदी

सहजपणाने केला. विशेषत: हाताच्या हालचाली आणि पावले टाकण्याची पद्धत स्वाभाविक वाटत होती. या हालचालींबरोबरच त्यांनी विविध प्रसंगी मुद्रेवर व्यक्त केलेले भाव शब्दांपेक्षाही अधिक बोलके आणि परिणामकारी होते. त्यांना याहीपेक्षा अधिक आव्हानात्मक भूमिका मिळायला हव्यात. श्रीमंत जहागीरदाराच्या भूमिकेत मोहन जोशी होता. हौशी रंगभूमीवरून अलीकडच्या काळात जे काही चांगले तरुण अभिनेते व्यावसायिक रंगभूमीवर आले, त्यामध्ये मोहन जोशी हा लक्षवेधी कलाकार आहे. त्याने विनोदी आणि गंभीर अशा दोन्ही प्रकारच्या भूमिका केलेल्या आहेत. हौशी रंगभूमीवर गार्बो, डॉल्स हाउस ह्या नाटकांत तो होता; परंतु त्या वेळी तो इतका ध्यानात आला नाही. 'नाथ हा माझा' नाटकापासून (सुभानराव) तो अधिक लक्षात आला. 'मोरूची मावशी' तील मावशीमुळे तर तो विशेष मान्यता पावला; पण या दोन्ही नाटकांतील भूमिकांपेक्षा त्याची प्रस्तुतच्या नाटकातील श्रीमंताची भूमिका वेगळी आहे. कोणत्याही अर्थाने विनोदाशी संबंधित नाही. गंभीर अशी ही भूमिका करताना त्याने श्रीमंताच्या चालण्या–बोलण्याचा थाट योग्यपणाने राखला होता. त्याला रंगमंचीय व्यक्तिमत्त्व चांगले आहे. तसाच त्याचा आवाजाचा आवाकाही चांगला आहे. त्याने आपल्या आवाजाने आणि मुद्राभिनयाने श्रीमंताच्या व्यथा–वेदनांचे अनेक तपशील परिणामकारी रीतीने व्यक्त केले; परंतु त्याने कवितांचे जे गायन केले ते अधिक समर्थपणाने करणे आवश्यक आहे. (निदान मी टिळक स्मारकला पाहिलेल्या पहिल्या प्रयोगात ते खूपच कमी वाटले होते.) ती गोष्ट सुधारण्यातली आहे. सुधीर मोघेंचा कवितेतला शब्द वजनदार आणि भावाभिव्यक्ती करणारा आहे. तो तितक्याच ताकदीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला हवा.

श्रीराम रानडे हा एक गुणी कलाकार मुनीमजींच्या भूमिकेत होता. त्याने बोलण्याची गती थोडी कमी करणे आवश्यक आहे. बाकी मुनीमजीच्या भूमिकेतील अनेक बारकावे त्याने उत्तमपणाने व्यक्त केले. अनिल महाजन आणि इंदू नावेलकर यांच्या छोट्या भूमिका ठसठशीत होत्या; पण या दोन्ही कलाकारांनी कारण नसताना प्रेक्षकांकडे पाहून बोलण्याचे आणि नकळत दाद मागण्याचे ) जे तंत्र असते ते वापरू नये. सारंगच्या भूमिकेत राजन मोहाडीकर दिसले ठीक; पण त्यांचे बोलणे अधिक स्पष्ट आणि वजनाचे हवे, त्याशिवाय त्या भूमिकेतले भाव पुरेसे व्यक्त होणार नाहीत.

नेपथ्याचा आवर्जून उल्लेख करावा इतके यथायोग्य ते होते. विशेषत: श्रीमंताच्या वाड्याचे नेपथ्य अनेक गोष्टींचा विचार करून केलेले जाणवले. मात्र चंद्र पाहण्यासाठी जी खिडकी वापरली ती तितकी परिणामकारी नव्हती. ती केवळ सोय म्हणूनच होती हेही जाणवत होते. श्रीपाद गोखले यांनी दिग्दर्शक म्हणून कथावस्तूच्या चढउताराचा, पात्रांच्या रंगमंचीय हालचालींचा आणि एकूणच नाट्यपरिणामांचा विचार चांगला केला होता. त्यांनी कलाकारांच्या शब्दसंवादउच्चारांकडे आणि आनंद मोडक यांच्या संगीत वापराकडे अधिक लक्ष द्यायला हवे. संगीत, मूक संवादांना, परिणामाला उणावत नाहीना ते पाहायला हवे. अशी ही 'मृगया' कोणी कोणाची कशी केली? ते एकदा पाहायला हरकत नाही ! □

चित्रपट

# धवल रंगाची शांत प्रेमकथा : स्पर्श

विनया खडपेकर

गेली काही वर्षे अनेक कारणांनी गाजत असलेला, बासू भट्टाचार्यनिर्मित आणि सई परांजपेलिखित–दिग्दर्शित 'स्पर्श' हा चित्रपट मुंबईच्या मेट्रो आणि सुंदरम् या दोन चित्रपटगृहांत सुरू झाला आहे.

स्पर्श ही एक प्रेमकथा आहे. ही गुलाबी, धुंद, उसळती प्रेमकथा नाही. ही फिकट चांदण्याच्या शीतल धवल रंगाची शांत प्रेमकथा आहे. नेहमीपेक्षा एका वेगळ्या ठिकाणी अंधशालेच्या पार्श्वभूमीवर ही कथा घडते.

अनिरुद्ध (नासिरउद्दीन शहा) हा एका अंधशालेचा मुख्याध्यापक. तो स्वत:ही अंधच आहे. आपली शाळा हेच त्याचे जीवन आहे. कविता शबना ही एक हळुवार मनाची स्त्री. ती श्रीमंत आहे. तिचे पती मृत्यू पावून तीन वर्षे होऊन गेलेली आहेत; परंतु त्या दु:खातून ती बाहेर पडू शकत नाही. झाडांवर, फुलांवर प्रेम करत स्वत:च्या कोषात जगते. योगायोगाने अनिरुद्ध आणि कविता यांची भेट होते. अंधशाळेच्या मुलांना गोष्टी सांगण्यासाठी, गाणे शिकविण्यासाठी कविता अंधशाळेत येते. स्वत:च्या कोषातून बाहेर पडते. मुलांमध्ये रमून जाते. अनिरुद्ध-कविता ओळख वाढू लागते. परस्परांबद्दल आकर्षण वाटू लागते. ते एकमेकांवर प्रेम करू लागतात. विवाह करण्याचा निर्णय घेऊन लहानसा साखरपुडा–समारंभ करतात. नंतर कोठे तरी बिनसते. कवितेची भावना प्रेमाची नसून त्यागाची, कर्तव्याची आहे असे अनिरुद्धला वाटू लागते. त्याचा अहंकार जबरदस्त दुखविला जातो. ठरलेला विवाह मोडून टाकल्याचे तो तिला सांगतो. स्वाभिमानी कविता कारण विचारीत नाही. तणाव वाढत जातात. कविताने संस्था सोडून जावे असे अनिरुद्धला वाटते. ती ऐकत नाही तेव्हा अनिरुद्ध स्वत:च निघून जाण्याचे ठरवतो. अखेर कवितेच्या मैत्रिणीमुळे गैरसमज दूर होतात. पुनर्मीलन होते.

असे हे साधे कथानक. सर्वसाधारण चित्रपटाप्रमाणे हे कथानक आहे. वरवर पहावा या कथानकात आगळेवेगळे असे काही नाही. या चित्रपटात 'तो' आणि 'ती' आहेत. त्यांचे प्रेम आहे. प्रेमातले विघ्न आहे. शेवट सुखदायी पुनर्मीलन आहे.

तरीही हा चित्रपट ठरीव ठशाचा वाटत नाही. वेगळा वाटतो. अंध नायक एवढेच या चित्रपटाचे वेगळेपण नाही. शरीराने अधू, अपंग नायक-नायिकांचे चित्रपट आपल्याकडे होऊन गेले आहेत. मराठीत 'अबोली' या नावाचा चित्रपट बऱ्याच वर्षांपूर्वी गाजून गेला. त्याची नायिका मुकी होती. मुके नायक–नायिका असलेला–'कोशिश' हा हिंदी चित्रपटही काही वर्षांपूर्वीच लोकप्रिय झाला होता. या दोन्हीही प्रेमकथाच होत्या; पण 'अबोली' फारच ढोबळ होती. वेगळी नायिका घेऊन चित्रपट ठरीव ठशाचा केला

होता. 'कोशिश'मध्ये मुकेपणामुळे संसार-जीवनात सोसावे लागणारे त्रास, दु:ख समस्या कलापूर्णतेने मांडल्या होत्या; परंतु माणसाच्या मनाचे दर्शन विशेष नव्हते. 'स्पर्श' मध्ये हे मनोदर्शन आहे. 'स्पर्श'च्या संदर्भात श्री. मो. ग. रांगणेकरांच्या राणीचा बाग या जुन्या मराठी नाटकाचीही आठवण होते. या नाटकात नायिका अंध होती. नायक डोळस होता. नायक नायिकेला आपला एक डोळा देतो. दृष्टी आल्यावर तिला कुरूप नायक नकोसा होतो. ती खलनायकाकडे आकर्षित होते. शेवटी पश्चात्तापाने डोळा फोडून घेते. या नाटकाची कथा अशी अतिनाटकी, फिल्मी म्हणूनच ठरीव होती. स्पर्श चित्रपटाला अशा प्रकारच्या कृत्रिमतेचा स्पर्शही नाही. त्यात अति उदात्त प्रसंग नाहीत. अति दु:खाच्या घटना नाहीत,अगदी नेहमी घडणाऱ्या दैनंदिन प्रसंगातून,घटनांतून ही कथा उभी रहाते.

## संघर्षातली वाटचाल

अनिरुद्ध--कविता वयाने विचाराने परिपक्व आहेत. प्रकृतीने गंभीर आहेत. त्यांचे वागणे, बोलणे संयमी आहे. त्यांच्या प्रेमाचा प्रवासही असाच धीरगंभीर व संयमी तरीही उत्कट दाखविला आहे.

दोघेही आपापल्या कामात गर्क आहेत. अनिरुद्धभोवती त्याची कामे–शाळेचे वेळापत्रक, मुलांच्या तक्रारी, देणगीदारांचे फोन इत्यादी. कविता मुलांमध्ये रंगून, गुंगून गेलेली; पण दोघेही आपले व्याप सांभाळतानाच जागरुकतेने एकमेकांची सतत चाहूल घेत असतात. या प्रकारचे चित्रण कठीण आहे; परंतु येथे ते सहज जमून गेले आहे. प्रेमाचा हा प्रवास म्हणून वास्तव, भोवताली कोठे तरी पाहिल्यासारखा वाटतो. इतर चित्रपटांप्रमाणेच याही चित्रपटात प्रेमाच्या वाटेवर विघ्न आहेच. मात्र येथे खलनायक ते विघ्न आणीत नाही. प्रेमिकांच्याच अतिरिक्त स्वभाववैशिष्टयामुळे आणि थोडाफार भोवतालच्या परिस्थितीमुळे संघर्ष निर्माण होतो. डोळ्याने अधू असणारा अनिरुद्ध अगतिक नाही. तो परावलंबी नाही–कोणाची मदत न घेण्याबद्दल त्याचा कटाक्ष आहे. स्वत:तील न्यूनामुळे तो मदत न घेण्याबद्दल सतत सावध आहे. म्हणून कविताने त्याच्याशी विवाह करण्याच्या निर्णयात केवढा त्याग केला आहे असे कोणी बोलताच तो एकदम दचकतो. सावध होतो. त्याच दिशेने विचार करू लागतो. अंध दुबेची डोळस पत्नी कशी दु:खी होती ते सांगणारे दुबेचे शब्द त्याच्या कानात घुमू लागतात. मी माझे कर्तव्य करते हे कविताचे साधेच बोलणे त्याला केवढी जखम करते! तो विवाह मोडतो. अनिरुद्धचा निग्रही–आग्रहीस्व भाव आधी व्यक्त झाला आहे म्हणून त्याचे असे टोकाला पोचणे हा उगीच हेतुत: आणलेला फिल्मी ताण वाटत नाही तर ते स्वाभाविक वाटते. विवाह मोडून टाकण्याचे कारण कविता फार विचारत बसत नाही. तेही तिच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत वाटते. पतीच्या निधनानंतर ती स्वत:ला घरात कोंडून घेते. मैत्रीण काही बोलू लागताच विषय टाळते. खूप बोलणे, ताडताड भांडणे तिच्या स्वभावातच नाही. त्यामुळे तिचेही अबोल रहाणे खटकत नाही. कोणावर अन्याय होऊ न देता दोघांची संघर्षातली वाटचाल सई परांजपे यांनी फार समर्थपणे हाताळली आहे. अनिरुद्धने तिला सोडले तरी कविताचे शाळा सोडणे नाकारणे, तिने आखलेल्या कार्यक्रमावर अनिरुद्धने आक्षेप घेणे, तिला अंधाची ब्रेल–लिपी येत नसल्याबद्दल दूषण देणे, एकमेकांनी एकमेकांशी कामापुरते उपचाराचे बोलणे, सगळेच रागलोभ लहान लहान प्रसंगांतून अतिशय जिवंतपणे साकार होत गेले आहेत. कविता ब्रेललिपी शिकते. त्यात पुस्तके लिहिते. याचा अंतिम परिणाम अनिरुद्धला जिंकण्यातच होतो; परंतु जेव्हा ती परिश्रमाने विद्यार्थ्यांना उपयुक्त असणाऱ्या एक एक गोष्टी आत्मसात करीत असते तेव्हा मात्र ती त्या ध्येयाशीच समरस झालेली वाटते. अनिरुद्धला जिंकण्यासाठी परिश्रम घेते आहे असे वाटत नाही. सई परांजपे यांच्या दिग्दर्शनाचे आणि शबानाच्या अभिनयाचे हे यश आहे.

## अनावश्यक दृश्ये

चित्रपटात काही बाबी खटकतातच. काही प्रसंग, काही दृश्ये वाजवीपेक्षा अधिक वेळ पडद्यावर रेंगाळतात असे वाटते. शाळेमधली द्रोणाचार्य-एकलव्य नाटकाची तालीम, कविताच्या लांबलचक नावाच्या मुलाची गोष्ट सांगणे, शाळेच्या कँटिनमध्ये जेवताना मुलांची चाललेली मजा, त्यात एका मुलाची 'सवतेली' 'माँ'वरून टिंगल, यासारखे अनेक प्रसंग लांबल्यामुळे चित्रपटाची गती थोडी संथ होते. शिवाय अंधशाला मुख्य कथेला पार्श्वभूमीसारखी न रहाता तिचा तपशील (म्हणजे अंध मुले खेळतात कशी, भांडतात कशी) हाच मुख्य विषय होऊ लागतो. त्यामुळे कथेचा तोल काहीसा बिघडतो. शाळेतल्या कँटिनवाल्यांच्या छोट्या पुतण्याची कवितावर जडलेली भक्ती, तिच्याबद्दल त्याला वाटणारे बालसुलभ पण संमिश्र आकर्षण यामुळे मुख्य कथानक अधिक आशयसंपन्न झाले आहे असे वाटत नाही. हा भावबंधाचा धागा एक वेगळ्याच कथेचा विषय आहे. येथे तो आगंतुक वाटतो. या प्रसंगापेक्षा अनिरुद्ध–कविता यांचे एकमेकांना अजमावणे, गुंतत जाणे हे प्रसंग जर अधिक आले असते तर दोघांच्याही मनातील अधिक सखोल भावदर्शन होऊ शकले असते. डोळस व्यक्तीला पत्नी म्हणून स्वीकारताना अनिरुद्ध जसा शंकित होतो तशीच अंध व्यक्तीला पती म्हणून स्वीकारताना कविताही शंकित होणे स्वाभाविक वाटले असते. तिच्या मनाचा अगदीच कसा गोंधळ होत नाही याचे आश्चर्य वाटत रहाते. शेवटी मंजूच्या बोलण्यात त्यांचा उलगडा होतो; परंतु अगदी शेवटी कवितेच्या वागण्याचे जे समर्थन तिची मैत्रीण मंजू अनिरुद्धपुढे करते त्या समर्थनातील कवितेच्या मानसशास्त्राचा आधी कोठे तरी सूचक उद्गार आला असता तर बरे झाले असते.

सई परांजपे यांचे खुसखुशीत विनोद मधे मधे आहेतच. लग्नाच्या वाढदिवसाबद्दल मंजू म्हणते 'वह दिन जिस दिन मैं अपनी आजादी खो बैठी.' जगदीशच्या प्रेमाची आटोपशीर कहाणीही मजा आणते. लहान मुलांचे बसणे, उठणे, बोलणे यात जागोजागी असलेला विनोद शाळेचे खेळकर वातावरण दाखवितो.

चित्रपटाची अभिनयाची बाजू संपन्न आहे. गंभीर प्रकृतीची, संवेदनाक्षम, हळुवार मनाची पण निग्रही कविता शबना आझमीने अपेक्षेप्रमाणेच समर्थपणे उभी केली आहे. निग्रही मनाचा, आग्रही स्वभावाचा, गंभीर अंध अनिरुद्ध नासिरउद्दीन शहाने उचित भानाने साकार केला आहे. अंधाचा अभिनय त्यांना सहज जमला आहे; परंतु काही प्रसंगात

मात्र नासिरउद्दीनच्या चेहऱ्यावर अनिरुद्धच्या व्यक्तिमत्त्वाशी विसंगत असा ओशाळा, भाव दिसतो. बोलणे किंचित उतावळे, पोरकट वाटते. मंजूच्या घरच्या मेजवानीच्या प्रसंगी अनिरुद्ध कविताला विचारतो, 'आप हमारी स्कूलमे आएगी ना?' हे विचारणे उतावळे-पणाचे पोरकट मुख्याध्यापकाच्या पदाला तितकेसे न शोभणारे वाटते. दोघांची ओळख अधिक वाढल्यावरही काही प्रसंगी हा ओशाळाभाव अनिरुद्धच्या चेहऱ्यावर दिसतो. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला किंचित तडा जातो. काही प्रसंगात शबाना आणि नासिर यांचा अभिनय विलक्षण सूक्ष्म आहे. हॉटेलमधल्या दोघांच्याच मेजवानीच्या वेळी कविता हॉटेलमधील पदार्थ, नाच याबद्दल काही तरी बोलते. अनिरुद्ध विचारतो, 'आप यहाँ पहले आयी है? 'हाँ' आणि दोघांच्याही चेहऱ्यावरचे भाव बदलतात. कोणतेच शब्द उच्चारले न जाता त्यांच्या चेहऱ्यावरून आपल्याला कळते, कविता पूर्वी तिच्या पतीबरोबर तेथे आलेली होती. तिच्या पतीबद्दल कोणालाच रागद्वेष नसला तरी त्या उल्लेखाशी दोघांमध्ये अपरिहार्यतेने क्षणभर आलेले दूरत्व, संकोच, ताण सारी कंपने आपल्याला सहजतेने जाणवतात. सुधा चोप्रा प्राण तालवार, अरुण जोगळेकर, ओम पुरी या इतर कलाकारांनीही आपापल्या भूमिका योग्य भानाने केल्या आहेत. श्री. मोहन गोखले यांचा अभिनय विशेष उल्लेखनीय वाटतो.

इंदु जैन यांची गीते अर्थपूर्ण आहेत. त्या अर्थानुसार कनू रॉय यांनी दिलेले संगीतही योग्य वाटते; पण 'सुंदरम्' चित्रपटगृहात तरी ही गीते ऐकताना कर्कश वाटत होती. वीरेंद्र सयानी यांचे छायाचित्रण चोख आहे.

चित्रपटाला 'स्पर्श' हे नाव योग्य वाटते. तिच्या स्पर्शाने फुले फुलतात, मुले बहरतात, त्यांचे जीवन उजळते. चित्रपटात ओघात आलेल्या 'मिडास'च्या कथेतही या स्पर्शाच्या जादूशी नाते आहे. तिचा स्पर्श तिच्या भोवताली स्नेहमय जीवन निर्माण करतो हा अर्थ त्या 'मिडास'च्या कथेतून ध्वनित होतो. शिवाय स्पर्शाने ज्ञान मिळवणारे ते जग आहे.

# नाट्यपंढरी



## □ बालगंधर्व आणि काटकसर !

वास्तविक काटकसर हा शब्द बालगंधर्वांच्या कोषात कधीच नव्हता; पण गंधर्वांचे वाढते वय नि कंपनीचे चढते कर्ज यावर तोडगा म्हणून त्यांच्या हितचिंतकांनीच अनेक वेळा कपातयोजना समित्या स्थापन केल्या; पण मी मी म्हणणाऱ्या कपात-योजना समितीच्या सभासदांना महिना शे–दोनशे रुपयांचीसुद्धा कपात सुचविता आली नाही. 'देवा, हा इतका खर्च यायचाच!' असे बालगंधर्वांनी म्हटले की, सभासदांना नाही म्हणताच येत नसे, इतके लाघवी नि आर्जवी नारायणरावांचे बोलणे होते. लाडसाहेब हे बालगंधर्वांचे रसिक सावकार. त्यांनी नारायणरावांना न दुखावता जी काही काटकसर सहज करता येईल ती करावी या हेतूने दादासाहेब काटदरे यांना कंपनीत कारभारी म्हणून नेमले. दादा काटदरे म्हणजे एक आध्यात्मिकवृत्तीचे सद्गृहस्थ. नारायणरावांचे त्यांच्यावर मनापासून प्रेम. एकमेकांनी एकमेकांना कधीही दुखवले नाही. दादांनी पत्त्यातल्या बंगल्यांची पाने, बंगला न कोसळू देता लहान मुले जशी अलगद काढतात इतक्या हळुवारपणे नारायणरावांचा अवाजवी खर्च कमी केला. जमलेली पुंजी कर्जफेडीकडे वळवून त्यांचा भार कमी केला. दादांच्या या कामगिरीने लाडसाहेबही सुखावले.

एक दिवस बालगंधर्व खुशीत आहेत असे पाहून, कंपनीतले काही जादा आचारी कमी करण्याची कल्पना दादांनी सुचविली महिना शंभर–दोनशे रुपयांची ठोक बचत होत आहे, हे पाहून नारायणरावांनीही होकार दिला; पण लगेच थोडासा विचार करून म्हणाले, 'देवा, आपण काढल्यावर ही मंडळी कुठे जाणार? आज इतकी वर्षं आपल्याबरोबर आहेतही!' तरीही दादांनी समजूत घातल्यावर नारायणराव मोठ्या कष्टाने कबूल झाले. शेवटी खर्चपाण्यासाठी त्यांना पैसे देऊन त्यांची पाठवणी केली

त्याच दिवशी संध्याकाळी त्यांच्या ओळखीचा कनोजी अत्तरवाला त्यांच्याकडे आला. त्याच्याकडून सुमारे दोन हजार रुपयांची अत्तरे, बालगंधर्वांनी बसल्या बैठकीत खरेदी केली. दादा काटदऱ्यांनी हे जेव्हा पाहिले तेव्हा मनात म्हणाले, 'एक पाल पाच फूट वर जाते नि सहा फूट खाली येते यासारखेच हे गणित आहे. आचारी, वाढपे नि अत्तरे घेतली.' दादा सहज म्हणाले, 'नारायणराव, इतकी अत्तरे कशाला?' 'वा देवा, अहो आपल्या प्रेक्षकांसाठी एन्ट्री झाली की, अत्तराच्या घमघमाटाने थिएटर नुसते भरून गेले पाहिजे!' या नारायणरावांच्या उत्तरावर दादा काय बोलणार? खरोखरच अठ्ठावीस-एणोणतीस सालापासून, गंधर्वांच्या एन्ट्रीला थिएटर-अत्तराच्या सुगंधाने भरून जाई; पण या अत्तर उधळण्यातही नारायणरावांचा एक गुणविशेष होता. 'जे करायचं ते रंगभूमीसाठी, रसिकांसाठीच!' हे व्रत त्यांनी कधीही मोडले नाही. नाटकाव्यतिरिक्त, अत्तराचा छोटासा फायामुद्धा ते कधी जवळ बाळगीत नसत.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.**

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

**तीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.**

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू

**वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

एका वाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण -
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.**

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**

फिरोझ रानडे

**पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.**